# चैतन्य लहरी

अंक क्र. १०, ११, १२ सन : १९९८ ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर



ध्यानामध्ये तुम्ही स्वतःच्या गहनतेत उतरायला हवे तर तुमच्या सहस्त्रारांतून होणाऱ्या कार्यामध्ये तुम्हाला यश मिळणार आहे आणि निरासक्तता व सूज्ञतेच्या वरच्या पायरीवर तुम्ही येऊ शकणार आहात हे ध्यानामधूनच होणे आहे.

• श्री माताजी निर्मलादेवी

सहस्त्रार पूजा, कबेला, मे ९८

# अनुक्रमणिका


| नाव | पान क्र. |
|---|---|
| १) सहस्त्रार पुजा (कबेला : मे ९८) | ३ ते ४ |
| २) अमृतवाणी | ५ |
| ३) श्री आदिशक्ती (संगीत व सहजयोग लेखक - अरुण आपटे) | ६ |
| ४) गुरू पुजा (कबेला जुलै ९८) | ७ ते १० |
| ५) वाढदिवस सत्कार समारंभ (दिल्ली २० मार्च ९८) | ११ ते १४ |
| ६) सहज समाचार | १५ ते १६ |
| ७) श्रीकृष्ण पुजा (कबेला ऑगस्ट ९८) | १७ ते २० |
| ८) नवरात्री पुजा (कबेला सप्टें. ९८) | २१ ते २४ |
| ९) श्री आदिशक्ती पुजा (कबेला जुन ९३) | २५ ते २८ |
| १०) ऋतंभरा प्रज्ञा (तॉलहॅजिन जुलै ८३) | ३० ते ३१ |
| ११) श्री माताजींचे उपदेश | ३२ |
| १२) सहज संगीताचे परदेशातील कार्यक्रम | २९ |



# सहस्त्रार पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश), कबेला : १० मे '९८**

सर्व धर्मांचे कालानुसार जे पर्यवसन झाले, ते पाहिले की हे सर्व फोल आहे असे लोकांना वाटू लागते. धर्माच्या नावाखाली जे लोक प्रेम, करुणा असले उपदेश करतात त्यात त्यांचा स्वार्थच दडलेला असतो. कारण त्यांचा खरा उद्देश सत्ता काबीज करून सर्व जगावर अधिकार गाजवणे हाच असतो. म्हणजे त्यांना अध्यात्मिक उन्नती नको असते तर भौतिक सत्ता हवी असते. या आक्रमक प्रवृत्तीचा लोकांवर तिका प्रभाव पडू लागल्याचे पाहूनच सहस्रार उघडण्याची वेळ आली असल्याचे मला जाणवू लागले. कारण त्याशिवाय लोकांना सत्य समजणार नाही आणि धर्माच्या नावाखाली चाललेली यादवी व मनुष्यहानी संपणार नाही असे मला दिसत होते. सहस्त्रारामधूनच सत्य जाणणे शक्य आहे; आणि एकदा सतय जाणून घेतले की सारे भ्रम, चुकीच्या कल्पना, स्वतःहून करून घेतलेले अज्ञान इ. सर्व गळून पडते आणि जाणले तेच एकमेव सत्य आहे याची खात्री होते. हे सत्य कटू तर नाहीच पण ते मिळवणेही अशक्य नाही.

दुसऱ्यावर हुकूमत गाजवण्याची इच्छा ही माणसामधील सर्वसामान्य प्रेरणा आहे. आमच्या देशातही काही जमातींना देशाचे विभाजनक करून स्वतःचे वेगळे राज्य हवे होते; त्यामागेही काहीतरी महान कार्याची प्रेरणा नव्हती तर त्यांच्यातील काही नेत्यांना स्वतःसाठी अधिकार व मानाची जागा मिळवण्याचा स्वार्थ होता आणि विभाजन झाल्याशिवाय तो सिद्धीस जाणार नाही हेही त्यांना ठाऊक होते. पण विभाजन झाल्यानंतरही त्यांच्या देशासमोरचे प्रश्न अधिकच गंभीर झाले आहेत आणि आर्थिक कमजोरी व विकासप्रक्रियेतील मंदीमुळे त्यांच्या समस्या वाढल्याचा आहेत. तोडण्याची ही भावना माझ्या ते मुळातच चुकीची आहे. झाडावर उमलणारे फूल झाडातून मिळालेल्या जीवनरसामुळेच खुलते आणि सौंदर्य व सुगंधाचा आनंद पसरवू शकते. ते फूल कुणी तोडले की फक्त त्या झाडाचेच नव्हे तर त्या फुलाचेही नुकसान होते. म्हणून आपण जोडण्याकडे सतत लक्ष दिले पाहिजे व त्यासाठीच कार्य केले पाहिजे.

सर्व चक्रांची पीठे सहस्त्रारात आहे हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. त्यामुळेच सर्व चक्रांचे कार्य संलग्नपणे होत राहून त्यांच्या कार्यामध्ये एकसूत्रीपणा येतो. सहस्त्रारात कुण्डलिनी आल्यावर सर्व पीठांत प्रकाश पडतो आणि एका माळेमधील एकच दोऱ्यामध्ये गुंफलेल्या मण्यांसारखे त्यांच्या कार्यात एकसूत्रीपणा येतो आणि परमचैतन्य सर्व चक्रांमधून एकत्रितपणे कार्य करू लागते. एखाद्या चक्रावर शारीरिक, मानसिक किंवा भावनिक कारणामुळे काही त्रास असे तर इतर चक्रे तो दूर करण्यासाठी प्रयत्नशील होतात आणि सहजयोगी एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व धारण करणारी व्यक्ती बनते. तुमच्या आतमधील हा एकसूत्रीपणा फार महत्त्वाचा आहे. हा एकसूत्रीपणा आतमध्ये घडित झाल्याशिवाय तो माणसांच्या व्यावहारिक जीवनशैलीत प्रगट होणे शक्य नाही. सहजयोग्यांमध्ये आतमधून हे एकसूत्रीपण घडून आल्यामुळे सामान्य माणसाहून ते वरच्या स्थितीवर आलेले असतात. विघातक किंवा विरोधी शक्तींपासून त्यांना धोका नसतो. एरवी न सुटणाऱ्या अनेक विनाशकारक प्रकृतींपासून व व्यसनांपासून ते मुक्त होतात. कुण्डलिनीच्या जागरणानंतर आत्मा प्रकाशात येतो आणि सत्य व योग्य काय आहे याचे तुम्हाला आकलन होते.

**सहजयोग तुम्हाला सर्व मानवजातीचा उद्धार करण्यासाठी मिळाला आहे. सहस्त्राराची कक्षा विश्वव्यापी आहे.** माणसा-माणसातील संबंधांचे सर्व कृत्रिम पडदे गळून पडतात आणि तुम्ही आत्मसाक्षात्कारी झाल्यावर मानव-जन्माचे महत्त्व तुम्हाला समजते. सहजयोगी सामूहिकतेत आले की हे सर्व होणारच असते. आपण आता सामान्य माणूस नाही हे तुमच्या ध्यानात आले पाहिजे; एका विशिष्ट उद्देशासाठी आपली निवड झाली आहे. हेही तुम्हाला नीट समजले पाहिजे. आत्म्याच्या प्रकाशाकडूनच तुम्हाला या कलियुगाच्या दुष्ट चक्रापासून मानवजातीला कसे वाचवायचे हे दिसून येणार आहे. मग तुम्हाला समजून येते, की मानव त्याच्या अज्ञानामुळेच चुकीचया गोष्टी करत असतो. एकदा प्रकाश मिळाला आणि सहस्त्रारातून शक्ती वाहू लागली की तुमच्या चुका तुमच्या स्वतःच्याच लक्षात येतात; तुमचे दोष तुम्हाला समजतात आणि सामाजिक जीवनातील अपूर्णताही तुम्हाला समजते.

तुम्ही 'सहज' बनायला शिकले पाहिजे. सहजामध्ये उतरल्यावरही बऱ्याच लोकांच्या भ्रामक कल्पना संपत नाहीत. या भ्रमसागरातून आपण बाहेर आहोत हे ते विसरतात. याला कारण म्हणजे ते ध्यान करत नाहीत; ध्यान म्हणजे एक कर्मकाण्ड असल्यासारखे त्यांना वाटते. **ध्यानामध्ये तुम्ही स्वतःच्या गहनतेत उतरायला हवे तर तुमच्या सहस्त्रारांतून होणाऱ्या कार्यामध्ये तुम्हाला यश मिळणार आहे आणि निरासक्तता व सुज्ञतेच्या वरच्या पायरीवर तुम्ही येऊ शकणार आहात. हे ध्यानामनामधूनच होणे आहे.** ध्यानामधूनच तुमची जाणीव (Awareness) आज्ञा-चक्र पार करून निर्विचार अवस्थेत तुम्ही सहस्त्रारामध्ये स्थिर होता. मग सहस्त्राराची सत्यता, त्याचे सौंदर्य तुमच्या स्वभावामध्ये, आचार-विचारामध्ये दिसून येऊ लागते. सहस्त्राराचा असा उपयोग करून घेतला नाही तर काही कालानंतर तुमची व्हायब्रेशन्स बंद झाल्याचे तुम्हाला कळेल आणि स्व-स्वरूपाला तुम्ही विसरून जाल. **म्हणून ध्यान करणे हे तुम्हाला फार आवश्यक आहे. ध्यानामधूनच सत्यप्रकाशाच्या सौंदर्यामधून तुम्ही तुमचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ करू**

**शकाल. परमेश्वरी साम्राज्यात प्रवेश मिळवायचा असेल तर याच्याशिवाय दुसरा मार्ग नाही.**

आज तुम्ही सर्वांनी मला वचन द्या, तुम्ही नियमीतपणे, रोज सकाळी किंवा संध्याकाळी ध्यान कराल. ध्यानावस्थेत उतरल्यावर तुमही परमात्म्याच्या संपर्कामध्ये येता. मग तुमच्या, तुमच्या कुटुंबाच्या किंवा तुमच्या राष्ट्राच्या हिताचे जे असेल तेच हे परमचैतन्य घडवू आणणार. नुसत्या ध्यानामधून तुम्ही या सर्वव्यापी शक्तीशी एकरूप होऊ जाता आणि तुम्हालाच हे वरदान मिळण्याचे भाग्य लाभले आहे.

नियमीतपणे ध्यान केल्यावर आणि तुमचे सहस्त्रार पूर्णपणे उघडल्यावरच तुमची प्रगति होणार आहे आणि तुम्हाला सत्य समजणार आहे. सत्य हेच आहे, की ही परमेश्वरी शक्ती म्हणजेच प्रेम आणि करुणा. परमेश्वर म्हणजे प्रेम आणि प्रेम म्हणजेच सत्य. तेसुद्धा निरासक्त प्रेम, त्या प्रेमाला आसक्तीचा स्पर्शही नसतो. हे निरासक्त प्रेम, त्या प्रेमाला आसक्तीचा स्पर्शही नसतो. हे निरासक्त प्रेम फार शक्तीशाली असते. सहस्त्रार उघडल्यावरच तुम्हाला निरासक्तता म्हणजे काय ते समजेल. त्यासाठी घरदार सोडून पळून जायला नको. सहजामध्ये समाजापासून दूर पळून जाण्याचा प्रश्नच नाही, त्याला मी पळपुटेपणा म्हणेन.

निरासक्तता म्हणजे दुसऱ्याबद्दल आपल्यामध्ये कसल्याच भावना नाहीत, दुसऱ्याबद्दल प्रेम नाही असा नाही. उलट त्याच्या वेदना तुम्ही चांगल्या ओळखता; तुम्ही लोकांचे प्रश्न, समाजाचे वा राष्ट्राचे प्रश्न कळकळीने समजता. पण अनासक्त झाल्यावर त्याचे तुम्हाला खरे आकलन होते. या सर्वव्यापी शक्तीवर तुमची प्रामाणिक व परिपूर्ण श्रद्धा असली की ती शक्ती या सर्व प्रश्नांची जबाबदारी घेते आणि तिला, ती सर्व शक्तीमान असल्यामुळे तिला काहीच अशक्य नाही, तुम्ही फक्त तुमचे प्रश्न त्या शक्तीवर सोपवायचे. सर्वसामान्य माणसाला, त्याचा अहंकार आणि कण्डिशनिंगमुळे हे जमणे अवघड वाटते.

गीतेमध्ये श्रीकृष्ण म्हणतात की, "सर्व धर्मान् परित्यज्य....." धर्म म्हटला की, पति-धर्म, पत्नी-धर्म, समाज-धर्म, राष्ट्र-धर्म इ. पण हे सर्व धर्म परमेश्वरावर सोपवायला ते सांगतात. हेच आपल्याला शिकायचे आहे. ही **सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीच सर्व प्रश्न सोडवणार आहे ही श्रद्धा आपल्याला मिळवली पाहिजे. त्यासाठीच ध्यान करणे महत्त्वाचे आहे.** कारण सामान्य माणसाला ऐरवी ही स्थिती प्राप्त करून घेणे अवघड आहे. तासनुतास ध्यान करा असे मी म्हणत नाही तर स्वतःवर व सर्वव्यापी दैवी शक्तीवर पूर्ण श्रद्धाठेवून ध्यान करा. ज्यांचा स्वतःवर आत्मविश्वास नाही त्यांच्या हातून काहीच घडणार नाही. **जे पूर्ण शरणागत व समर्पित आहेत आणि ज्यांना आत्मविश्वास आहे त्यांनाच परमचैतन्यावर पूर्ण भरवसा ठेवणे जमेल.** तुमच्या अवतीभवती ही परमचैतन्यरुपी शक्ती असेल आणि तुमचे सहस्त्रार त्या परमचैतन्याने वहात असेल तर कार्य कसे घटित होते हे पाहून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल.

तुमच्या सहस्त्रारामध्ये येणारी अडचण म्हणजे आज्ञेमधून तुमच्या डोक्यांत येणारे विचार. साधारण माणूस स्वतः कशा ना कशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करत असतो आणि हे जन्मापासून सतत सर्वकाळ चालू असते, एका पाठोपाठ विचार येतच राहतात आणि विचारांमध्ये माणूस सतत अडकलेला असतो. त्यामुळे तुमचे चित्त आज्ञाचक्र पार करून सहस्त्रारांत स्थिर होत नाही. म्हणून आपण कसले-कसले विचार करत आहोत इकडे पहात रहावे. कधी कधी स्वतःलाच रागवावे व विचारावे, "हे मी काय चालवले आहे? मला काय झाले आहे? मी असे का वागतो?" असे करू लागलात की विचार हळुहळू कमी होतील. तुमचे विचार अहंकार आणि कंडशनिग असे दोन्हीकडून येत असतता आणि ते तुमच्यावर इतके प्रभुत्व गाजवत असतता की तुम्हाला आज्ञाचक्राच्या पार जाऊच देत नाहीत. म्हणूनच दोन बीज-मंत्र-हम् व क्षम्-हे सांगितले आहेत; हम् हा कण्डिशनिंगवर आणि क्षम् हा अहंकारावर.

म्हणून निर्विचार स्थिती मिळवणे आवश्यक आहे; कुण्डलिनीकडून सहस्त्राराचे पोषण करून घेण्याचा तोच एकुलता एक पर्याय आहे. तुमच्या आतमधील सूक्ष्म सद्-वस्तू जाणण्यासाठी कुण्डलिनी आज्ञाचक्रातून वर यायलाच हवी. आणि त्यासाठीच ध्यान करायला हवे. स्वतःबद्दल पूर्ण आत्मविश्वास ठेऊन ध्यान करून तुमचे सर्वव्यापी शक्तीबरोबर समर्पित झाल्यास आज्ञाचक्र उघडले जाते. तुमचे सहस्त्रार तुम्हाला परमचैतन्याकडून ही मदत देण्यासाठी आतुरच असते आणि ही साती चक्रे तुमच्यासाठी कशी कार्यान्वित होतात हे पाहून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल.

विश्वातील प्रत्येक घटनेमध्ये, प्रत्येक माणसामध्ये, फुला-फळांमध्ये, नैसर्गिक प्रक्रियांमध्ये असे सर्व ठिकाणी या परमचैतन्याचाच हात असल्याचे तुम्हाला स्पष्टपणे जाणवेल. अशी प्रचिती येऊ लागली की तुमचा अहंकार विरघळण्याची सुरुवत होईल; त्याला या परमचैतन्यामध्येच विरघळून टाकायला हवे. त्यामुळे सहजयोगी म्हणून तुमची स्थिती वर येण्याला फार मदत होईल. तुम्हाला खूप शक्त्या मिळतील. पण तुम्हाला त्याचा गर्व होणार नाही. तुमची निर्मिती-क्षमता खूपच वाढेल. पण सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे तुम्ही एक वैश्विक व्यक्तिमत्त्व बनून जाल; प्रत्येक देशाच्या प्रश्नांकडे, प्रत्येक संस्थेच्या प्रश्नांकडे तुमचे लक्ष जाईल आणि त्यांचे तुम्हाला बरोबर आकलन होईल; शिवाय इतर लोक जसे त्या समस्यांमधूनच स्वतःचा फायदा कसा करता येईल अशा दृष्टीने त्या प्रश्नात लक्ष जाईल आणि त्यांचे तुम्हाला बरोबर आकलन होईल; शिवाय इतर लोक जसे त्या समस्यांमधून स्वतःचा फायदा कसा करता येईल अशा दृष्टीने त्या प्रश्नांना लक्ष घालतात तसे न करता तुम्ही ते प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने विचार कराल. तुमच्या मनावर आणि बुद्धीवर आता या परमचैतन्याची हुकूमत असल्यामुळे तुम्ही खूप बलशाली व्हा.

पण काही गोष्टींची तुम्ही काळजी घेतली पाहिजे. सर्वप्रथम राग व क्रोध. ही एक भयानक प्रवृत्ती माणसामध्ये असते. राग येणे हा उघडउघड मूर्खपणा आहे. कुणावरही तुम्हाला रागावण्याची जरूरच नाही. रागामुळे तुम्ही स्वतःचेच नुकसान करून घेता, सबंध

वातावरण बिघडवता आणि एकमेकांचे नाते-संबंधही बिघडवता. राग आलाच तर थोडा वेळ शांत बसा व राग का यावा असा स्वतःदशीच विचार करत रहा. रागावून प्रश्न सुटत नसतात हे लक्षात घ्या.

तुम्ही विशेष लोक आहात आणि तुमचे सहस्त्रार उघडले आहे ही गोष्ट समजून घ्या व लक्षात घ्या. तुम्ही आता परमेश्वरी साम्राज्याच्या मार्गावर आला आहात आणि त्या साम्राज्यात तुम्हाला प्रवेश मिळवायचा आहे. तुम्ही समजून घ्यायला हवे की तुम्हाला त्या परमेश्वरी शक्तीच्या इच्छेनुसारच जीवन व्यतीत करायचे आहे; त्या शक्तीच्या संपर्कात सतत राहिलात की तीच तुमचा सांभाळ करणार आहे. ती कालातील आहे आणि महाशक्तीशाली आहे. फक्त विनाशाची शक्ती तिच्याजवळ नाही. तुम्हाला स्वतःचाच विनाश करायचा असेल तर ते पूर्ण स्वातंत्र्य तुम्हाला आहे; मग काय वाटेल ते करा. पण हे स्वातंत्र्य बाजूला ठेऊन त्या परमेश्वरी शक्तीचा आदर तुम्हाला राखायला हवा. त्यासाठी तुमचे सहस्त्रार फार महत्त्वाचे आहे. कुण्डलिनीकडून त्याचे अधिकाधिक पोषण करण्यासाठी तुम्ही ध्यान करुन ते स्वच्छ ठेवले पाहिजे, समृद्ध केले पाहिजे. ध्यानाशिवाय दुसरे काही वा औपचारिक प्रकार करायची जरूर नाही. निर्विचार अवस्था आली की तुमचे ध्यान लागत असल्याचे तुम्हाला समजेल. एकदा पूर्ण निर्विचारावस्था आली की तुम्ही परमेश्वराबरोबर एकरूप होऊन तीच तुमचा सांभाळ करतो आणि तुम्ही पूर्णपणे सुरक्षितता मिळवून परमचैतन्याच्या आशीर्वादांचा आनंद मिळवता.

संक्षिप्त

●●●

## अमृत-वाणी

● सहजयोग माणसाला कार्यक्षम (ग्ररपओयत्र) बनवतो. मग ती व्यक्ती सत्याच्या बाजूने उभे राहण्यास कचरत नाही. त्याचा कुणी दुरुपयोग करु शकत नाही. आधुनिक कलियुगाचा काळ हा भ्रांतिपूर्ण व अनैतिकतेचा आहे. जेव्हा असत्य हे मानवी स्वभावाचा भाग बनते तेव्हा पैशाच्या व तथाकथित सत्तेच्या चिखलात उच्च मूल्यांचा ऱ्हास होतो. म्हणून सहजयोग्याचे कार्य जगातील प्रत्येक स्तरांवरच्या सर्वांची मुक्तता करण्यासाठी आहे. (सहजयोग : श्री माताजी)

● सहजयोगी : सहजयोग्यांना धर्मग्रंथांविषयी, होऊन गेलेल्या अवतारी व्यक्ति, प्रेषित, द्रष्टे आणि साक्षात्कारी जीवांविषयी पूर्ण माहिती असावी. अध्यात्म प्रगत होऊन अंतिम पतिवर्तनाच्या (वकअे-बमाजतणम) स्थितीपर्यंत कसे आले तो सर्व इतिहास त्यांना पूर्णपणे ज्ञात असावा. शास्त्रांचा व धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास करावा. (सहज-संस्कृति : श्री माताजी)

● सहजयोग पूर्णपणे समजून घ्या; श्रद्धा बाळगा आणि जाहीर करा. सर्व जगामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे तुमचे ध्येय आहे. तुमच्यामध्ये परिवर्तन झाले की आपोआप इतरांमध्येही तसे होईल. मग सगळीकडे प्रकाश, शांति आणि आनंद होईल. (दिवाळी पूजा ९६)

● आपण सर्वांनी सामूहिक बनले पाहिजे. कशाबद्दलही कूरुर करता कामा नये, अढी बाळगता कामा नये. सामूहिकतेचा आनंद उपभोगला पाहिजे. सामूहिकतेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करु नका. सामूहिकतेतील तुमचे अस्तित्व असे हवे की दुसऱ्या व्यक्तीला तुमच्या सान्निध्याचा आनंद मिळावा. (बुद्ध-पूजा ९८)

● तुम्ही ध्यानाला सुरुवात करता तेव्हा परमेश्वराकडे जाण्याचा एकट्याचा प्रवास सुरु होतो. तेथे पोचल्यावर तुम्ही सामूहिक बनता. एकदा तुम्ही आत्मा बनलात की सर्वत्र व्यापकता येते. मग आत्म्याच्या डोळ्यांमधून तुम्ही पाहू लागता. आणि शांति व आनंद एवढेच त्या स्थितीमध्ये राहते. (ध्यान : ८३)

● तुमचे आपापसातील संबंध, देवाण-घेवाण, भाषा, भजने इ. मधून सर्वांनी एकमेकांच्या संपर्कात या आणि शांति, सत्य, प्रेम, करुणा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहजयोग सगळीकडे पसरवा. (श्रीकृष्णपूजा ९४)

● सहजयोग साधुसंतांचा असला तरी सन्याशांचा नाही. समाजात राहून, समाजाची प्रगति करुन, लोकांच्या विचारांची प्रगति करुन समाजाला मदत करणारा असा सहजयोग आहे. (शेरे भाषण : ९०)

● तुम्ही दुसऱ्याला चैतन्य दिले नाही, दुसऱ्यामध्ये परिवर्तन घडवून आणले नाहीत. दुसऱ्याला मदत केली नाही तर ध्यानाचा, पूजेला येण्याचा काय फायदा? नुसते बरे वाटते, आनंद होतो एवढाच? असे सहजयोगी बेकार आहेत. (नवरात्री-पूजा ९६)

# श्री आदिशक्ती

विश्वनिर्मितीच्या आधी ॐकार आणि आदि-शक्ती यांचे एकत्रितपणे बरोबर प्रगटीकरण झाले. त्यानंतर श्री आदिशक्तींचे भूतलावर कालानुरूप वेगवेगळ्या स्वरूपांमध्ये अवतरण घडून आले. उदा. प्रभु रामचंद्रांचे अवतरण. त्यावेळी रावणाच्या रूपाने राक्षसी प्रवृत्तींचे थैमान चालले होते; रावणाच्या राक्षसी कृत्यांना कसलीच मर्यादा नव्हती. या राक्षसी शक्तीचा नायनाट करणे ही त्या काळाची फार मोठी गरज होती आणि त्यासाठीच प्रभु रामचंद्रांचे मानवस्वरूपामध्ये अवतरण झाले आणि त्यांच्याबरोबर साक्षात् श्री आदिशक्तींचे त्यांची पत्नी सीता म्हणून अवतरण झाले. रावणरूपी दुष्ट राक्षसी शक्तीचा नायनाट करण्याचा एकमेव हेतूने हे अवतरण झाले. अर्थात हे श्री विष्णूच्या महकार्याचा एक अंश असे कार्य होते. यालाच अवतार-कार्य असे संबोधिले जाते आणि त्या कार्यसमाप्तीबरोबर अवतार रुपाची समाप्ति झाली.

त्यानंतरच्या श्रीकृष्ण आणि त्यांची शक्ती राधा हे अवतरण होण्याच्या प्रसंगीचा काळ खूप बदलला होता. रावण हा एकटाच एक असा राक्षस होता पण त्या काळी कौरवांच्या रूपाने अनेक राक्षसी शक्तींचा धुमाकूळ चालू झाला होता. आणि या राक्षसी शक्तींची व्याप्ति प्रचंड वाढली होती. दुर्योधन हा या शक्तींचा नेता होता आणि त्याच्या नेतृत्वाखाली अशा अनेक राक्षसी शक्तींनी थैमान मांडले होते; एक प्रकारे दुष्ट शक्तींचा एक समाजच बनला होता. या सर्वव्यापक स्वरूपात माजलेल्या राक्षसी शक्तींचा नायनाट करणे हाच श्रीकृष्णांच्या अवताराचा उद्देश होता आणि त्यासाठी सुष्ट आणि दुष्ट यांच्या संघर्षामधून दुष्ट नेस्तनाबूत करणे असे व्यापक स्वरूप या अवतारामध्ये होते. या दृष्टीने पाहिले तर संबंध 'महाभारत' ही कथा याच संघाची आणि त्यातून सुष्ट (सत्य) शक्तीच्या विजयाची गाथा आहे.

आजच्या सांप्रत काळीही या दुष्ट शक्ती अधिक फोफावून जगभर कार्यान्वित असल्याचे आपण पाहतो. त्यांच्या अनेक अघोरी आणि राक्षसी कारवाया चालत असल्याचेही आपल्याला दिसून येते. अशा या जगभर पसरलेल्या राक्षसी शक्तींना नष्ट करणे हे आजच्या काळाचे फार मोठे आव्हान आहे; आणि त्यासाठीच महाशक्तीला मानव-स्वरूपात पृथ्वीवर यावे लागले. अर्थात आधीच्या अंशअवताराऐवजी पूर्णावतार धारण करावा लागला. ही सर्व मानवसमाजाची जरुर होती. आदिशक्ती श्री माताजी निर्मला देवी हाच हा पूर्णावतार आहे.

आज अशा शक्तीच्या मानवी अवताराची जरूर असण्याचे कारण आज सर्व मानवजात कमालीच्या अशांत व मानसिक हतबल अवस्थेला आली आहे. त्यामुळे माणूस मानसिक संतुलन गमावून बसला आहे. त्याला भविष्यात काहीच आशादायक वातावरण होण्याचे लक्षण दिसत नाही. उलट भविष्यात त्याला सर्वत्र अंधार, निराशा व मोकळीच आहे असे वाटत आहे. आज त्याला मानसिक शांती व संतुलन परत मिळवून देण्याची नितांत गरज आहे म्हणजे तो आपल्यातील अंतर्भूत शक्ती जागवून सत्य जाणण्याची क्षमता मिळवू शकेल. हा फक्त भारताचाच नव्हे तर जगामधील सर्व देशांचा प्रश्न आहे; विकसित देशांमध्ये माणसांच्या भौतिक गरजा पूर्ण झालेल्या असल्यामुळे त्या लोकांना याची जास्तच गरज आहे. सध्याची ही समस्या एक जागतिक समस्या आहे. या प्रचंड धोक्याची श्री माताजींना पूर्ण कल्पना आहे. त्यांचे कार्य सर्वच्या सर्व मानवजातीच्या कल्याणाचे आहे व म्हणूनच ते एक अवतार-कार्य आहे. एवढे प्रचंड आव्हान मानवी शक्ती पेलून धरण्यास असमर्थ आहे व त्यासाठीच आदिशक्तींचे अवतरण ही आजच्या काळाची गरज आहे आणि श्री माताजी हेच ते अवतरण आहे. त्यांनी एकट्यांनी हे महाकार्य पेलले आहे यावरूनच हे सिद्ध होते.

सहजयोगामधून श्री. माताजी हे कार्य करत आहेत. सहजयोग हा आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेण्याची अगदी सोपी अशी पद्धत आहे. आत्मिक शांतीला आत्मसाक्षात्काराशिवाय दुसरा पर्याय नाही. 'सहज' याचा संस्कृत-अर्थ उत्स्फूर्त असा आहे, अर्थात जे मानवामध्ये जन्मापासून आहे आणि 'योग' म्हणजे आत्मापरमात्म्याची भेट. मानवाच्या मज्जासंस्थेमध्ये काही शक्तीची केंद्रे (Energy Centers) आहेत, त्यांना योग परिभाषेत 'चक्रे' म्हणतात. या चक्रांकडूनच माणसाचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक पोषण होत राहते. प्रत्येक चक्रांमध्ये विविध देव-देवतांची शक्ती प्रस्थापित असते. प्रत्येक योगसाधनेचा उद्देश या चक्रांच्या कार्यावर ताबा मिळवणे व त्याद्वारे प्रत्येक मानवाला त्याच्यामधील आत्म्याची जाणीव घटित करून देणे हाच असतो.

सहजयोग पद्धती नावाप्रमाणे अगदी सहज व सोपी आहे आणि कुणालाही ती विनासायास अंमलात आणण्यासारखी आहे. मानवामध्ये अंतर्भूत असलेली सुप्त शक्ती जागृत करण्याची ही कला आहे. या शक्तीलाच 'कुण्डलिनी' म्हणतात. मानवामध्ये पाठीच्या कण्याच्या शेवटी असलेल्या माकडामध्ये सुप्त स्वरूपात तिचे वास्तव्य असते. कुण्डलिनी जागृत करणे हे एखाद्या उपकरणाचा प्लग विद्युतशक्तीला जोडण्यासारखे असते. कुण्डलिनी जागृत झाल्यावर शक्ती प्रवाहित होते आणि ती टाळूमधून बाहेर पडल्यावर सर्वव्यापी शक्तीमध्ये मिसळते. (योग) आणि थंडगार चैतन्य-लहरी आपल्याला टाळूवर व हातांच्या तळव्यांवर जाणवू लागतात.

कुण्डलिनी-जागृतीचाही अनुभूति एक असाधारण अनुभव आहे. आणि मानवाच्या उत्क्रांतीमधील तो शेवटचा टप्पा आहे. पूर्वीच्या काळी हा अनुभव सर्वसाधारण मानवांना उपलब्ध नव्हता. श्री माताजी निर्मला देवींनीच हे अलौकिक असे कार्य केले आहे, संपूर्ण मानवजातीच्या उद्धारासाठी त्या हे कार्य करत आहेत, अर्थात हे अवतार कार्य आहे त्यांच्यामधील अनन्यसाधारण शक्तीद्वारे त्या हे करतात; सहज आणि उत्स्फूर्तपणे कार्य करणारी ही यंत्रणा हीच या कार्याचे गमक आहे. विशेष म्हणजे या साधनेला धर्म, जाती, भाषा इ. काहीही भेद आड येत नाहीत कारण हे ईश्वरी कार्य आहे आणि मानवनिर्मित कुठलीही व्यवस्था त्याच्या आड येत नाही. संपूर्ण मानवजातीच्याच उद्धाराचे हे कार्य आहे; श्री माताजी, साक्षात् प्रेमस्वरूप असल्यामुळे त्याच हे अलौकिक कार्य करण्यासाठी समर्थ आहेत आणि त्यांच्याकडूनच मानव उत्क्रांतीचा हा टप्पा पार करू शकणार आहे.

**संदर्भ : संगीत आणि सहजयोग**

**ले : श्री. अरूण आपटे**

●●●

# गुरूपुजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश), कबेला : २२ जुलै ९८**

आज आपण गुरुपूजेसाठी इथे जमलो आहोत. गुरु असणारी व्यक्ति इतरांना आपल्याकडे खेचून घेते. इतरांना आकर्षित करते. हीच एक गुरुत्वाकर्षणाची शक्ति आहे. अर्थात अशा व्यक्तीला एक प्रकारचं वजन असतं. भूमातेच्या खेचून घेणाऱ्या शक्तीला गुरुत्वाकर्षण म्हणतात. त्यामुळेच आपण जमिनीवर उभे राहू शकतो; एरवी असे नसते तर आपण कुठेतो फेकलो गेलो असतो. कारण पृथ्वीलाही गति आहे. (ती फिरत असते) तरीही या गुरुत्वाकर्षणामुळे आपण तोल संभाळून उभे राहू शकतो. गुरुमध्येही ही खेचण्याची शक्ति (gravity) असायला हवी; त्यांचा दुसरा अर्थ एक प्रकारचे दडपण, स्वतःबद्दलची योग्य जाणीव आणि स्वतःच्या जबाबदारीचे भान. म्हणून गुरु नेहमी कठोर असतो. आजकालच्या जीवनात लोक सतत धावपळ करत असतात, धडपड करत असतात, अस्थिर असल्यामुळे छोट्या - छोट्या गोष्टीमुळेही उसळतात, बेकार लोकांशी संबंध आला तर अस्वस्थ होतात. आपल्यामधील gravity कमजोर झाल्यामुळे हे त्रास होतात; ज्याची gravity चांगली आहे तो कशानेही चिडत नाही, उसळत नाही, तसाच अवाजवी धडपड करण्याच्या फंदात पडत नाही पण त्याबरोबरच तो आनंदी व समाधानी असतो. अर्थात तो सतत 'मध्या' मध्ये असतो.

हे गुरुपद कसे मिळवायचे? सहजयोग्यांनी हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. पुष्कळांना वाटते की आपण गुरु झालो. त्या नादात ते वेडेवाकडे वागतात आणि त्यामुळे त्यांनी स्वतःचेच नुकसान करुन घेतले आहे. म्हणून सहजयोग्यांसाठी सर्वात महत्त्वाची व जरुरीची गोष्ट म्हणजे त्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. केवळ फॅशनच्या नावाखाली म्हणा, किंवा लोकांना खुष करण्यासाठी म्हणा, जो स्वतःच्या प्रतिष्ठेला शोभणार नाही अशा गोष्टींच्या मागे लागतो तो गुरु कधीच असणार नाही. त्यासाठी त्याला सहजमध्ये, त्याच्या मूल्यांचे पालन करून, स्थिर झाले पाहिजे. **आत्मपरीक्षण केल्याशिवाय हे जमणार नाही; तुम्ही कुठे चुकत आहात आणि तुम्हाला काय करायला हवे हे लक्षात येणार नाही. आणि हे तेव्हांच शक्य आहे जेव्हां तुम्ही स्वतःला सतत सुधारण्याचा प्रयत्न करत राहता.**

सर्व प्रथम लक्षात घ्यायची गोष्ट म्हणजे सर्व मोठमोठ्या संतांनी आपल्या गुरुलाच सर्व श्रेय दिले आहे. भारतात ज्ञानेश्वर नावाचे महान संत होऊन गेले, त्यांनी गुरुबद्दल खूप लिहून ठेवले आहे; गुरु हा द्रष्टा असतो म्हणून गुरुला कधीही आव्हान देऊ नये. तसे केले तर तुम्ही कधीच शिष्य बनू शकणार नाही. दुसरी गोष्ट सांगितली की तुम्ही गुरुबरोबर अयोग्य वर्तन करु शकत नाही, तुमचा राग त्याच्यासमोर उघड करु शकत नाही. तसे केले तर तुम्ही गुरु कधीच होऊ शकणार नाही. उलट खालच्या थराची व्यक्ति बनणार. या व्यतिरिक्त त्यांनी असेही सांगितले आहे की तुमचा आणखी कोणी, मग तो कितीही थोर असला, गुरु असू शकत नाही. मी तर असे म्हणेन की तुम्ही सर्वांनी चैतन्य जाणले आहे, चैतन्यलहरींमधून तुमची जाणीव सूक्ष्म झाली आहे व त्यांचे सर्व ज्ञान तुम्हाला झाले आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीबद्दलचे सत्य तुम्ही जाणू शकता. एखाद्या व्यक्तिबद्दल तुम्हाला काय जाणवते याची चर्चा करायची तुम्हाला जरुर नाही कारण तुम्ही त्याला सामोरे जाऊ शकता, त्याला त्याची चूक स्पष्टपणे दाखवू शकता व सुधारणा करायलाही त्याला सांगू शकता. तुमच्या जवळ सहजयोगामध्ये इतर गुरुपेक्षा आणखी काहीतरी आहे; ते गुरु खुप कडक होते. हातात ते सदैव छडी ठेवत असत. त्याचा चालताना आधार म्हणून व तसेच शिष्यांना मारण्यासाठी ते उपयोग करायचे. त्यांचे शिष्य त्यामुळे गुरुला खुप घाबरत. याचे मी एक उदाहरण देते. भारतामध्ये असा एक गुरु होता. एकदा त्यांचा एक शिष्य एका सहजयोगिनीकडे येऊन म्हणाला "माझ्या गुरुंना संदेश मिळाला आहे की आदिशक्ति तुमच्याकडे रहायला येणार आहे. हे खरे आहे का?" तिने हो म्हणून सांगितल्यावर त्याने आदिशक्तींना त्याच्या गुरुंच्या आश्रमाला भेट देण्याची विनंति करण्यास सांगितले. तिने "मी माताजींना विचारून बघेन" असे उत्तर दिले. नंतर तो शिष्य आमच्या एका प्रोग्रामला येऊन मला भेटला. तिथल्या सगळ्यांची कुण्डलिनी जागृत झाल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याचे गुरु अमरनाथला रहायचे; ते एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. आणि हा शिष्य अंबरनाथचा होता. त्याने मला आश्रमात येण्याबद्दल विचारल्यावर मी होकार दिला. मग मी तिथे गेले, त्यांनी मला आदरपूर्वक वंदन केले व माझ्या पाया पडले. नंतर परत येत असताना तो शिष्य मला म्हणाला, "माझ्या गुरुना सांगू नका पण माझे आज्ञाचक्र फार खराब झाले आहे. ते कृपा करुन ठीक करा." मग मी पुन्हा त्या गुरुच्या आश्रमात गेले आणि त्या शिष्याची आज्ञा ठीक का करत नाही असे त्या गुरुला विचारले. ते म्हणाले "मी का म्हणून त्याची आज्ञा ठीक करायची? माझी आज्ञा ठीक करायला कोणी आले नव्हते, मलाच आत्मपरीक्षण करून ती ठीक करावी लागली. मग त्याची आज्ञा त्यानेच ठीक केली पाहिजे. तुमची गोष्ट वेगळी आहे. तुम्ही आई आहात व तुमच्यातील प्रेमभावनेतून तुम्ही इतरांना ठीक करु शकता. मला तसे जमणार नाही." मग मी "तुम्ही गुरु कसे" असे त्याला विचारले तर तो म्हणाला "शिष्याला मार्ग दाखवणे हे आमचे काम आहे. त्याचे चित्त ठीक नसेल, आज्ञा बिघडली असेल तर मला त्याची पर्वा नाही. मी त्याना मार्ग दिला आहे. आता पुढे त्यांचे त्यांनाच करायचे आहे; त्यांनी कष्ट घेतले पाहिजेच, त्यांनीच आत्मपरीक्षण करुन स्वतःला ठीक केले पाहिजे. मी त्यांचे आज्ञाचक्र का म्हणून उघडायचे?" मग मी ते काम करु का असे त्यांना विचारले तर ते हो म्हणाले. तरी पण म्हणाले "तुम्ही त्याची आज्ञा ठीक केलीत तर तो आणखी खाली जाईल." मग मी म्हटले की "काही हरकत नाही, नाही तरी तुम्ही कुणाची आज्ञा ठीक करत नसल्यामुळे तुम्ही पण अडकून बसलाच आहात." मग मी त्या शिष्याची आज्ञा ठीक करुन उघडली. नंतर मला त्या शिष्याकडून

समजले की हा गुरु त्याला उलटे टांगवून ठेवत असे व कधी कधी त्यांचे डोके खालच्या पाण्यात बुडेल इतकी ती दोरी खाली आणत असे! मग मी पुन्हा त्या गुरुला त्याचे कारण विचारले तर तो सिगरेट ओढत असल्याचे त्या गुरुने सांगितले. म्हणजे आज्ञा ठीक करण्याचे कसले हे क्रूर प्रकार ! त्यांची धारणाच अशी होती की असे कठोर वागवल्याशिवाय शिष्यांची उन्नति होणार नाही आणि क्षमा करत गेले तर त्यांची जास्तच अधोगति होईल! मला या प्रकाराचे व विचाराचे फारच आश्चर्य वाटले. ही वागणूक बरोबर नाही, शिष्यांना त्यांच्या चुका समजावून प्रगति करुन घेण्याची संधि दिली पाहिजे असेच माझे मत आहे. हे धरणीमातेसारखे तत्त्व आहे, तिच्यामुळे बीजाला अंकूर फुटतो, फुले - फळे तयार होतात. हे सारे आपोआप होत असते. पण शिष्य-मंडळी म्हणजे झाडे नव्हेत तर ती माणसे आहेत; आणि त्यांना स्वातंत्र्य आहे. त्यांच्यात राक्षस असले (Devil) तरी मी ते सांभाळू शकते आणि सहजयोग घेऊनही ज्यांना राक्षसच बनायचे आहे त्यांना सोडून द्या. मी अशा अनेक कठोर वागणूक देणाऱ्या गुरुंना भेटले आहे; त्यांच्याबद्दल पूर्णपणे आज्ञापालन, पूर्ण शरणागती, कमालीची नम्रता पाळावी लागते. त्यांच्यासमोर एकादा शब्द बोलणे दूरच पण नुसति असंमति दर्शवणेसुद्धा अशक्य होते; त्यांच्याबद्दल शिष्यांना एक प्रकारची भीति असायची, शिष्यांनी जरासुद्धा अयोग्य वागू नये म्हणून ही शिस्त व कठोरपणा बाळगला जाई.

आपल्याला गुरुपासुन खुप अपेक्षा असतात. आपण त्यांना वडील-माता-मित्र अशा सर्व दृष्टिकोनातून बघतो. गुरुच आपले सदैव रक्षण करत असतो, आपल्याला मार्गदर्शन करत असतो. आपल्या उन्नतीसाठीच झटत असतो. गुरु हा असाच असायला हवा. त्याचबरोबर शिष्यांकडून खुप अपेक्षा असतात. प्रथम म्हणजे तो आतून बाहेरुन पूर्णतः शुद्ध असला पाहिजे, अध्यात्मिक उच्च पातळीवर यायची त्याला शुद्ध इच्छा हवी. अशी शुद्ध इच्छा नसेल व इतर काही उद्देश मनात असेल तर कशाचाही उपयोग नाही. आता काही लोक सहजयोगांतही नाव कमवायचे, अधिकार मिळवायचा, सर्वांवर हुकूमत गाजवायची अशासाठी प्रयत्नशील असतात. तसेच काही लोक सहजयोगांतही पैसा कसा मिळवायचा हे बघत असतात. काहींना इथेही राजकारण करायचे असते.

लीडर बनण्यासाठी, लीडरशीप टिकवून ठेवण्यासाठी कुठे-कुठे असे राजकारण चालते. असल्या कुठल्याही कृत्यांमुळे तुम्हाला कधीही उन्नति (Ascent) मिळणार नाही. तुम्ही इथे अध्यात्मिक उन्नत जीवन मिळवण्यासाठी आलेला आहात. लीडर लोकांनाही आपल्याजागी दुसरा कोणी नेमतील अशी भीति वाटते. सहजयोगामध्ये कसलीही भीति कुणाला वाटायला नको; भीतीला सहजयोगांत स्थान नाही. उन्नतासाठी आत्मपरीक्षण हाच उपाय आहे. आत्मपरीक्षणांतून आपण काय करत आहोत, आपण किती नम्र आहोत, जे काम सांगितले जाईल ते मनापासून आपण करतो का इ. गोष्टी आत्मपरीक्षणांतूनच कळतात. उदा. मी कधी एखाद्याला अमुक-अमुक ठिकाणी जायला सांगितले तर कांही ना काही सबब सांगतात. हे बरोबर नाही, कुणाला कुठे जायला सांगितले तर त्याच्यामागे काही तरी हेतू असतो असे समजून त्या व्यक्तिने ते मानलेच पाहिजे. असे आज्ञापालन केले नाही तर तुम्ही गुरु होऊ शकणार नाही; तुम्हीच जर आज्ञा पाळली नाही तर दुसरे लोक तुमची आज्ञा कशी पाळणार? हे आज्ञापालन करण्यात तुमचेच कल्याण आहे. तुम्हाला शिकण्यासाठी आहे, तुमच्या उन्नतीसाठी आहे. असे केल्याने गुरुचे सर्व गुण तुमच्यामध्ये उतरतात.

गुरु कधीही अकांड-तांडव किंवा कुरकुर (Fuss) करणार नाही. मला असेच घर हवे, मला हे चालत नाही, अमके आवडत नाही असले प्रकार त्याच्याजवळ नसतात. असल्या आवडी-निवडींच्या पलीकडे जो गेलेला नाही तो गुरु होऊ शकत नाही. या सवयी सोडण्याचा तुम्हीही प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यामुळे तुम्हालाच त्रास होतो. सगळ्या प्रकारच्या सवयी सुटल्या पाहिजेत; गुरुने कसल्याही सवयींपासुन मुक्त असले पाहिजे; गुरु बनण्यासाठी सर्वप्रथम हे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गुरु कालातीत असला पाहिजे. समजा कुठल्या ठिकाणी वेळेवर जायचे असेल तर त्याची धावपळ होता कामा नये. मला जरी कुठे जायचे असते तेव्हा सर्वजणांची धावपळ सुरु होते. मला ते समजत नाही; मला जायचे आहे, तुम्हाला नाही मग तुम्ही कसली काळजी व धावपळ करता? कुठल्या समारंभाला जायचे असले की लोक बेचैन होऊन गडबड करतात. आजकाल हे फारच आहे, पूर्वी इतके नव्हते. अशा गोष्टींमध्ये तुम्ही अडकून बसलात तर तुम्ही **कालातीत** होणार नाही. पण एकदा कालातीत झालात की कालावर तुमचेच नियंत्रण येते. एक उदाहरण सांगते. कबेलामध्ये एकदा एक लहान मुलगी पडली. त्याचवेळेस मी अमेरिकेला निघाले होते आणि खोलीबाहेर येऊन पाहते तो हा अपघात. मी म्हटले काळजी करण्याचे कारण नाही, मी हिला आधी ठीक करते. लोकांना माझ्या विमानाची काळजी वाटून ते अस्वस्थ झाले. पण मी शांत होते आणि त्या मुलीला ट्रीटमेंट देऊन अर्ध्या तासाने मी निघाले. विमानतळावर पोचल्यावर समजले की आमचे विमान नादुरुस्त झाले आहे. पण त्यांनी त्याच तिकिटावर अमेरिकेला जाणाऱ्या दुसऱ्या विमानांत आमची व्यवस्था केली. आधीचे विमान न्यूयॉर्कला जाणार होते तर हे वॉशिंग्टनला; पण तेही चांगलेच झाले, वॉशिंग्टन विमानतळावर कस्टमचा इतका त्रास नसतो व गर्दीही कमी असते. मुद्दा हा की सर्व काही चांगल्या प्रकारेच घडून येते आणि तुम्हाला योग्य तेच योग्य वेळी घडून येते. माझ्या अनुभवावरुन मी खात्रीपूर्वक सांगते की वेळेची (time) काळजी करणे ही एक डोकेदुखीच आहे. जेव्हा तुम्ही ती काळजी परमचैतन्यावर सोपवता तेव्हा प्रत्येक गोष्ट तुमच्या चांगल्यासाठीच घडून येते. आणि जरी तसे झाले नाही तरी त्यामध्ये तुमची कसोटी पाहिली जाते हे पण तुम्ही लक्षांत घ्या. म्हणून जे होत असते त्याचा स्वीकार करायला शिका. म्हणून निरासक्तता (detatchment) तुम्ही बाणवली पाहिजे; ते मिळवले की तुम्ही **गुणातीत** होता. त्रिगुणांमध्ये सत्वगुण सगळ्यांत चांगला, पण बरेच वेळा तुम्ही तमोगुण किंवा रजोगुणांच्या आहारी जाऊन डावीकडे किंवा उजवीकडचे झुकता. उजवीकडचे (रजोगुणी) झालात की तुम्ही प्रमाणाबाहेर कार्य करु लागता. त्यामुळे तुम्हाला थकवा येतो, वेगवेगळे आजार उद्भवतात, तुमचे तुमच्या कुटुंबाचे त्रास वाढतात. डावीकडचे (तमोगुणी) झालेल्या माणसांना अंधाराची भीती वाटते आणि उत्तरोत्तर विचित्र वागू लागतात, लोकांना वाईट वागणूक देऊन त्यांना छळण्याची प्रवृत्ति बळावते आणि ते गुपचूपपणे चालते. रजोगुणी माणसांना प्रत्येक बाबतीत स्वतःचे मत असते आणि तेच ते इतरांवर लादू पाहतात. जे लोक ते ऐकत नाहीत त्यांच्याशी त्यांचे जमत नाही. लोकांबरोबर त्यांना चांगले संबंध जमवता येत नाहीत आणि एकूण परिणाम म्हणजे तो



आत्यापासून दुरावतो. डाव्या बाजूच्या लोकांना सायकोसोमॅटिक आजार होतात आणि डॉक्टर मंडळींनाही त्यावर उपाय सापडत नाही. असे सारखे उजवीकडे किंवा डावीकडे झुकणे हे चांगल्या जीवनाचे लक्षण नाही, म्हणून **रजोगुण किंवा तमोगुणामध्ये आपण अडकणार नाही याची काळजी तुम्ही घेतली पाहिजे; लंबकासारखे सतत इकडून-तिकडे जाणे टाळून तुम्ही स्थिर झाले पाहिजे.**

स्थिर व संतुलित व्यक्तिमत्व बनण्यासाठी ध्यान केले पाहिजे. कोण रोज ध्यान करतो व कोण करत नाही हे मला लगेच कळते. तुम्हालासुद्धा ते समजेल. रोज सकाळी व संध्याकाळी ध्यान केल्याने संतुलन सुधारते; प्रतिकारशक्ती बळावते आणि शारीरिक चोचल्यांमध्ये तुमचे चित्त लागत नाही; खाण्या-पिण्याचे लाडही सुटतात; काय खायचे, कधी जेवायचे हे विचारपण डोक्यात येईनासे होतात. शिवाय तुमच्या व्यक्तिमत्वातही एक प्रकारचा गोडवा येतो व तुमच्याकडे पाहणारा प्रसन्न होतो. मॉडेलचे अनुकरण लोक करतात **तसे तुमच्यासारखे व्यक्तिमत्व व्हावे असे इतरांना वाटू लागते. म्हणजेच तुम्ही गुरु बनता.** त्याचबरोबर या डाव्या-उजव्या बाजूकडे गेल्याने येणारे दोष किंवा सवयी पण सुटतात. जे लोक सत्त्वगुणी असतात त्यांना नीतिधर्माबद्दल आदर असतो; अशा लोकांना अनीतिमान लोकांचा तिरस्कार असतो; कालान्तराने त्यांची वृत्ती लोकांपासून दूर राहण्याची बनते आणि नंतर हिमालयासारख्या एकान्तवासात राहणे पसंत करतात, समाजापासून संबंध तोडून दूर जातात आणि एखाद्या महान गुरुसारखे व्हायला बघतात. अशा लोकांचा काही उपयोग नसतो. मी हरिद्वारला गेले होते तेव्हा अशा काही जणांना भेटले होते तेव्हा त्यांना त्याबद्दल विचारले तर ते माणसे नकोशी वाटतात असे म्हणाले. त्यांच्या मते लोकांना कितीही सांगितले तरी ते ऐकत नाहीत आणि उलट त्रासच देतात. अशा लोकांचा काय उपयोग शंभर वर्षाहूनही जास्त ते जगले तरी त्यांचा समाजाला काय उपयोग? ते मलाच म्हणायचे, "माताजी, तुम्ही आई असल्यामुळे लोकांचा त्रास सहन करता पण आम्हाला ते जमायचे नाही." त्यांच्याजवळ अनेक शक्त्या असतात पण सर्वसाधारण माणसांना ठीक करता येईल अशी शक्ती नसते. **मी त्यांना सांगितले की माणसांना सुधारण्याचा मार्ग म्हणजे त्यांना आत्मसाक्षात्कार देणे हाच आहे; म्हणजे आत्म्याच्या प्रकाशामध्ये माणसांना आपण कुठे चुकतो हे कळेल, आपण काय विसरलो आहोत हे त्यांना कळेल; हे आरशात स्वतःकडे बघण्यासारखे आहे आणि मगच लोक स्वतःला सुधारू शकतील व उन्नत होतील.**

तुम्ही पण ही गोष्ट नीट जाणली पाहिजे. तुम्ही स्वतः स्वतःची चूक ओळखू शकला, स्वतःमधले दोष बघू शकला आणि त्या सर्व दोषांपासून अलिप्त होऊन त्यांच्याकडे लक्ष द्याल तर तुम्हाला समजेल की सर्व प्रकारची आसक्ती, दोष, सवयी यांच्यामुळे आपण प्रगती न करता उलट आपलीच अधोगती करत आहोत. तरच त्या सर्वांपासून तुमची सुटका होईल. पण हे सर्व होण्यासाठी तुमच्या स्वरूपाचे स्वच्छ दर्शन तुम्हाला व्हायला हवे. हा प्रकाश तुमच्यामध्ये आला की तुम्ही तुम्हालाच स्वच्छपणे पाहू शकता, तुमच्या चुका तुमच्या लक्षात येतात. त्यामुळेच एका रात्रीत अनेकांची व्यसने सुटली आहेत. पुष्कळ वाईट सवयी सुटल्या आहेत पण अजूनही तुमच्यामध्ये काही दोष सूक्ष्मपणे राहिले आहेत. त्यामुळे पहिली गोष्ट ही होते की तुम्ही आपल्याच देशबांधवांचे दोष बघायचा प्रयत्न करता. इंग्लिश व इटालियन लोकांमध्ये मला विशेषकरून हे दिसते. रशियन, भारतीय लोकांतही ते आहे. गंमत म्हणजे निरनिराळ्या देशवासियांबद्दलची माहिती मला त्या देशांतील सहजयोग्यांकडूनच मिळत राहते. म्हणजे सहजयोगांत आल्यावर आपले देशपरत्वे अस्तित्व ते विसरले आहेत, ही चांगली गोष्ट आहे, ही निरासक्तता आल्यावर तुम्ही मुक्त व्यक्ती बनता, स्वतंत्र व्यक्ति बनता. मग आई-वडील, बहीण-भाऊ ही नाती उरत नाहीत. विशेष करून कुटुंबाबद्दलची आसक्ती फार वाईट, त्यामुळे बरेच लोक सहजयोगांतून बाहेर गेले आहेत. याचा अर्थ तुम्ही कुटुंब दूर सोडून द्या असा नाही पण कुटुंबाचा आपल्यावर काय सूक्ष्म परिणाम होत आहे इकडे दुर्लक्ष करू नका. अशी सूक्ष्म समज आली तरी प्रत्येकावर टीका करायची मोकळीक मिळत नाही हेही लक्षात घ्या. फक्त स्वतःकडे लक्ष ठेऊन आपण चुकत नाही एवढेच पहात रहा. सांगण्याचा अर्थ हा की ही डिटॅचमेंट आत्मपरीक्षणातून आणि आत्म्याकडूनच मिळत असते. म्हणजे आपले अध्यात्मिक जीवन हेच प्रत्येकाचे महत्त्वाचे लक्ष आहे; कारण त्यातून तुम्ही सत्य शोधत राहता आणि एकदा सत्य समजले की असत्याबरोबर तुम्ही राहूच शकत नाही. म्हणूनच तुम्ही म्हणत असता की, "माताजी, आम्ही या अज्ञानाच्या सागरामध्ये आसक्तीमुळे बुडत चाललो आहोत." बहुतेक वेळा तुमच्या Identification मुळे हे घडत असते. "मी हे कसे करणार" असेच बोलत राहता. काही देशांमध्ये सहजयोग इतका चांगला रूजला आहे की तेथील लोक आपल्या देशाबद्दलही अलिप्त आहेत. त्या सहजयोग्यांनीच आता इतरांना मदत केली पाहिजे. त्याकरता कमालीची सावधानता, सहनशीलता आणि प्रेम यांची गरज आहे. मी स्त्रोत असलेली वैश्विक शक्ती ही प्रेमशक्ती आहे हे तुम्ही जाणताच; परमेश्वरी प्रेमाचा तो शुद्ध प्रकाश आहे. या प्रेमामध्ये कसलीही मागणी नाही; त्याला कशाची जरूर नाही पण ते सतत कार्य करत असते. एखाद्यावर तुमचे प्रेम असेल तर त्या व्यक्तीला दुःख होईल, ती नाराज होईल असे तुमच्या हातून घडत नाही– आता काही सहजयोगी मला आवडत नाही अशा गोष्टी करतात. पण मी काही न दर्शवता शांतपणे बघते. हे जोपर्यंत तुम्हाला जमत नाही तोपर्यंत तुम्ही सामूहिक बनू शकत नाही. सामूहिकतेमध्ये तुम्ही इतरांच्या भावना जाणता, इतरांना समजता, काही उघडपणे बोलला नाहीत, दर्शवले नाहीत तरी तुम्ही जाणत असता. तुमच्यात काही कमी असले, तुम्ही चुकत असला तरी सामूहिकतेत तुम्ही सुधारणा करू शकता. तुम्हाला त्याच्याबद्दल अपराधीपणा वाटणार नाही पण तुमच्या ते लक्षात येते. त्यासाठी फक्त क्षमा करण्याची महान शक्ती तुमच्याजवळ असायला हवी; समजून घेण्याची खूप तयारी असली पाहिजे. काही लोक परिस्थितीमुळे चुका करतात, त्यांना नम्रता, नीति, सबूरी इ. शिक्षण मिळालेले नसते किंवा आक्रमक कौटुंबिक संस्कृतीमध्ये ते वाढलेले असतात. अशा लोकांना क्षमा करायलाच हवी; पुन्हा पुन्हा क्षमा केल्यावर ते बदलतील. मला वाटते की प्रत्येक मानव सहजयोगामधून एक सुंदर फुलासारखे बनणे शक्य आहे. काही विचित्र माणसे असतात हे मी जाणते. त्याचे कारण त्यांना तशी इच्छा नसते. शुद्ध इच्छा असल्याशिवाय आपण त्यांच्यावर जबरदस्ती करू शकत नाही. अशा माणसांना सोडून द्या. पण ज्या लोकांना तीव्र आणि शुद्ध इच्छा– म्हणजे पैसा, अधिकार या तत्सम गोष्टींसाठी नाही तर अध्यात्मिक उन्नत स्थिती मिळवण्याची इच्छा असेल– त्यांना कुठल्याही परिस्थितीत, कसेही करून तुम्ही मदत केली

पाहिजे. काही जण चुकीच्या मार्गाने गेले, भलत्या गुरुंच्या नादी लागले आणि त्यांनी आज्ञा खराब करून घेतली. त्यांनाही नीट संभाळून घेऊन मदत केली तर तेही सहजयोग घेतील. मी एक भारतीय स्त्री असूनही परदेशांत जाऊन कष्ट घेतले आणि तिकडेही सहजयोग खूप पसरवला. पूर्वी असे कधी झाले नव्हते. एखादा संत गेला तरी त्याचा छळच झाला. एकमेकांना मदत करणारे, सांभाळ करणारे इतके लोक पूर्वी नव्हते.

म्हणूनच सामूहिकता म्हणजे काय, सामूहिक कसे व्हायचे हे समजून घ्यायला हवे. कारण तुम्ही गुरु बनता तेव्हा लोकांना तुम्हीच मार्गदर्शन करायचे असते. त्यांतूनच सामूहिकतेमध्ये काय अडचणी आहेत आणि त्या कशा सोडवायच्या हे तुम्हाला समजते. **सामूहिकता बळकट करण्याची कला तुम्हाला समजली की तुम्ही गुरुपदाला योग्य होता. तुमच्यापैकी पुष्कळ संख्येने गुरु बनलेले सहजयोगी दिसावे ही माझी फार इच्छा आहे.** इतर लोकांनी तुम्ही खरे गुरु आहात असे म्हटले पाहिजे. त्यासाठी मी सांगितल्याप्रमाणे तुम्ही पूर्णपणे आज्ञाधारक बनले पाहिजे, मनातही कसली शंका त्याबाबतीत राहता कामा नये, गुरु जे सांगेल ते प्रामाणिकपणे अमलात आणले पाहिजे. सहजयोगात खरं तर असे बोलत नाही तरी पण मी प्रथमच हे सांगत आहे. कारण तुमच्यापैकी बरेच जण त्याबाबतीत कमी पडत असल्याचे मला दिसते. तुम्हाला कसला त्याग करायची, काही सोडून द्यायची जरूर नाही, संसार सोडायची जरूर नाही, आपण परफेक्ट असल्याचा बहाणाही करण्याची जरूर नाही. **तुमच्यामध्ये खरी गहनता असेल तर तुम्ही खूप नम्र व्हाल, आज्ञाधारक व्हाल आणि आत्म्याच्या प्रकाशामध्ये उजळून जाल याची मला खात्री आहे.** याचे महत्त्व एकदा तुम्ही ध्यानात घेतले की एक उच्च प्रकारचे व्यक्तिमत्व मिळवण्यासाठी तुम्ही कसोशीने प्रयत्न कराल. लोकांना वाटते की हे अवघड आहे पण मला तसे वाटत नाही कारण त्यातच समृद्ध आयुष्याचे समाधान व सार्थक आहे. भांडण-तंटे, वादविवाद, दिखाऊपणा यांचा काही फायदा नाही. पण सर्वांची काळजी घेणे, सर्वांबरोबर सलोखा व प्रेम ठेवणे, इतरांना छोटीशीही मदत करणे हे गुण दैवी जीवाचीच लक्षणे आहेत. हे तुमच्या स्वतःच्या फायद्याकरिता, लीडर बनण्याकरिता इ. काही नसते तर तुमच्या अध्यात्मिक प्रगतीकरता (ascent) हे आहे. म्हणून फालतू कल्पना, मागण्या, लीडर बनण्याची धडपड हे सर्व सोडून द्या. काही सहजयोगी तसेच प्रयत्न करत असल्याचे पाहून मला खेद होतो. काही सहजयोगी लीडरचा अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करत असतात. हा सारा मूर्खपणा आहे. मी अनेकदा सांगितले आहे की **तुमची स्वतःची प्रगती, स्वतःबद्दलची सुधारणा व तुमची स्थिती सहजयोगांत तुम्ही कोण आहांत हे दाखवून देईल.** तुमच्याबद्दल इतर लोक काय बोलतात याच्यापेक्षा तुम्हाला तुम्ही स्वतः कसे दिसता हे सत्य आहे आणि त्याचेच तुम्ही भान ठेवले पाहिजे. महिलांकरता मला विशेष करून हे सांगावेसे वाटते, कारण मी स्वतः गृहिणी असून इतके कष्ट घेतले तर तुम्ही महिलांनीही प्रयत्न करायला हवा. महिला ही शक्ती आहे असे म्हटले जाते. पण प्रत्यक्षात त्याची प्रचिती यायला हवी नाही तर आपण सहजयोगावर पूर्ण अवलंबून आहोत असे म्हणून चालणार नाही. महिलांनी स्वतःच्या हिंमतीवर उभे राहिले पाहिजे, आणि सगळ्या गोष्टींबद्दल त्यांनी चांगली जाण ठेवली पाहिजे. मला खात्री आहे की महिला अशा सक्षम बनून जोमाने पुढे आल्या तर सहजयोग खूप वेगाने पसरेल. पुरुष सहजयोगाचे खूप कार्य करत असतात आणि महिलांना घर, कुटुंब इ. कामे संभाळावी लागतात हे मलाही समजते. पण विचारात घेण्याची गोष्ट ही की महिला सहजयोगाचे प्रत्यक्ष कार्य करू लागल्या तर त्यांची मुले जास्त चांगली बनतील. कुटुंबाचे वातावरण चांगले होईल आणि मग ती परमचैतन्य-शक्ति तुमच्याकडे पूर्ण लक्ष देईल. तुम्ही समजून घेऊन विश्वास ठेवला पाहिजे की या परमचैतन्याला सर्व काही समजते. तेच सर्व घडवून आणते आणि सर्वांत मुख्य म्हणजे त्याचे तुमच्यावर अतोनात प्रेम असते. म्हणून तुम्ही नीट लक्षात घ्या की ही परमचैतन्य शक्ति आता तुमची झाली आहे आणि तुम्ही आता त्या शक्तीच्या संपर्कात आल्यामुळे तुम्हाला कसलाही प्रश्न पडणार नाही. सर्व काही की या शक्तीवर सोपवलेत तर सर्व काही सुरळीतपणे जमून येईल. एका शास्त्रज्ञाने माझ्या बाबतीत काही संशोधन केल्याचे तुम्ही ऐकले असेल; मला एवढेच म्हणायचे आहे की त्याने मला विचारले की ही इतकी हृदये कशी आली? मी सांगितले की ते विश्वाच्या हृदयांत बसून (sitting in the heart of universe) गाणे म्हणत होते म्हणून. मग ही शक्ति ऐकू शकते का असे त्याने विचारल्यावर मी सांगितले की ती मीच आहे आणि मला ऐकू येते. मी गाणे ऐकत होते आणि त्या शक्तीने हे सर्व घडवून आणले. म्हणून हे चांगल्यापैकी समजून घेतले पाहिजे की ही शक्ती तुमच्यामध्ये आहे. तिला सर्व समजते पण तिच्यावर तुमचे नियंत्रण चालू शकत नाही. पण ती सतत तुमच्याबरोबर असल्यामुळे तुमचे रक्षण करत असते आणि आई जशी तुम्हाला चुकीच्या मार्गाकडे जाऊ देत नाही तसेच ती तुमच्याकडे लक्ष ठेवते व तुम्हाला चुकीच्या मार्गावरून सावरते.

आता एकविसावे शतक सुरू होणार आहे आणि अनेक घटना घडणार आहेत; म्हणून तुम्ही सर्वांनी काय करायचे ते ठरवले पाहिजे, सहजयोगाच्या प्रसारासाठी प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार कार्य केले पाहिजे; त्यांच्यातच तुमचे चित्त घातले पाहिजे. ज्या महिलांना बाहेर जाणे शक्य होत नसेल त्यांनी सहजयोगाबद्दल काहीतरी लेखन करावे, आपले अध्यात्मिक अनुभव लिहावे किंवा आपले अनुभव (फायदे) लिहून काढावे. बऱ्याच जणांना Miracle Photographs चे अनुभवही मिळाले आहेत; ते फोटो इकडे पाठवावे म्हणजे जगभरातील या चमत्कारांचे एकत्रित संकलन करता येईल, त्या फोटोंचा अभ्यास करता येईल. तसेच सहजयोगामधील तऱ्हेतऱ्हेचे अनुभव एकत्रित करून त्यांचे संकलन करून प्रकाशित करण्याचा विचार आहे; त्यासाठीही सर्वांनी आपआपले वैशिष्ट्यपूर्ण असे अनुभव पाठवावे. तसेच चमत्कारांचे अनुभवही पाठवावे म्हणजे त्यांचेही पुस्तकरूपात प्रकाशन करता येईल. हे सर्व मराठी, हिन्दी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावे.

**मला विश्वास आहे की मी आज सांगितलेल्या गोष्टींवर तुम्ही चिंतन कराल आणि त्यानुसार कार्य कराल.**

सर्वांना परमेश्वराचे अनंत आशिर्वाद

●●●

# वाढदिवस सत्कार समारंभ

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे प्रवचन दिल्ली २० मार्च '९८**

सत्याच्या शोधात असलेल्या सर्व साधकांना माझा नम्र प्रणाम. याबद्दल तुम्ही सर्व लोक लांब-लांबहून माझ्यासाठी इथे आलात, माझ्याबद्दल बऱ्याच जणांनी सुंदर भावना व्यक्त केल्या याबद्दल माझे हृदय भरुन आले आहे. सहजयोग समजण्यासाठी आपण या कलियुगात कुठे आहोत हे माणसाला समजले पाहिजे; आपले काय प्रश्न आहेत, आजूबाजूला चालत असलेले प्रकार आपल्याला का अस्वस्थ करतात याचा विचार केला पाहिजे. सगळीकडे, सर्व देशांमध्ये माणसांच्या जीवनांत मानसिक ताणतणाव, अशांति यांचा प्रभाव वाढू लागल्यामुळे एकंदर मनुष्यप्राणी गोंधळून गेला आहे. सर्वत्र मानवसमाज ऱ्हासाच्या दिशेकडेच चालला तर नाही ना अशी भीतीही त्याच्या मनात डोकावत आहे. या सर्वांचे कारण काय? सगळीकडे धर्माचे नांव घेतले जाते, साधु-संन्यासी उपदेश करत असतात, ग्रंथ पारायणे होतात. म्हणून सत्याच्या शोधात असणाऱ्या साधकाने हे लक्षात घेतले पाहिजे की या परिस्थितीचे कारण काय व त्यासाठी लोकांना कशी मदत करता येईल याचा विचार झाला पाहिजे. खरे तर या सर्व प्रश्नांचे मूळ मानवाच्या आतमध्ये आहे. आपण पशुयोनीमधून उन्नत होऊन मानवस्थितीला आलो आणि या उन्नत जीणीवेमधूनच माणसाला आपल्या हिताच्या व अवनतिपासून रोखणाऱ्या गोष्टी समजू लागल्या. तसे नसेल तर तो माणूस संवेदनाशून्य म्हटला पाहिजे. तुम्ही तसे नाही. राजकीय आर्थिक किंवा इतर कुठल्याही क्षेत्रामध्ये माणसाला खरा प्रश्न (सूक्ष्म) काय आहे तो समजलेला नसल्यामुळे ही परिस्थिती आली आहे.

मी जर म्हणाले की प्रत्येक मानवाच्या हृदयात आत्मा आहे, तो प्रकाशित आहे तर कुणाचा विश्वास बसणार नाही. हरकत नाही. पण आपले लक्षच (चित्त) मुळी आत्म्यापासून दूर आहे, 'आत्माविमुख' आहे. बाहेर आहे. म्हणून आपले चित्त आत्म्याकडे लागणे, आत्मिक विचारांकडे लागणे प्रथम जरूरीचे आहे. एरवी आपण बाहेरच्या गोष्टींचा- पैसा, सत्ता, स्पर्धा, इ... खूप विचार व कार्य करतो. पण एकदा जर माणसाचे चित्त त्याच्यामधील आत्म्याकडे लागले की त्याला आत्म्याची शक्ति प्राप्त होते. ही फार फार मोठी शक्ति माणसाला प्राप्त होते. सर्व प्रथम आत्मा प्रेमस्वरुप आहे, त्याचे प्रेम निरपेक्ष आहे; अशा माणसाच्या जीवनांतून प्रेमच-प्रेम व्यक्त होत असते. जिथे काही दुःख आहे; प्रश्न आहे त्या त्या ठिकाणी ते पोहोचते. ही क्षमता प्रत्येक माणसाच्या हृदयात आहे. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपले चित्त आत्म्याकडे नसून आत्माविमुख आहे. माणसाच्या सर्व व्यवहारांमध्ये त्याचे लक्ष सतत बाहेर असते. म्हणून स्पर्धा-चढाओढ हे प्रकार चालत राहतात. चित्त जेव्हा बाहेर असते तेव्हा त्यात शुद्धता नसते आणि चित्त सतत स्वतःमध्येच गुंतले तर माणसाच्या प्रश्नांना अंत नाही. आता मला कुठे झोपते, काय खाते या गोष्टींचेही भान नसते हे ठीक आहे पण सहजयोगी पण आता तसे बनत आहेत हा फार मोठा चमत्कार घडून आला आहे. मानवाचे चित्त आत्म्याकडे लागल्यामुळे हे शक्य झाले.

चित्त आत्मासन्मुख झाल्यावर काय काय होत असेल तर सर्वप्रथम म्हणजे तुम्हाला आरोग्य लाभते, प्रकृति सुधारली की बरेचसे प्रश्न सुटणारे असतात. एरवी मानसिक ताणतणाव, प्रदूषित अन्न इ. मुळे आजार वाढत असतात. सहजयोगात आल्यावर लोकांना समजून आले आहे की भौतिक सुख-समृद्धीमधून माणसाला शांति-समाधान प्राप्त झालेले नाही. अमेरिकेत एवढा पैसा असूनही तिथल्या लोकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे आणि शांतिसाठी कुठल्याही गुरुकडे जाण्याची संवय लागल्यामुळे गुरुंचे चांगलेच फावले आहे. पण हृदयातील आत्मा जोपर्यंत जाणला जात नाही तोपर्यंत शांति शक्य नाही कारण तोच शांतीचा स्रोत आहे. त्याचा पहिला गुण प्रेम व दुसरा शांति; तुम्ही त्यानंतर अत्यंत शांत होता, साक्षी बनता आणि जगात जे काही चालले आहे तो एक खेळ आहे असे तुम्हाला वाटू लागते; त्याची फार काळजी घेण्याची जरुर नाही, सर्व काही सुरळीतपणाणे पार पडणार आहे हे तुम्हाला लक्षात येते. म्हणून हे जाणून घेण्यासाठी मानवाला आत्मा बनले (become) पाहिजे, तेच तुमचे शुद्ध स्व-स्वरुप आहे. तुमच्याच हृदयात आहे. तिसरी गोष्ट घटित होते ती ही की आत्मा आनंद-रुपच असल्यामुळे तुमच्या जीवनातही तो आनंद खळखळत राहतो, त्या आनंदाच्या सागरातच तुमही रमून जाता; त्याच्या लाटांबरोबरच तुम्ही जगात सगळीकडे जाता आणि तेच प्रेम वाटत राहता. आत्मा हृदयस्थ असल्यामुळे कुठल्याही मानसिक वा बौद्धिक कल्पना-विचारांमधून तो जाणणे अशक्य आहे; तुमचे चित्त जर त्याच्याकडेच वळले तर तो जाणणे शक्य आहे; आणि कुण्डलिनीचे जागरण झाल्यावरच ते घडून येते, एरवी नाही.

तुमच्या जीवनातील हा बदल आणि आनंद व शांतीचा अनुभव तुम्हाला मिळाला ते तुम्ही आत्मसन्मुख झाल्यावरच मिळाला आहे. आता तुम्हाला पैशाचा विचार करण्याची जरुर नाही, तो आपणहून तुमच्याकडे चालत येणार आहे; आत्म्याची शक्ति ही सर्वात महान व धार्मिक आहे. म्हणून आता घरदार सोडून संन्यासी बनण्याचीही जरुर नाही; आजपर्यंतच्या जन्मांमध्ये तुम्ही ते सर्व करत आलात, आता या जन्मी तुम्हाला आत्म्याकडे चित्त ठेवायचे आहे. कुण्डलिनीचे जागरण झाल्यानंतर ती हळु-हळु वर येते, येताना मार्गातील सहा चक्रांना ठीक करते, त्यांच्या कार्यात एकसूत्रीपणा आणते व शेवटी टाळूमध्ये प्रवेश करते आणि त्यातून बाहेर पडल्यावर सर्वव्यापी शक्तीबरोबर एकरुप होऊन तुमचा संपर्क त्या सर्वव्यापी परमेश्वरी प्रेमशक्तीबरोबर घटित होतो. ही सर्वव्यापी शक्ति प्रेम, शांति आणि आनंदयुक्त आहे; त्यांत अतुलनीय सुज्ञताही आहे. सामान्य माणसाला ही शक्ति फार सूक्ष्म असल्यामुळे, तिची जाणीव होणे व त्यातून आपले आत्मस्वरुप जाणणे जरा अवघड आहे हे मला माहित आहे, त्याचा मला अनुभवही आहे. पण ही उत्क्रांतीवस्थेतील स्थिती आहे व आज मानवाला आत्मा बनण्याचा काळ आला आहे. या बहार-समयाचे हे आशिर्वाद आहेत. मानव जर आत्मा बनू शकला नाही. तर तो कुठल्या अवस्थेला जाऊन पोचेल मला सांगता येणार नाही. मानवाच्या उत्क्रांतीच्या प्रगतीमधील ही अत्यावश्यक पायरी आहे. सर्व ऋषी-मुनी, संत, प्रेषकांनी व

पुराणग्रंथामध्येही याचेच वर्णन केले आहे. त्याच्यानंतर वेगवेगळे धर्म झाले असतील. पण सर्वमान्य साधे तत्त्व हेच आहे की प्रत्येक मानव मूलतः आत्मा आहे आणि आपलेच आत्मस्वरुप जाणल्याशिवाय मानवाला शांति व आनंद आणि प्रेम मिळणार नाही.

इथे जमलेल्या सहजयोग्यांनी ते मिळवले आहे. त्यांना आपण पाश्चात्य देशाचे आहोत, वेगळे आहोत ही भावना नाही. या कॅम्पमध्ये जेवणा-राहण्याची-झोपण्याची फारशी चांगली व्यवस्था नाही पण ते सर्वजण आनंदात आहेत. आपापल्या देशाचे वा संस्कृतीचे काही विशेष वेगळेपण सुरवातीला जाणवले तरी त्याचे भान उरत नाही. फूल जेव्हा फळ बनते तेव्हा त्याच्या पाकळ्या गळून पडतात त्याप्रमाणेच हे होत राहते. तुम्ही सहजयोगी आता ज्ञान, सूज्ञता व प्रेमाचे फळ बनले आहात. ज्ञान मिळवण्यासाठी पुस्तके-ग्रंथ वाचण्याची तुम्हाला जरुर नाही उलट फार ग्रंथ वाचणाऱ्यांना कुण्डलिनी जागरण अवघड जाते. पण सत्य काय आहे हे तुमचे तुम्हाला जाणायचे आहे. पण आत्मसाक्षात्कार मिळाल्याशिवाय हे शक्य नाही; त्याशिवाय तुम्ही भ्रांति व भ्रम यामध्येच हरवून जाण्याची शक्यता आहे.

सहजयोगामध्ये घडून आले असेल तर ते हेच की उत्क्रांतीच्या प्रगतीमध्ये मानवाला आत्मा जाणणे शक्य झाले आहे; त्याचे चित्त आत्मसन्मुख झाले आहे. आत्म्याची शक्ति प्राप्त झाल्यावर तुम्ही जे कराल त्यात यशस्वी होत जाता. तुम्हाला ते मागायची इच्छा होत नाही. म्हणून यश मिळाले नाही तरी तुम्ही दुःखी होत नाही. म्हणून त्याच्यासाठी धडपड करायची तुम्हाला जरुर वाटत नाही. पण या सर्वासाठी एक गोष्ट तुम्ही लक्षात ठेवली पाहिजे की तुम्ही इतरांना सतत क्षमा करत राहिले पाहिजे. माणसे सर्वसाधारणपणे विचित्र वागतात, तर्काविरुद्ध वागतात. तुम्हाला जरी कुणी दुखापत करण्याचा प्रयत्न केला तरी क्षमा करा. म्हणजे त्याचा तुम्हला मनःस्ताप होणार नाही. ख्रिस्तांनीसुद्धा हेच सांगितले. ख्रिस्त म्हणा किंवा मोहम्मदसा म्हणा, त्यांनी जे जे काही सांगितले त्याला लोकांनी विपरीत करुन ठेवले. त्या सर्व संतांनी हेच सांगितले की माणसाने आपले आत्मस्वरुप ओळखले पाहिजे. पण त्यांच्या शिकवणुकीमधून अनेक धर्म निर्माण झाले व धर्मा-धर्मात भांडणे, युद्ध वाढत गेली. आता सहजयोगात वेगवेगळ्या देशातील, वेगवेगळ्या संस्कृतीमधील लोक आले, तरीही त्यांच्यात एक महत्त्वाचा गुण आहे की ते अतिशय शुद्ध आहेत; सहजयोगात अ-नीतिमत्तेचा प्रॉब्लेम मुळीच नाही. जर कुणी तसा वागू लागला तर तो एकदम बाहेर फेकला जातो; कुणी लांड्या-लबाड्या करु लागला तर तो बाहेर फेकला जातो, भ्रष्टाचारीही बाहेर फेकला जातो. एकदा आत्म्याचा प्रकाश मिळाल्यावर आपल्या हिताचे काय आहे ते प्रत्येकाने स्वतःच पहायचे असते. समजा तुम्ही आंधळे असला आणि रस्त्यावरून एकटेच चालत असला तर खड्ड्यात पडण्याची भीति असते; पण प्रकाश मिळाल्यावर लोक समजू लागले की आपण आपले नुकसान होणार नाही असे नीट योग्य तऱ्हेने कसे वागायचे रहायचे. तसे मी खड्ड्यात पडलेले लोक पाहिले आहेत पण माझ्या मनांत त्यांच्याबद्दलही प्रेमच आहे कारण ते अंधारात असल्यामुळे अज्ञानी असतात. माझ्याबद्दल काहीही बोलेले तरी मला राग येत नाही. तसेच तुम्हालाही कुणी इजा करण्याचा प्रयत्न केला तरी तुमचे नुकसान होणार नाही. कारण तुम्ही सत्याची कास धरलेली आहे.

आत्मा हा सत्याचा स्त्रोत आहे. कुणी एखादा अ-गुरु भेटला तरी तुम्हाला खरं काय ते व्हायब्रेशन्सवर आणि हाताच्या बोटांवर समजायला वेळ लागत नाही. मोहम्मदसा. म्हणालेच होते की उत्थानाच्या वेळी तुमचे हात बोलू लागतील; आणि हेच आता घटित होत आहे. ते समजल्यावर तुम्ही त्या व्यक्तीपासून दूर राहू शकता किंवा त्याला समजावून सुधारू शकता. पण सुरुवातीला अशा वादग्रस्त व्यक्तींची परीक्षा करण्याच्या फंदात आपण पडू नये. एकदा सहजयोग पचल्यावर तुम्ही हे करू शकता. शिवाय सर्व पंचमहाभूते तुमच्यासाठीच कार्य करणार आहेत हेहि तुम्ही लक्षात घ्यायला हवे. जगात घडत असणाऱ्या घटना चुकीच्या गोष्टी चुकच कशा आहेत हे दाखवण्यासाठीच घडत असतात. तसेच योग्य गोष्टी योग्यच आहेत हेहि ते दाखवतात. उदा. हिटलरने अनेक अत्याचार केले. अनेकांचा अतोनात छळ केला. पण तो मेल्यावर आता जर्मनीमध्ये अनेक लोक आत्मसाक्षात्कारी झाले आहेत आणि त्यांना प्रेम व परमात्मा यांची खरी शक्ति कळून आली आहे. ते लोक आता आश्चर्यजनक कार्य करत आहेत. इंग्लंडमध्येही, जेथून इंग्रजांनी भारतावर तीनशे वर्षे राज्य केले, तिथे आता खूप सहजयोगी झाले आहेत, तिथल्या माझ्या प्रोग्रॅम्सला सर्व हॉल भरून जाईल इतके लोक येतात. रशियामध्येही इतकी हलाखीची परिस्थिति असूनही खूप चांगले सहजयोगी तयार झाले आहेत. लोकशाही म्हणा किंवा कम्युनिझम म्हणा कशालाच यश असे मिळाले नाही. लोकशाहीमध्येही राक्षसी लोकांनी कारभार हातात घेतला आहे; कम्युनिझमलाही यश आले नाही. याचे कारण कुठलीच पद्धति आत्मिक अधिष्ठानावर आधारलेली नव्हती, त्यांचा आत्म्याशी काही संबंध नव्हता म्हणून ते सारे प्रयत्न सीमित राहिले. अर्थव्यवस्थाही सगळीकडे कोलमडली आहे आणि मंदीचे वातावरण निर्माण झाले आहे. लोक गरीबी दूर करायचे म्हणतात पण ती दान देऊन दूर होणार नाही, त्यासाठी त्यांना त्यांचा आत्मसन्मान मिळवून दिला पाहिजे. म्हणून लोकांना जर सहजयोग सांगत गेलो तर त्यांना आपोआप समजू लागेल आणि कार्य जमून जाईल. लोक मला म्हणतात की लोक गरीब का बनतात? मी सांगते की पैशाने ते गरीब असले तरी अध्यात्मिक बाबतीत ते गरीब नसतात. ज्यांच्याजवळ खूप संपत्ती आहे ते सगळेच चांगले नसतात; ते काही चांगले कार्य करत नसतात; गरीब लोकांवर, ते गरीब आहेत म्हणून दया करायला हवी असे चांगले असतातच असे नाही असेही म्हटले जाते. म्हणून काय करायला हवे तर त्या दोघांमध्येही परिवर्तन घडवले पाहिजे; त्यांना जीवनाचा अर्थ समजला पाहिजे. श्रीमंत लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाल्याबरोबर त्यांचा दृष्टिकोन बदलून ते गरीबी समजू लागल्याचे मी पाहिले आहे, ते मग मदतीचा हात पुढे करु लागतात. सहजयोगात लोक एकमेकांना कशी मदत करतात हे पाहिलेत तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्याचे कारण हेच की ही सूज्ञता त्यांना या परमचैतन्याकडून येते. या शक्तिला परमचैतन्य, निराकार, रुह, होली घोस्ट इ. काहीही नाव द्या. पण एकदा त्या शक्तिबरोबर तुमचा संपर्क जुळला की तुम्हाला सर्व आशिर्वाद प्राप्त होत असतात. साधारण माणूस म्हणून मिळत असलेल्या आशिर्वादापेक्षा हजारो पटींनी जास्त आशिर्वाद मिळतात. त्यासाठी तुम्हाला वेगळे असे करायचे काही नसते तर ते आपोआप तुमच्याकडे येतात. तुम्ही माझ्याकडे आलात, सहजयोगात आलात याच्यामागेही या दिव्य शक्तीचाच प्रभाव आहे. तुम्ही स्वतःच याचा विचार केलात तर तुम्हालाही ते समजून येईल, आणि तुमच्या हृदयांत

शांति व प्रेमाचे साम्राज्य सुरु झाल्याचे तुम्हाला जाणवेल.

माझ्याजवळ खूप शक्ती आहे असे तुम्ही म्हणता, पण मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकेन की सहजयोगी माझ्या सर्व शक्ति मिळवू शकतात. (टाळ्या पडतात) आईला तेच हवे असते; तिच्यासारखेच तिच्या मुलांनी बनावे हीच तिची इच्छा असते व हेच तिचे समाधान असते. माझे मानवजातीबद्दलचे एक महान स्वप्न आहे व ते साकार होणार आहे असे आज मला दिसत आहे. मी एक साधारण गृहिणी होते, मला पैशाचे कसलेच व्यवहार समजत नाहीत, पण मला आर्थिक प्रश्न कधीच पडले नाहीत. खरे तर माणसाची लालसाच सर्व प्रश्न निर्माण करत असते. पण समाधानी रहायची कला साधली की सर्व हाव गळून पडते आणि तुम्ही निश्चिंतपणे जगता. याचा अर्थ प्रत्येकाने साधू-संन्यासीच बनले पाहिजे असे नाही, तो काळ गेला, तुम्ही मागच्या खूप जन्मांत सर्व तपस्या केली; तुम्ही आत्म्याकडे चित्त वळवायचे एवढी एकच गोष्ट आता तुम्हाला करायची आहे; जितका प्रयत्न यासाठी कराल तितके तुमचे चित्त आंत स्थिरावणार आहे, आत्म्याच्या संपर्कात राहणार आहे. आत्मा हृदयातच असल्यामुळे तो तुमची वाटच पहात आहे; तुम्हाला त्याची जाणीव (Feeling) समजून घ्यायची आहे आणि यासाठीच कुण्डलिनीचे जागरण अवश्य आहे. मोहम्मदसा. ख्रिस्त, अब्राहम इ. कोणालाही असे स्वप्नांतही वाटले नसेल की लोक आपल्या नावाखाली निरनिराळे धर्म स्थापन करून एकमेकांशी वैरभावनेने भांडू लागतील. पण अगदी तेच घडून आल्याचे तुम्ही पाहता. ही परिस्थिती बदलण्यासाठी लोकांना शुद्ध ज्ञान (Pure Knowledge) झाले पाहिजे आणि या ज्ञानालाच सूज्ञता (Wisdom) म्हणतात. या सूज्ञतेमधूनच मी हे कार्य करत आले आहे. या सूज्ञतेमधूनच मला समजले की माणसाची स्थिति कशीही असो, त्याचे जीवन कसेही असो, त्याला अहंकार असो किंवा तो कण्डिशण्ड असो, त्याला एकदा का प्रेमाची जाणीव झाली की त्याचा आत्मा पुढचे कार्य करु लागतो. हे प्रत्यक्ष घडून आले आहे; आज इथे जमलेले लोक जगातील सहजयोग्यांच्या एक टक्काच आहेत. पण आज इथे नसलेल्या सहजयोग्यांचीही मला आठवण येत आहे. आणि या सर्व सहजयोग्यांना, सहजयोगात आल्यानंतरच 'सत्य' म्हणजे काय हे कळून आले आहे आणि 'तत् त्वम् असि' हेच ते सत्य आहे. हे सत्य एकदा तुमच्यामध्ये प्रस्थापित झाले की कशानेही तुमचा नाश होणार नाही, कशापासुनही तुम्हाला धोका नाही, तुम्हाला "अमुक हवे आहे" ही इच्छाच होणार नाही, तुम्ही कोणाचे दोष दाखवणार नाही; कशाच्या मागे धावणार नाही, इतके शांत व समाधानी व्यक्तिमत्व तुमचे होणार आहे. चार-चौघांसारखेच जीवन आपण जगावे, उगीच हिमालयाएवढी महानता मिळवू नये, अशीच माझी पहिल्यापासून प्रवृत्ति होती. आज आपल्याला सगळ्यांना बरोबर घेऊन जायचे आहे (a-mass) एकट्या-दुकट्याने उन्नति साधून उपयोग नाही. शास्त्रांतील संशोधनांचा सर्वसामान्य लोकांना फायदा मिळाला तर त्याचे सार्थक असते आणि हे मला करायचे आहे हेहि मला माहीत होते. अगोदर मला खूप मेहनत करावी लागली पण आता मी स्वतः काही केले असे मला वाटतच नाही. मी जणू फक्त साक्षी होते. प्रत्येक माणसाच्या आत वसत असलेल्या जीवाला उन्नत होण्याची, साक्षात्कार मिळण्याची इच्छा असते. ती फलद्रूप झाली की मग माणसाचे परिवर्तन होऊन इतरांसाठी काहीतरी करण्याची त्याला तळमळ लागते. इतकी वर्षे लोक सहजयोगात कसे येतील हीच मला काळजी वाटायची; त्यासाठी मिशनऱ्यांसारखी किंवा सामाजिक संस्था उभारण्याची मला जरुर वाटली नव्हती. पूर्वी मी सामाजिक संस्थासारखे कार्य करायचे पण नंतर मला कळून आले की जोपर्यंत माणूस आतमधून बदलत नाही, आत्मा बनत नाही तोपर्यंत सामाजिक कार्य करणारे एवढीच आपली भूमिका रहाते, मग अधिकार, सत्ता या गोष्टी तिथेही चालू होतात. हे सर्व बेकार असते; साध्या मुंगीलाही सामूहिकतेत कार्य करण्याची अक्कल असते. मनुष्यप्राणी नेहमी भलत्याच गोष्टींच्या मागे का धावायला बघतो मला समजत नाही; पण आत्मसाक्षात्कार नसल्यामुळे हे सर्व होत रहाते. एरवी काहीही कार्य केले की आपण फार महान कार्य करत आहोत असे माणसाला का वाटू लागते? म्हणजे स्वतःचा मोठेपणा मिळवण्याकडेच लक्ष. माणसाची खरी वाढ त्याच्या आत्म्याकडूनच होणार आहे. आत्मा हा सूक्ष्म असला तरी तुम्हा सर्वांच्या हृदयात प्रकाशासारखे त्याचे अस्तित्व आहे. आता कित्येक सहजयोगी देशोदेशी, ठिकठिकाणी जाऊन अनेकांना जागृति देत आहेत; जर्मनी व ऑस्ट्रियाचे सहजयोगी, मी रशियात प्रथम गेले तेव्हा माझ्या मदतीला रशियाला आल्याचे बघितल्यावर मीच थक्क झाले. आणि त्याचे कारण त्यांनी सांगितले की "आमच्या पूर्वजांनी इथले बरेच लोक मारले म्हणून!" माझे हृदय ते ऐकून भरुन आले. मग ते इस्त्राईलमध्येही गेले; नंतर इस्त्राईलमधील सहजयोग्यांना ते ईजिप्तमध्ये घेऊन आले. म्हणजे ही प्रेमाची भावना त्यांच्या हृदयामधून कार्यान्वित होऊ लागली, आणि आपापसातले सारे तंटे, मतभेद, वगैरे त्यामध्ये वाहून गेले.

आपल्या हृदयातील प्रेम दुसऱ्यावर कार्य करत असल्याचे पाहणे हा फार आनंददायी अनुभव आहे. लहान-सहान तसेच मोठ-मोठ्या घटना प्रेमशक्तीमुळे घडून येतात. उदा. उद्योगधंद्यांमध्ये मजूरांचा संप हा एक मोठाच प्रश्न व अडथळा असतो. पण जर लोकांना आत्मिक स्थिती समजली, त्यांची ती भूक भागवण्याची व्यवस्था केली तर हे प्रकार पूर्णपणे बंद होतील. एक प्रकारे लोकशाही, समाजवाद, कम्युनिझम या सर्वांमधील तत्त्वे एकत्रितपणे या योगामध्ये कार्यान्वित होतात. आता या समारंभासाठी सर्वांनी हसतमुखाने, वादविवाद न करता, चर्चा न करता इतकी सुंदर व्यवस्था केली आहे हे तुम्ही पहातच आहात. एरवी माणसे एकत्र आली की कामाच्या ऐवजी बडबड करतील. अशा तऱ्हेने सर्व माणसेच एकत्रितपणे काम होईल असे वातावरण तयार करतात. समाजवादी लोक गरीब, दरिद्री वर्गातील लोकांसाठी कार्यपद्धति बनवतात. एकदा मी माझ्या वडिलांबरोबर चांदा जिल्ह्यात गेले होते तर तेथील लोक फक्त कमरेभोवती एक वस्त्र गुंडाळून रहायचे हे दिसले. नंतर सहजयोग्यांच्या मदतीने त्यांना कुंभार-व्यवसाय जमवून दिला आणि आता त्यांचे जीवनमान खूप सुधारले आहे. म्हणजे प्रश्न समोर आला की सामूहिकतेमधून तो सोडवता येतो. तसेच बेवारशी, निराधार मुलांकरता काही कार्य करायचे मी सुचवल्याबरोबर सहजयोग्यांनी एकत्र येऊन जमिन घेऊन सर्व जमवून आणले. अशा तऱ्हेने तुमचे चित्त शुद्ध प्रेमाने व्यापून गेले की कितीतरी गोष्ट करणे शक्य आहे; कारण या प्रेमामधूनच कार्य करायचे; कसे करायचे ही सूज्ञता माणसामध्ये वाढते; प्रेम शुद्ध असले की कसल्याही समस्येचे सर्वांगीण आकलन तुम्हाला होते आणि म्हणूनच प्रेमातून कार्य होते. आज जगामध्ये कशाची जरुरु असेल तर ती प्रेमाची; प्रेमातूनच तुम्ही दुसऱ्यांच्या हृदयांत प्रवेश करू शकता. पण त्याच्यामागे पैसा,

बक्षिस, अधिकाराचे पद अशी कसलीही लालसा नसावी. फक्त शुद्ध, निरलस प्रेम, आणि याचा प्रत्ययही आता तुम्हाला आला आहे. तुम्ही लोकांसाठी प्रयत्न करता, वेळ खर्च करता, कार्य करता या सर्वांबद्दल मीच तुमची ऋणी आहे. मला एकट्याला हे करणे शक्य नव्हते. एकट्याला जगभर हिंडणे शक्य नव्हते; काही पूर्णपणे मुस्लीम लोकांच्या देशामध्येही मी आता जाऊन आले आहे आणि खूप मुसलमान लोक आता सहजयोगात आले आहेत; त्यासाठी फ्रेंच, इंग्रज लोक त्यांच्या देशात गेले; ऑस्ट्रियन, इटालियन लोकही सहजयोगाच्या प्रचारासाठी खूप कार्य करत आहेत. त्यातही लोकांना "अमुक करू नका, अमुक सोडून द्या" वगैरे काही सांगावे लागत नाही, ते सर्व आपोआप घडून येते, सवयी सुटतात. मी तर कुणाला कधीच त्या बाबतीत सांगत नाही; या व्यसनांची सवय कशी सुटते मलाही कळत नाही... पण हे घडते त्याचे कारण आत्म्याचा प्रकाश तुमच्यामध्ये पडतो आणि त्या प्रकाशात तुम्ही तसले काही करतच नाही. आता शीख किंवा मुसलमानात दारु पिण्याला मनाई आहे पण कितीतरी शीख व मुसलमान लोक दारु पिणारे असतात; म्हणजे ते खरे शीख किंवा मुसलमान नाहीच. म्हणून आत्मप्रकाश मिळाल्यावरच या अहितकारक गोष्टी गळून पडत असतात. कधी कधी निराशा किंवा एकटेपणामुळे लोकांना अशा सवयी लागतात. पण सहजयोगात एकटेपणा नसतोच; कारण तुमचे भाऊ-बहिणी जगभर आहेत आणि हे संबंध लौकिक व्यवहारासारखे नसून ते नाते खूप गहन असते. साधारणतः पाश्चात्य लोकांत कसल्या ना कसल्या साधना-मार्गात जाऊनही काही प्राप्त न झाल्यामुळे अस्वस्थता आलेली असते आणि सहजयोगात त्यांना ते प्राप्त झाल्यामुळे ते लवकर गहनतेत उतरू शकतात.

आज जगात सत्याच्या शोधात असलेले अनेक साधक आहेत. त्यांना आजकालच्या परिस्थितीचा वीट आला आहे कारण ते फार संवेदनशील आहेत. म्हणूनच तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. त्यासाठी मला असे विशेष काही करावे लागले नाही. तुम्ही मेणबत्तीसारखे नसता तर मी तुमच्यामध्ये प्रकाश आणू शकले नसते. तुम्ही सहजयोगाबद्दल इतकी आत्मीयता बाळगता याचे मला फार समाधान आहे. तुम्हाला सामूहिकतेतून कार्य करायचे आहे, जगभर हा संदेश पसरवायचा आहे ही जाणीव आता आहे याचेही मला समाधान आहे. एकमेकांना मदत करून साऱ्या मानवजातीला वर आणण्यासाठी तुम्ही आता सिद्ध आहात. माणसाचे मन आत्मासन्मुख करायचे आहे. मग सारे प्रश्न संपणार आहेत. उदा. मी म्हटले की निराधार मुलांसाठी मला काहीतरी करायचे आहे तर ताबडतोब सगळीकडून माझ्याकडे पैसे येतात. मग माताजींच्या या कार्यासाठी योग्य ती माणसे ते शोधून काढतील, सर्व व्यवस्था कशी जमवायची इ. सर्व काही तयारीला लागतील. मला काही सांगायची जरुर नाही, पैसे तर मी कुणाकडेच मागत नाही. असे कार्य जर भारतात होऊ शकते तर जगात कुठेही ते होऊ शकेल. कारण तो प्रश्न जगभर आहे म्हणून त्यांना ते कार्यही जगात सगळीकडे करण्याची उत्सुकता आहे. हे सर्व एखाद्या संप्रदायासारखे कार्य नाही. ते तुमच्या सूक्ष्म व अंगभूत शक्तीमुळे घडणारे कार्य आहे. त्यामुळेच या कार्याचा तुम्हाला आनंदही मिळत असतो. कधी कधी सहजयोग्यांमधील जगामधील सर्व मानवजातीबद्दलची तळमळ बघून मलाच आश्चर्य वाटते. आता प्रत्येक देशाचे काही ना काही विशिष्ट प्रश्न असतात. उदा. उत्तर भारतातील लोकांना राजकारणाबद्दल जास्त इंटरेस्ट असतो. आता ते फार कमी झाले आहे आणि त्यांना कुणाबद्दलही कुणी सांगितलेले आवडत नाही. ही चांगली गोष्ट आहे. दक्षिणेकडचे लोक मात्र फार कर्मकाण्ड पाळणारे आहेत. जेवायच्या थाळीमध्येही प्रत्येक पदार्थाची विशिष्ट जागा पाळावी लागते. एका हातानेच जेवायचे इ. अनेक नियमांबद्दल काटेकोरपणा पाळावा लागतो. या दोन गोष्टींमुळे त्यांची सहजयोगात प्रगति होत नाही. उदा उत्तर भारतात कुणी एखादा दुसऱ्या कुणाबद्दल वाईट सांगू लागला तर कानावर हात ठेवतात. म. गांधींचे हेच तत्त्व होते; फालतू गप्पा ऐकू नये. पण लोकांना तेच आवडते; आता निवडणुकीच्या आधी टी.व्ही. वर कार्यक्रम दाखवतात ते सुद्धा सर्व gossip च. म्हणून उत्तर भारतीयांना माझे आग्रहाचे सांगणे आहे की असल्या गप्पागोष्टी कधीही ऐकू नका, कुणावर टिकाही करू नका; त्याचा काही उपयोग नाही. त्याच गप्पा तुम्ही दुसऱ्यांना सांगत बसला तरी त्याचा काय फायदा? नाही तरी दुसऱ्यामध्ये काय वाईट आहे तिकडे कशाला बघायचे? हां, तो तुमची फसवणूक करेल वगैरे ठीक आहे पण त्यामुळे तुमचे काही नुकसान होणार नसते; शिवाय त्यामुळे तुमच्या डोक्यात तरी काही भलते-सलते विचार येणार नाहीत आणि तुम्ही आत्मा असल्यामुळे त्याला कधी कोणी त्रास देऊ शकत नाही; आत्म्याचा कसल्याही शस्त्राने घात होऊ शकत नाही, तो सनातन आहे, अमर आहे असे म्हटलेच आहे. म्हणून आत्माविमुखता आड येत असते. आपले चित्त आत्म्यापासून दूर होऊन बाहेरच्या गोष्टींकडे लागल्यामुळेच माणसाचे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत. एकदा तुम्ही आत्म्याशी एकरुप झालात की तोच सारे काही करत राहतो. कारण तो परमात्म्याशी जोडलेला आहे, सर्वव्यापी शक्तीबरोबर जोडलेला आहे आणि ती शक्तीच सर्व काही करत असते.

ह्या सर्वव्यापी शक्तीने माझ्या फोटोमधूनही अनेक चमत्कार दाखवले आहेत. ते काही मी सांगितलेले नाही तर ती शक्तीच आपणहून करत आहे. ती फार कार्यक्षम आहे, जिथे गहनता आहे, सूक्ष्मपणा आहे तिथे ती कार्य करणारच. तुमच्या कुटुंबात, व्यवसायात, राजकारणात सर्व क्षेत्रामध्ये हा प्रकाश तुम्हाला दिसेल. आणि प्रत्येकाच्या हृदयस्थ आत्म्याबद्दल तुम्हाला आदर वाटेल, त्यांच्या प्रेमाचा आदर वाटेल म्हणूनच तुम्हा सर्वांमध्ये एकमेकांबद्दल आदरभाव आहे. मला हे सर्व जाणवत आहे.

तुम्ही इतक्या मोठ्या संख्येने माझ्या वाढदिवसासाठी आलात म्हणून मला फार आनंद झाला आहे. या निमित्ताने मला तुम्हा सर्वांची भेट होत आहे. इथे इतर क्षेत्रातील काही मोठ्या पदावरचे अधिकारी लोक, राजकारणी, उद्योजक पण जमले आहेत. त्या सर्वांनीही जीवनांतील अध्यात्मिक मूल्ये समजून घ्यावीत कारण आत्म्याबरोबर राहणे हा तुमचा अधिकारच आहे आणि त्यांतच तुमचा मोठा गौरव आहे. तुम्हा सर्वांचे आभार कसे मानवे हे समजत नाही; मला हीच आशा आहे की तुम्ही तुमच्या आध्यात्मिक जीवनात खूप उन्नत व्हाल (आत्मोन्नति) म्हणजे तो प्रकाश संपूर्ण मानवजातीला मिळून या धरतीवर एक नवीन सुंदर जग निर्माण होईल.

सर्वांना परमेश्वराचे अनंत आशिर्वाद.

●●●

# सहज-समाचार

**वाढदिवस समारंभप्रसंगी सर**

**सी. पी. श्रीवास्तवसाहेबांनी केलेले भाषण** (दिल्ली २० मार्च '९८)

श्री निर्मला माताजी– मी श्री माताजी असे संबोधन वापरण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे– या ७५ व्या वाढदिवसाची वेळच मी त्यांना आता पूर्णपणे शरणागत व समर्पित होण्याची आहे– श्री. पटवाजी, श्री. रिझवीजी, श्री. राहुल बजाजजी आणि प्रिय सहजयोगी बंधु-भगिनींनो, आज तुमच्याबरोबर या वाढदिवसाच्या अलौकिक प्रसंगी सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले आहे. श्री. चिदंबरांनी मला विचारले, की जगभरातील इतके लोक इथे एकत्र समभावाने कसे काय आले? उत्तर म्हणून मी एक जुना प्रसंग सांगतो. ही १९७४ सालची गोष्ट आहे. त्यावेळी मी लंडनमध्ये नोकरी करमत होतो आणि आम्ही या गावी Oxstead या गावी रहात होतो. एके दिवशी मी ऑफिसमधून घरी आलो आणि हॉलमध्ये एक अनोळखी तरुण सोफ्यावर बसलेला पाहिला. आम्ही एकमेकांना ओळखत नसल्यामुळे क्षणभर एकमेकांकडे पहात बसलो, आणि माझ्या लक्षात आले की त्याने माझाच कुडता-पायजमा अंगात घातला होता. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. मग मी आत जाऊन हा माणूस कोण आहे अशी माझ्या पत्नीजवळ चौकशी केली. मग तिने सांगितल्यावर मला कळले की त्या दिवशी ती सर्कस पहायला गेली असताना तिथे हा माणूस अगदी दीनवाणा, निर्वासितासारखा, आजाराने बेजार झालेला अशा अवस्थेत पाहिला म्हणून त्याची चौकशी केली. त्याच्या सांगण्यावरून तिला कळले की तो मरणाच्या पंथाला लागलेला होता व त्याच्या घरचे व नात्याने कोणीच जवळ नसल्यामुळे तो असहाय होता. मग तिला करुणा वाटली व ती त्याला घरी घेऊन आली. त्याला माझे कपडे घालायला दिले. तिच्यामधील प्रेम व करुणेचा हा आविष्कार मला कौतुकास्पद वाटला आणि माझी काळजी मिटली– तो तरुण आमच्या घरी दोन-तीन महिने राहिला; त्याला सहजयोग दिला. सहजयोगाचे उपचार केले आणि अगदी थोड्याच दिवसांत तो सुधारू लागला. एवढेच नव्हे तर त्याची कावीळ बरी झाली; त्याची मादक व्यसने सुटली, दारु पिणे बंद झाले आणि दोन महिन्यांतच तो अगदी टवटवीत झाला. मी पाहिलेला हा पहिला चमत्कार होता. मशीन दुरुस्त करून चालू करणे शक्य आहे पण जिवंत माणसामध्ये परिवर्तन घडवून आणणे माताजी निर्मलाजींशिवाय दुसऱ्या कुणाला शक्य नाही.

खरे तर माणसामध्ये परिवर्तन होणे फार अवघड गोष्ट आहे आणि हे परमेश्वरी प्रेमशक्तीमधूनच होणे शक्य आहे आणि वर सांगितलेला चमत्कार श्री. माताजींनीच घडवून आणला. त्यानंतर त्यांनी जगभर असे असंख्य चमत्कार केले आहेत. श्री. पटवाजी, मी तर प्रत्येक सहजयोग्यामध्ये हा चमत्कार घडलेला पाहतो, प्रत्येक सहजयोगिनी मला यक्षिणी वाटते. मी असे म्हणतो याला कारण हेच की ज्या मणाणसामध्ये असे अंतरंगामध्ये परिपूर्ण परिवर्तन घडून आले आहे, ज्याला आत्मसाक्षात्काराचा अनुभव मिळाला आहे, ज्याला परमेश्वरी सर्वव्यापी प्रेमशक्तीबरोबर योग मिळाला आहे, तो माणूस खरोखरच यक्ष-गंधर्व अशा संज्ञेलाच लायक आहे. आणि त्यांच्यासमोर साक्षात् आदिशक्ती अवतरली आहे. पृथ्वीवर जणू स्वर्गच उतरला आहे. आपण खरोखर श्री. माताजींना पूर्णपणे जाणू शकतो का? आपण त्यांची १०८ नावे म्हणतो पण त्या नावांच्याही पलीकडे त्या आहेत; त्या असीम आहेत; म्हणून नावामधून त्यांचे वर्णन पुरेपूर होणे शक्य नाही, मनाच्या कल्पनांमधून ज्यांना जाणणेही शक्य नाही. एका उर्दू कवितेत म्हटले आहे, "जो समझमे आ गया, फिर वह खुदा क्यों कर हुआ", जो मनाकडून अजाणला जाऊ शकतो तो परमेश्वर असू शकत नाही. थोडक्यात परमेश्वराला जाणणे अशक्य आहे; त्याचे सर्व गुण, त्याची असंख्य रूपे यांचे वर्णन करणे शक्य नाही. श्रीमाताजींची या कार्याची संकल्पना अफाट आहे. उत्तुंग आहे. लाखांनी लोक सहजयोगांत आले पण अजून कोट्यावधी लोकांपर्यंत तो पोचवायचा आहे; जोपर्यंत त्या दुर्दैवाने उरलेल्या प्रत्येक माणसामध्ये सहजयोगांतून परिवर्तन घडून येत नाही तोपर्यंत आपल्याला श्री माताजी हव्या आहेत. उर्दू मधला एक शेर आहे, "तुम सलामत रहो हजारों बरस, दिन हो सालके पचास हजार" म्हणून आपण प्रार्थना करू या की, "श्री माताजी, तुम्ही हजार वर्षे इथे रहा; त्या हजार वर्षांचे प्रत्येक वर्ष फक्त ३६५ दिवसांचे नसून पन्नास हजार दिवसांचे असू दे." मी तर एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणेन, "या जगातील प्रत्येक व्यक्ती संतपदाला येईपर्यंत आम्हाला तुमची जरूर आहेच पण त्यापुढेही असे सर्व जीव अनंत काळापर्यंत संतच (Angels) रहावेत म्हणून आम्हाला तुम्ही तोपर्यंत हव्या आहात."

प्रिय सहजयोगी बंधु-भगिनींनो, या वेळेस मला तुम्हाला सर्वांकडून मिळालेले प्रेम, स्नेह, आपुलकी याबद्दल मी खरोखरच ऋणी आहे आणि त्याबद्दल मला तुम्हा सर्वांचे आभार मानलेच पाहिजेत. आज मला तुम्ही सहजयोगामध्ये तुमच्याबरोबरचा म्हणून सहभागी करून घ्या, हीच माझी प्रामाणिक इच्छा आहे.

सर्वांचे पुनःश्च आभार

●●●

वाढदिवस समारंभाचे वेळी जर्मनीचे श्री. फिलिप्स झिस (Phillips Zeiss) यांनी केलेले भाषण (२० मार्च ९८)

प. पू. माताजी, आदरणीय सर सी. पी, उपस्थित मान्यवर आणि सहजयोगी बंधु-भगिनींनो,

काल येथील संयोजकांनी आम्हाला इथे भाषण करण्याची परवानगी दिली पण त्याचबरोबर तीन मिनिटांपेक्षा जास्त बोलू नका असे सांगितले. मग मला फार मोठा प्रश्न पडला की श्री.

माताजींच्या समोर उभे राहून फक्त तीन मिनिटांत त्यांच्याबद्दलचे माझे प्रेम, ऋण व भावना कशा व्यक्त करणार? पण मग माझ्या लक्षात आले की श्री. माताजींनीच आपल्याला दिलेल्या शक्तीकडून हे काम सहज होण्यासारखे आहे. श्री. माताजी, आपण आदिशक्ती आहांत आणि या विसाव्या शतकात आपण या पृथ्वीवर अवतरण घेतले आहे याबद्दल फक्त तीन मिनिटांत मी आपले आभार कसे मानू? आपण सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी आणि उत्थानासाठी अपार कष्ट करता याबद्दल फक्त तीन मिनिटांत मी आपले आभार कसे व्यक्त करु? श्री माताजी, आपण हजारो-लाखो सहजयोग्यांना आत्मसाक्षात्काराची दिव्य देणगी दिली आहे त्याबद्दल फक्त तीन मिनिटांत मी आपले आभार कसे मानू? मी आपल्याला प्रथम भेटलो तेव्हा एक निराश, गोंधळलेला आणि दिशाहीन तरुण होतो; तुम्ही मला आत्मसाक्षात्कार दिला एवढेच नव्हे तर तुम्ही मला कुटुंब दिले, व्यवसाय दिला, समाजात इज्जत व मान दिलात आणि सर्वात मुख्य म्हणजे आपल्या परमेश्वरी कार्याला हातभार लावता येईल अशी संधि व स्थान मला सहजयोगांत दिले; मग मी फक्त तीन मिनिटांत आपले आभार कसे मानू? या सगळ्या विचारांची गर्दी इथे येतांना माझ्या डोक्यात होती आणि मग अचानक कवितेतून माझ्या भावना व्यक्त कराव्यात अशी भावना मला झाली ती कविता :

The star shines a billion nights,
And is still not able to express your beauty.
The Sun is shining a billion days,
And is yet not able to reflect your light.
The Nature has nourished a billion plants,
But has never been able to equalize you in motherly love.
The learned men have filled billions of tages with knowledge,
But have never been able to reflect a glimpse of your wisdom.
The poets have written billions of verses,
But have never been able to describe the magic of your divine being.
How then can I be able to thank you
only in three minutes?

●●●

प. पू. माताजींच्या ७५ व्या वाढदिवस समारंभाच्या वेळी दिल्ली येथे २२ ते २५ मार्च या चार दिवसांत आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध कलाकारांनी श्री. माताजींच्या उपस्थितीत संगीताची मेजवानी सहजयोग्यांना दिली. त्या सर्व कलाकारांचा श्री. माताजींनी आशीर्वाद देऊन सत्कार केला. या चार दिवसांच्या कार्यक्रमात खालील कलाकारांनी भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| श्रीमती वनाजीलाल कोण्डापार्थी | : | कुचिपुडि व भरतनाट्यम् नृत्य |
| पं. वैभव पंढरिनाथ नागेशकर | : | तबला |
| पं. भजन सोपोरी | : | संतुर वादन |
| डॉ. राजम् | : | व्हायोलिन वादन |
| श्रीमती झरीन दारुवाला | : | सरोद वादन |
| पं. बिश्वमोहन भट्ट | : | मोहन वीणा |
| रोनू मुजुमदार | : | बासरी वादन |
| श्रीमति मीना पातरणेकर | : | शास्त्रीय संगीत |
| पं. जगन्नाथ मिश्र | : | शहनाई वादन |
| श्रीमती किर्ति शिलेदार | : | गायन |
| पं. सतीश व्यास | : | संतूर |

●●●

पुण्याजवळ खानापूर या ठिकाणी (शांतिवन) सहजयोग्यांच्या मुलामुलींचे तीन दिवसांचे (२४ ते २७ ऑक्टोबर ९८) शिबिर आयोजित करण्यात आले. रहाण्याची व जेवणा-खाण्याची व्यवस्था अर्थातच याच ठिकाणी केली होती. धरण व नदी जवळच असे हे स्थान अगदी शांत, निसर्गरम्य व वनराजींनी भरलेले असल्यामुळे सर्व वातावरण अशा शिबीरास पोषक व आनंददायक होते. जवळ-जवळ चाळीस मुले उपस्थित होती व पालकांना शिबिरावर येण्यास जाणून-बुजून परवानगी दिलेली नव्हती.

शिबिरामध्ये मुलांचे सकाळ-संध्याकाळ सामूहिक ध्यान होत असे. त्याचप्रमाणे रोज सर्व मुलांकडून सामूहिक मीठपाणी ट्रीटमेंट करवून घेण्यात येई व त्या ट्रीटमेंटची पद्धत व उपयोग समजाऊन दिला गेला. तसेच पूजा व हवन याची तयारी मुलांकडूनच करवून घेतली व सर्व विधि समजाऊन त्यांच्याकडून पूजा करवून घेतली. त्याचप्रमाणे चक्रे, चक्रांची स्वच्छता, ध्यानाचे महत्त्व, जागृति देणे इ. सहजयोगाची माहिती देण्यात आली.

त्याबरोबरच रहाण्याची व कपड्यालत्त्यांची त्यांची स्वच्छता, स्वावलंबन, सद्वर्तन व नीतीमित्तेची जपणूक, कुटुंबातील नातेसंबंध इ. गुणांचा विकास करून व्यक्तिमत्त्व घडवण्याचे महत्त्व इ. बाबतीत मार्गदर्शन दिले गेले. शिवाय मुलांकडून शिबिरातील कार्यक्रमाविषयी रोज रोजनिशी लिहून घेतली व त्यांना शिबिराबद्दलची प्रतिक्रिया लिहून देण्यास सांगितले होते. त्यानुसार सर्व मुला-मुलींना शिबिरामधून मनसोक्त आनंद मिळाल्याचे आढळून आले.

कला-गुणांना उत्तेजन देण्यासाठी मुलांकडून कलाकुसरीच्या वस्तू, मातीची भांडी, ग्रीटिंग कार्डस्, बाहुल्या, रांगोळी इ. कलांमध्ये उत्तेजन देऊन त्यांच्या आवडीनुसार वस्तू तयार करवून घेतल्या. सर्वांना संगीताचीही सहजयोगासंदर्भातील माहिती सांगण्यात आली.

शिबिराच्या समारोपाच्या निमित्ताने एक सांस्कृतिक कार्यक्रम झाला व फक्त याच कार्यक्रमाला मुला-मुलींच्या पालकांना आमंत्रण होते. या वेळी मुला-मुलींनी भजन, नाटक, गायन, नृत्य इ. कलाप्रकार सादर केले. वक्तृत्व-स्पर्धाही झाल्या. कार्यक्रमाच्या शेवटी बक्षिसे देण्यात आली.

या शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शिबिराची संकल्पना, संपूर्ण आयोजन व व्यवस्था पुणे केन्द्रामधील महिला सहजयोगिनींनी सांभाळली व यशस्वीरीत्या पार पाडली. ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे.

●●●

# श्रीकृष्ण पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण कबेला : ऑगस्ट ९८**

श्रीकृष्णांची एक महत्त्वाची शक्ति म्हणजे साक्षीभाव. याचे या कलियुगामध्ये विशेष महत्त्व असण्याचे कारण की आजकाल सगळीकडे गोंधळ, मूल्यांचा ऱ्हास व उलथापालथ चाललेली असल्यामुळे साधारण माणसाचे जीवन फार अवघड प्रश्न बनले आहे. ध्यानामधून निर्विचारता आल्यानंतरच साक्षीस्वरुप स्थिति मिळते. खरे तर ह्या दोन्ही गोष्टी एकत्रच असतात. साक्षीरुप स्थितीमध्ये तुमची प्रतिक्रिया व्यक्त करण्याची सवय संपते. या प्रतिक्रिया करण्यामुळेच सारे प्रश्न सुरु होतात. प्रतिक्रिया नेहमी आपल्या अहंकार व कण्डिशनिंगमुळे होत असते हे उघड आहे; त्याला दुसरे काही कारण लागत नाही. उदा. या कारपेटकडे बघूनही लगेच अहंकारामधून ते कुठून मिळाले असेल असा विचार आपल्या डोक्यांत येतो; किती किंमत असेल हाहि आणखी एक विचार येतो. मग पुढे कारपेट कशाला आणले, इथे त्याची काय गरज आहे इ. विचारांची साखळी सुरु होते. कण्डिशनिंगमधून विचार आले तर हा रंग बरोबर नाही, कृष्णपूजेसाठी दुसरा चांगला रंग त्यामध्ये हवा होता अशी विचारांची साखळी सुरु होते. म्हणजे हे कण्डिशनिंग आपल्यामध्ये ठाम घेऊन राहते; आणि त्यामुळे आपल्याला अनेक त्रास होतात. उदा वर्ण-जाती-भेद; अमेरिकेत वर्णभेद फारच आहे; उघडपणे ते मान्य करत नसतील पण भारतातून किंवा इटलीमधून तिकडे गेलेल्या लोकांना तो जाणवतो. हे भेदभाव का व कसे निर्माण झाले? दुसऱ्या रंगाच्या (काळा-गोरा) व्यक्तींबद्दल आपल्याकडून प्रतिक्रिया का होते? खरे तर हा नुसता कातडीचा रंग असतो पण विचित्र विचारसरणीमुळे गोऱ्यांना वाटते की हे काळे लोक बाहेरुन आपल्या देशांत आले. ते बेकार लोक आहेत, आपल्याला त्रास देतात इ. ह्या प्रवृत्ति कण्डिशनिंगमुळे बनलेल्या असतात. पण अमेरिकन लोकही एके काळी बाहेरुनच त्या भूमीवर आले, तेथील मूळ रेड-इंडियन लोकांना हाकलून त्यांच्या जमिनी बळकावल्या व स्वतःला अमेरिकन म्हणू लागले आणि प्रतिक्रिया म्हणून काळ्या वर्णाचे लोक भिकार आहेत, त्यांचा धिक्कारच केला पाहिजे व त्यांना छळलेच पाहिजे हा विचार बळावला. तसेच स्वभावतः जे लोक विध्वंसक असतात त्यांच्या कण्डिशनिंगमुळे हिंसक वृत्ति बळावते; मग लोकांना ठार मारण्याचे प्रकार सुरु होतात; त्यांनी अनेक लोकांची हत्या केली आहे. त्यांना वाटते की कुठल्याही देशावर स्वारी करुन तो पादाक्रांत करण्याचा त्यांचा अधिकारच आहे. खरे तर जमिन ही कुणाच्याही मालकीची होऊ शकत नाही, म्हणून परक्या जमिनीवर आक्रमण करुन तेथील रहिवाशांना हुसकावून लाऊन जमीन बळकावण्याचा कुणालाच अधिकार नाही. काल भारतामध्ये स्वातंत्र्यदिन साजरा झाला; त्या काळी परकिय इंग्रज सत्तेचा युनियन जॅक खाली आणून त्याच्या जागी स्वतंत्र भारताचा तिरंगा चढवलेला मी पाहिला आहे. त्यासाठी पुष्कळ लोकांनी कष्ट घेतले, त्रास सोसले व त्याग केला. याला कारणही तेच. इंग्रज लोक बाहेरुन बाजारासाठी भारतात आले, तिथेच स्थायिक झाले आणि कालांतराने आपलेच राज्य तिथे प्रस्थापित केले. कण्डिशनिंगचा हा प्रकार सामूहिकतेत दिसून येतो म्हणजे एका जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीच्या देशावर आक्रमण करुन तो बळकावणे हे दुसऱ्याच्या घरांत घुसून त्याला हाकलून घरावर ताबा मिळवण्यासारखेच आहे. त्यांना वाटते की आपण जास्त बुद्धिवान आहोत, काळ्या लोकांवर राज्य करण्याचा आपला अधिकारच आहे. ही प्रवृत्ति साक्षीरुप स्थिति मिळवण्यासाठी उपयोगी नाही. (इथे एका रडणाऱ्या लहान मुलाला पाणी पाजण्यास श्री माताजी सांगतात.) ह्या प्रकारचे कण्डिशनिंग प्लेगच्या साथीसारखे एका देशांतून दुसऱ्या देशांत पसरते आणि मग लोकांमध्ये उच्च-नीच भेद निर्माण होतो व त्यांतही परिस्थितीला शरण येऊन स्वतःला हलक्या जातीचे म्हणवण्यास मान्यता मिळते.

आता अमेरिकेकडे पहा; अमेरिकन लोक ही पूजा करत आहेत आणि श्रीकृष्ण अमेरिकेचे राजे आहेत. श्रीकृष्ण स्वतः काळ्या रंगाचे, पण अमेरिकेतील हे सर्व कृष्णवर्णी लोक तो देश सोडून परत गेले तर त्याची काय अवस्था होईल मला सांगता येणार नाही. तेथील सर्व क्रीडा-व्यवस्थापन काळे लोक बघतात. अमेरिकेत होत असलेल्या बहुतेक खेळांमध्ये नव्याण्णव टक्के लोक कृष्णवर्णीय असतात. तोच प्रकार संगीत-क्षेत्राचा, इथेही काळे लोक जास्त आहेत, गोऱ्या लोकांजवळ त्यांच्यासारखा गळा नाही; गाण्यामध्ये गोरे लोक काळ्या रंगाच्या कलाकारांच्या तुलनेत काहीच नाहीत. कृष्णवर्णीय डॉक्टर्स, इंजिनियर्स, अकौंटन्टस्, आर्किटेक्टस् इ. लोक निघून गेले तर अमेरिकनांची काय अवस्था होईल? पण त्यांच्या लक्षांतच येत नाही की बुद्धिमत्तेचा, मूल्य-संस्कारांचा व आत्म्याचा तुमच्या वर्णाशी काहीही संबंध नाही. आपण इथे आपली अध्यात्मिक उन्नति मिळवण्यासाठी आलो आहोत. आत्म्याला रंग समजत नाही, म्हणून रंगामुळे कुणालाही हलक्या जातीचा समजणे हा उथळपणा आहे. आता त्याची प्रतिक्रिया कशी होते पहा; त्यांतून काळ्या लोकांनी आता प्रतिकार सुरु केला आहे आणि दिवसें-दिवस हे प्रकार वाढत आहेत. अमेरिकेतच नाही तर जगभर सगळीकडे आता काळे लोक आवाज देत आहेत. काळ्या लोकांच्या देशांतही काळ्या वर्णामध्ये थोडे-फार फरक आहे आणि त्याचा परिणाम म्हणून त्या लोकांमध्येही निरनिराळे ग्रुप्स् बनले आहेत व त्यांच्या एकमेकांमध्ये मारामाऱ्या चालल्या आहेत. हा कौरव-पांडव असा भेद नाही किंवा पॉझिटिव्ह-निगेटिव्ह असा भेद नाही. गोरे काय आणि काळे काय सारे निगेटिव्हच आहेत. ही विध्वंसक प्रवृत्ति फार बळावत आहे. किंबहुना हिंसाचार हे एक शस्त्रच आजकाल बनले आहे, प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा हा राजरोस चाललेला प्रकार आहे. काहीतरी निमित्त मिळाले की स्फोट घडवून आणले जातात; त्यांत

निरपराधी लोक प्राणाला मुकतात. हे सर्व घृणास्पद आहे. श्रीकृष्णांच्या भूमीमध्ये तर अशा निर्दय विध्वंसक कारवायांना कठोर शिक्षा मिळाली पाहिजे.

हे सर्व अहंकारामधून येते. तुम्ही एका जातीचे स्वतःला समजता आणि दुसऱ्या जातीच्या लोकांना हलक्या जातीचे समजता. माणसाच्या मनांत अशा अनेक चुकीच्या धारणा असतात. असे म्हणतात की हे द्वेष-भावनेतून निर्माण होते पण द्वेषाची भावनाही अहंकारामुळे होते. अहंकार जेव्हा कार्य करु लागतो तेव्हा तो अशा अनेक विचारांना उद्दीपित करतो. द्वेष, विध्वंस, हक्काचा दुराग्रह इ. सर्व अहंकारामधून आलेल्या आंधळेपणामुळे चालू होते. तुम्ही वास्तवापासून दूर जाता आणि कुणाचा द्वेष करण्यामुळे, कुणाचा खुन केल्यामुळे वा कसला विध्वंस करुन कुणाचाही कसलाही फायदा नाही हे विसरुन जाता. आता तुम्ही विचाराल की माताजी हा अहंकार कसा पैदा होतो? तर हा अहंकार कर्मामुळे येतो, तसाच कण्डिशनिंगमुळे येतो. मुलांनाही लहानपणापासूनसारखे सांगत राहिले की अमकी माणसे खराब आहेत, त्यांचा द्वेषच करा किंवा त्यांना मारलेच पाहिजे तर ती मुलेही ह्याच मार्गाला लागतात. मग ह्या द्वेष करण्याच्या प्रवृत्ति कॅक्टससारख्या फोफावतात. मनुष्यप्राण्याच्या अशा वागणुकीचे समर्थन होऊ शकत नाही. माणसांना मानवीजीवनच जगले पाहिजे आणि हे साक्षीभाव मिळवल्यावरच शक्य आहे; त्याचबरोबर प्रतिक्रिया करणेही थांबवले पाहिजे. कोंबड्याची झुंज करवण्याचे, बैलांची मारामारी करण्याचे खेळ (धंदे) जोरात चालतात. अशा तऱ्हेच्या हीन प्रवृत्ति लोकांच्या मनात अजूनही शिल्लक आहेत. शांति, आनंद, मानवता इ. भाषा राजरोसपणे वापरणारे लोकही या विनाशकारी गोष्टींमध्ये रमतात ही फार खेदाची गोष्ट आहे. काही लोक यात सक्रिय असतात तर काही बघे असतात पण अशा दुष्कृत्यांमधून ते विकृत आनंद मिळवत असतात इतक्या अधोगतीला ते आले आहेत.

अशा परिस्थितीत तुम्ही साक्षी बनू शकलात तर काय होते? तुम्ही हा साक्षीभाव बळकट केलात तर या गोष्टी कमी-कमी होतील. तसेच तुमच्या दृष्टीसमोर तरी असे अपघात होणार नाहीत आणि जरी झाले तरी त्या दुर्ग्रस्त लोकांना तुम्ही मदत करायचा व वाचवायचा प्रयत्न करु शकाल. अशा प्रसंगी छोट्या-छोट्या मदतीची तुम्हाला प्रेरणा होईल, शिवाय तुम्ही त्या बाबतीत काही तरी भरीव कार्य करु शकाल. काही वर्षांपूर्वी आम्ही सेक्रेटरिअेटच्या जवळच एका लहान घरात रहात होतो. त्यावेळी स्वतंत्र महाराष्ट्राबद्दल मोठा संप व चळवळ चालू होती. पोलिस तैनात केलेले होते आणि मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार पोलिसांनी गोळीबार सुरु केला; जाणाऱ्या-येणाऱ्या कुणावरही गोळ्या मारल्या गेल्या. मला राहवले नाही म्हणून मी बाहेर येऊन पोलिसांना गोळीबार बंद करण्याची विनंति केली आणि त्यांनी खरोखरच गोळीबार बंद केला. मग तेथील जखमी लोकांना मी घरी आणले. त्यांना धीर दिला व अम्ब्युलन्स बोलावुन त्यांच्या उपचाराची व्यवस्था केली. हे सर्व मी साक्षीभाव ठेवल्यामुळे झाले; तसाच या साक्षीभावाचा आणखी एक विशेष म्हणजे साक्षी झाल्यावर तुम्ही निर्भय होता. साक्षी म्हणून पाहत नसाल तर आपण अस्वस्थ होतो, चिडतो किंवा उतावळे होतो पण साक्षीभाव मिळवल्यावर तीच तुमची शक्ति बनते; त्यामधून इतर लोकांच्या अडचणी, प्रश्न दूर करणे तुम्हाला सहज शक्य होते. या बाबतीत एका चिनी संताची कहाणी आहे. तेथील एका संताकडे एक राजा आपल्या कोंबड्याला घेऊन आला आणि हा कोंबडा झुंजीमध्ये जिंकेल असे शिक्षण त्याला देण्यास त्या संताला सांगितले. एक महिन्यानंतर त्याने कोंबडा झुंज करण्यासाठी नेला. अनेक ठिकाणचे कोंबडे तिथे स्पर्धेकरिता आणले होते. झुंज सुरु झाली तेव्हा हा कोंबडा एका बाजुला स्वस्थपणे उभा राहून इतर कोंबड्यांची झुंज फक्त बघत होता; लोकांना त्याच्या स्वस्थपणाचे आश्चर्य वाटले. इतर कोंबडे झुंज खेळत खेळत रिंगणातून पळून गेले आणि ह्या कोंबड्याला विजयी घोषित केले गेले.

अनाचार, विध्वंस थांबण्यासाठीही ही साक्षी-स्थिती उपयोगाची आहे. विध्वंस चाललेल्या ठिकाणी तुम्ही साक्षीभावाने नुसते जाऊन बघत राहिलात तर त्या विध्वंसक कृतीला आळा बसून तो अनिष्ट प्रकार थांबेल. साक्षीभावाच्या शक्तीमधून हे कार्य घडते. तसेच हा अहिंसेचे समर्थन करणारा मार्ग आहे. साक्षीस्थिति ही मानसिक स्थिति नसून अध्यात्मिक उन्नतीमधून प्राप्त झालेली ती स्थिति आहे, म्हणजेच साक्षीरुप बनणे आहे. ती मिळवतांना इतरांवर टीका अजिबात न करण्याची सवय बाणवली पाहिजे. बहुतेक लोक दुसऱ्यावर टीका करण्यात तरबेज असतात, स्वतःकडे त्या दृष्टीने बघणार नाहीत, ही सवय बळावल्यामुळे त्यांना स्वतः काही चुकतो असे वाटेनासेच होते; दुसऱ्याचे आपण काय नुकसान केले हे त्यांच्या तोंडून सांगणारही नाहीत आणि दुसऱ्यांवर टीका करण्याचा आपल्याला अधिकारच आहे असा आविर्भाव आणतील आणि वर या सर्वांची त्यांना मजा वाटते. तुम्ही जर नुसते साक्षी म्हणून पहात राहिलात तर टीका करण्याजोगे काही राहणारच नाही. या लोकांची आणखी एक समजूत असते की त्यांनी टीका केली नाही तर सुधारणा होऊ शकणार नाही. पण लक्षात घ्यायची गोष्ट म्हणजे साक्षीरुपामधून तुमचे चित्त प्रकाशित होते आणि या प्रकाशित चित्ताकडूनच अयोग्य गोष्टी बंद होतील. पण एरवी बहुतेक लोक आपल्याला अमुक करायचे आहे, तमुक करायचे आहे, आपण कुणी विशेष आहोत या गोष्टींबद्दल जागृत (conscious) असतात आणि त्यामुळेच आपण स्वतःचाच प्रश्न निर्माण करतो आणि आपण काहीच करु शकत नाही हाच अडथळा येतो. पण साक्षी बनून बघण्याचे तुम्ही नक्कीच करु शकता. नुसते पहात राहिल्याने व जे पाहतो त्यावर कसलीही प्रतिक्रिया न करण्याने तुमच्यामध्ये आतून एक आमूलाग्र बदल होतो. अशा व्यक्तींमध्ये फार आश्चर्यकारक होणार बदल म्हणजे त्यांची स्मरणशक्ती वाढते (विसर पडण्याचा संभव कमी होतो), ते जे काय पाहतात त्याचे जणू चित्र त्यांच्या स्मृतीमध्ये बनते, त्यांतील सगळे बारकावे फोटोसारखे त्यांच्या मनावर ठसतात. प्रतिक्रिया करत गेल्याने स्मरणशक्ति विकृत बनते. लोकांना प्रतिक्रिया करण्याची एक संवयच झालेली असते. अशाच एका माणसाबरोबर मी कारमधून चालले होते, तर जाताना जी माणसे दिसतील, जी दुकाने दिसतील, ज्या जाहिराती दिसतील त्यांच्याबद्दल तो काही ना काही तरी बोलायचा. मला विचार पडला की हा असेच

बोलत राहिला तर त्याचे पुढे काय होणार? पण नंतर मला लक्षात आले की अशा सतत प्रतिक्रिया करणाऱ्या लोकांची बुद्धि भ्रष्ट होते किंवा ते अत्यंत विसरभोळे बनतात. पण एवढेच नाही तर असे लोक एकत्र जमले की ते फार भयानक होतात कारण अशा प्रकारचे लोक काहीतरी करण्याच्या मागे लागतात कारण प्रतिक्रिया करणे हा त्यांचा स्वभावधर्मच झालेला असतो. हिटलरचे उदाहरण बघा. तब्बल नऊ वर्षे त्याने ज्यू लोक कुठे चुकतात हे पकडण्याचा प्रयत्न केला. हात धुऊन ते काय काय करतात याची नोंद ठेऊ लागला. जर्मन समाजाला त्यांच्यापासून कसा धोका आहे याची निमित्ते शोधत राहिला आणि शेवटी तो अशा निर्णयाप्रत आला की ज्यू लोकांनी जर्मनी सोडून बाहेर निघून गेलेच पाहिजे. पण मग पुन्हा त्याने विचार केला की जर्मनीतून बाहेर पडल्यावरही हे ज्यू लोक पुन्हा समृद्धि मिळवतील म्हणून त्यांना ठार मारणे हाच चांगला उपाय आहे असा त्याचा प्रतिक्रियात्मक निर्णय झाला. मग त्याने ज्यू लोकांवर जे घोर अत्याचार केले त्याची कल्पनाही करता येणे शक्य नाही. त्याला तसेच साथीदारही मिळाले आणि त्या हत्याकांडापासुन त्यांना जणू आनंदच साजरा करायचा होता त्यालाच त्यांनी 'कर्तव्य' अशी भूमिका दिली, कर्तव्याच्या नावाखाली त्यांनी हजारोंनी ज्यू लोक ठार केले!

एकदा का तुम्ही साक्षीभावापासून अलग होऊ लागतात की तुम्ही सामूहिक निगेटिव्हिटीच्या पकडीत केव्हा याल याचा भरवसा नसतो. आणि याचा विपरीत परिणाम जगातले सर्व प्रश्न, सर्व तंटे-बखेडे यांच्या स्वरुपात दिसू लागतात. म्हणून काय केले पाहिजे तर आपण प्रतिक्रिया करणे बंद केले पाहिजे, पूर्णपणे थांबवले पाहिजे. काही चुकीचे चाललेले नजरेस आले तरी प्रतिक्रिया व्यक्त करु नका; एखादा तुमच्याशी विनाकारण कठोरपणे वागला तरी लगेच प्रतिक्रीया करु नका. थोड्या वेळाने ती व्यक्ती शांत झाल्यावर वाटल्यास त्याला नीटपणे सांगा. कारण ज्यावेळी तो प्रक्षोभक असतो त्यावेळी तुमच्या सांगण्याचा काही उपयोग नसतो. काही लोक कधीच ऐकून घ्यायला तयार नसतात हे मी मान्य करते पण काही कालानंतर त्याल त्याची चूक समजण्याची शक्यता असते. आता क्लिंटन कसा वागत आहे ते पहा, त्याच्यासारख्या उच्चपदस्थ व्यक्तीकडून अशी प्रतिक्रिया होणे आपल्या अपेक्षेच्या अगदी उलट आहे. पण काही व्यक्तींत ही प्रतिक्रिया जन्मजातच असते. त्याला हे शोभत नाही. ही प्रवृत्ति कामात अति गुंतल्यामुळे निर्माण होते. दुसऱ्याने उलट प्रतिक्रिया करावी असे वाटत असेल तर खुशाल करा. तुम्हाला इतरांनी महत्त्व द्यावे अशी कल्पना असेल तर तुम्ही प्रतिक्रिया करत रहा. पण फालतू गोष्टींना कशासाठी महत्त्व द्यायचे? हल्लीच्या काळात तुम्ही कसे दिसावे, कसे वागावे, कसे चालावे यालाच जास्त महत्त्व दिले जाते. हा शक्तीचा अपव्यय आहे. परमेश्वराने माणसांना निर्माण करतांना त्यांच्यात विविधता पाळली आहे. निसर्गातसुद्धा तुम्हाला दिसते की झाडाची पाने दुसऱ्या झाडापेक्षा वेगळी असतात. माणसांनाही तसेच वेगवेगळे बनवलेले आहे. म्हणून जसे तुम्ही आहात त्याचा स्वीकार करा. दुसऱ्यासारखे दिसण्याचा कशाला प्रयत्न करायचा? त्यासाठी शक्ती खर्च करणे अगदी व्यर्थ आहे.

तुम्हा सहजयोग्यांची जबाबदारी मोठी आहे. तुम्ही साऱ्या मानवजातीचा उद्धार करण्यासाठी इथे आला आहात. इतर माणसांच्या मूर्खपणाच्या कल्पनांतून ते जसे मूर्खांसारखे वागतात तसे तुम्ही नाही. कशामुळे हे होते मला समजत नाही पण आपले चित्त एकाएकी विचलित होते आणि आपल्या प्रतिक्रिया विचित्र होतात. आपण असे का वागतो आपल्यालाच कळत नाही आणि लोक काय म्हणतील याची काळजी आपण का करतो तेही समजत नाही. हे व्यक्तिगत असते असे नाही तर सामूहिक प्रकारेही हेच चालते. या सर्वांचा परिणाम म्हणून नवनवीन जीवनमूल्ये निर्माण होतात. उदा. एखाद्या स्त्रीच्यामागे किती पुरुष लागले आहेत याला महत्त्व देणे; ती माता असल्याचे विसरुन आपण विशेष आहोत, प्रसिद्ध नायिका आहोत अशा आविर्भावात ती कशी वागू लागते? ती माता असेल तर चांगली आई तिने बनले पाहिजे आणि मातेसारखा तिचा पेहराव पाहिजे. तीच गोष्ट पुरुषांची, तुमच्यामध्ये काही विशेष असेल, मोठेपणा मिळावा असे काही विशेष गुण तुमच्यामध्ये असतील तर तुमचा मोठेपणा आपोआप दुसऱ्यांच्या नजरेत भरेल त्यासाठी कसला देखावा करण्याची जरुर नाही. म्हणून पब्लिक मताबद्दल तुम्ही एकप्रकारे उदासीन राहिलात तर तुम्ही खूप काही मिळवू शकाल. सहजयोगांतही काही लोक दिखाऊपणाच्या मागे लागलेले मी पाहते. मला ते समजतेच पण त्यांच्या ते लक्षात येणे जरुरीचे आहे. तुम्ही बाहेरच्या गोष्टींबद्दल प्रतिक्रिया करणे बंद केले की आपोआप तुमच्या अंतरंगातील गोष्टींबद्दल प्रतिक्रिया करायला लागाल आणि त्यांतूनच आत्मपरिक्षण होत जाईल. तुम्ही स्वतःलाच पाहू लागलात की तुमची थोरवी किती आहे हे कळून तुमचे तुम्हालाचा आश्चर्य वाटेल, तुम्ही किती समाधानी आहात हेहि कळेल. आणि त्याच्याही थोडेसे पलिकडे गेलात की तुम्हाला जे कळते व दिसते त्याचाही विचार तुमच्या मनांत येत नाही इतके तुम्ही निर्विचार होता. असा माणूस आदरास योग्य होतो, त्याचा सहवास लोकांना हवा-हवासा वाटतो. त्याच्यावर सर्वजण प्रेम करतात. त्याला सगळीकडून मदत मिळते. म्हणून लोक काय म्हणतील, त्यांना तुमच्याबद्दल काय वाटेल याची पर्वा न करता आत्मपरिक्षण करुन स्वतःलाच पहात चला. कालांतराने तुम्हाला त्याचीही जरुर भासणार नाही.

मी ज्या स्थितीबद्दल बोलत आहे ती अशी आहे की जेव्हा श्रीकृष्णाने अर्जुनाला मी किंवा माझे सैन्य माग असे सांगितले तेव्हा अर्जुनाने फक्त श्रीकृष्णांनाच मागितले; कौरवांनी त्यांचे सैन्य मागितले. श्रीकृष्णांनी स्वतः लढणार नाही असे सांगितले तरी अर्जुनाला खात्री होती की त्यांच्या नुसत्या उपस्थितीची (साक्षी) शक्ति पांडवांना मदत करेल. श्रीकृष्णांना काहीच करायची किंवा लढण्याची जरुरी नव्हती पण त्यांची शक्ति, बाहेरुन नजरेस येत नसली तरी ती कार्य घडवून आणेल आणि आपला विजय होईल हे अर्जुनाला समजत होते.

म्हणून ही साक्षीस्वरुपाची शक्ति तुम्ही सर्वांनी वृद्धिंगत केली पाहिजे. एरवी तुम्ही स्वतः काही करु शकत नाही म्हणूनच साक्षी होऊन सर्व पहात रहा, प्रतिक्रिया करणे थांबवा आणि जे चालले आहे

त्याकडे निर्विकारपणे पहात रहा; त्यातूनच तुम्ही एक शक्तिशाली व्यक्तिमत्व मिळवाल आणि तुम्हालाच त्याचे आश्चर्य वाटेल. मग तुम्हाला कसली महत्त्वाकांक्षा उरणार नाही, कसली इच्छा उरणार नाही, कसली विशेष आवड राहणार नाही. साक्षी बनून आजूबाजूला चाललेला खेळ पाहण्यातही मजा असते; प्रत्येक गोष्टीतील रंजकता तुमच्या लक्षात येते, प्रत्येक गोष्टीतील मूर्खपणाही तुम्हाला बरोबर समजतो, लोक हिंसात्मक कामे का करतात हे पण तुम्हाला समजेल आणि हे सर्व पाहून तुम्ही ते हसण्यावारी नेऊ शकता. तुम्ही चिडत नाही, अस्वस्थ होत नाही. कालांतराने तुमची साक्षीरुपात राहण्याची क्षमता वाढत असल्याचे तुम्हाला समजेल. तुम्ही सर्वांनी सामूहिकतेत ही स्थिति मिळवलीत तर तुम्ही अशक्यप्राय गोष्टीही करु शकाल; आणि तेंहि प्रत्यक्षपणे काही न करता, काही न बोलता फक्त तुमच्या उपस्थितीमुळे कार्य घडेल. त्याचा प्रत्येक माणसावर प्रभाव पडेल असे मी म्हणत नाही पण बऱ्याच लोकांवर प्रभाव पडेल. अशा स्थितीला आलेला सहजयोगी सगळीकडे शांति पसरवतो, सर्वांना आनंद देतो. एका सहजयोग्याचे मी उदाहरण देते. एकदा हा सहजयोगी एका बेटावर सहजयोगाच्या कामाला निघाला; त्याचवेळेस आकाशात काळेभोर दाट ढग जमून आले, विजा कडाडू लागल्या पण त्याने फक्त आकाशातील ढगांकडे पाहिले आणि म्हणाला " मी श्री माताजींचे कार्य करायला चाललो आहे. मी परत येईपर्यंत थांबा." असे फक्त म्हणून तो होडीतून दुसऱ्या बेटावर गेला. तिथे कार्यक्रम व्यवस्थित केला आणि परत आला परत येऊन घरात शिरणार तोच मुसळधार पाऊस सुरु झाला. या गोष्टीवरुनही हेच दिसते की तुम्ही कोणत्या स्थितीमध्ये आहात ते निसर्गालासुद्धा कळते. पण तुम्ही महत्त्वाकांक्षा बाळगली- सहजयोगांतही असे महत्त्वाकांक्षी लोक मी पाहते त्यांना लीडर बनण्याची महत्त्वाकांक्षा असते- तर या स्थितीला तुम्ही येऊ शकत नाही. लीडरशिप वगैरे भ्रांति आहे; पण हे समजायला तुम्ही साक्षी बनले पाहिजे म्हणजे ती माया आहे हे समजेल. म्हणून आपल्या व्यक्तिमत्त्वातील दोषांमुळे येणारे प्रश्न सोडवण्यासाठी साक्षी बनणे हा सर्वोत्तम उपाय आहे. काही बोलण्याऐवजी, काही प्रतिक्रिया करण्याऐवजी जे चालते ते फक्त पहात रहा. ही फार समाधानकारक गोष्ट आहे.

श्रीकृष्णाची सर्वांत मोठी शक्ति त्यांचे साक्षीस्वरुप हीच होती. काही न करता, हातांमध्ये शस्त्र न उचलता त्याने पांडवांना युद्धात विजय मिळवून दिला. भगवत्गीता सांगून त्याने सर्व जगाला असत्यावर (Evil) विजय मिळवण्यासाठी काय करायला पाहिजे हाच महान संदेश दिला. गीतेमध्येही त्याने साक्षीस्वरुपाचीच महती सांगितली आहे. तुम्ही या दृष्टिने आजही गीता वाचलीत तर श्रीकृष्ण साक्षी म्हणूनच सर्व करत आहेत हे तुम्हाला समजेल; आणि या स्थितीमधूनच त्याने सर्व अवतारकार्य केल्याचेही तुमच्या लक्षात येईल. त्यांनी सर्वप्रथम गीतेमध्ये स्थितप्रज्ञ कसे व्हायचे ते सांगितले. स्थितप्रज्ञ व्यक्ति नेहमी साक्षीभावात असते; त्यावरचे सर्व श्लोक अतिशय उद्‌बोधक आहेत. मग त्यांनी कर्म, ज्ञान व भक्ति या तीन गोष्टी सांगितल्या. कर्म करण्यात लोकांची कल्पना होती की आपल्या कर्माचे पुण्य आपल्याला मिळते. पण श्रीकृष्णांनी तसे सांगितले नाही. ते नेहमी म्हणायचे की तुम्ही केलेल्या कर्मांचे फळ परमेश्वरी शक्तिकडे सोपवा. पुष्कळदा लोकांना वाटते की आपल्याला पैसा मिळाला हे आपण केलेल्या चांगल्या कर्मांचे फळ आहे; काही वेळा मिळालेल्या पैशाचा वाईट कामासाठी उपयोग करतात. पण कृष्ण म्हणतात की कर्मांचे फळ परमशक्तीवर अवलंबून ठेवा, कारण त्या शक्तीलाच तुमचे कल्याण कशांत आहे हे समजते. म्हणून समाजसेवा, गरिबांना मदत इ. चांगल्या कार्यांची फलश्रुति, अपेक्षा न करता परमेश्वरावर सोपवा. याच्यामुळेच तुम्हाला कर्मांचा अहंकार येणार नाही. त्याने कर्माबद्दल जे जे काही सांगितले आहे ते समजण्यासाठीही साक्षीभाव ठेवला पाहिजे. नंतर त्यांनी 'ज्ञान' हा विषय सांगितला. पण त्याचा अर्थ पुस्तकी ज्ञान असा नव्हे किंवा ग्रंथामागोमाग ग्रंथ वाचा असा नव्हे. ज्ञान खऱ्या अर्थाने बघितले तर आत्मज्ञान, स्वतःविषयीचे, आपल्या स्वरुपाचे ज्ञान. म्हणजेच तुम्ही सहजयोगी असायला हवे, त्यांनतूनच व्हायब्रेशन्समधून तुम्हाला सर्व काही ज्ञात होते. 'स्व'चे ज्ञान नसेल तर तुमच्याजवळ काहीच ज्ञान नाही. थोडक्यात आत्मसाक्षात्कार मिळवला पाहिजे हाच आहे. शेवटी त्यांनी भक्तीबद्दल सांगितले. भक्तिबद्दलही श्रीकृष्णांनी खुबीदारपणे सांगितले आहे. आज काल रस्त्यावरही हरे रामा - हरे कृष्णा गाणारे लोक तुम्ही पाहता. पण श्रीकृष्णांनी एका शब्दात भक्ति सांगितली आणि तो शब्द म्हणजे अनन्यभक्ति. अनन्य म्हणजे दुसरा कोणी नसणे; म्हणजे तुम्ही परमचैतन्याच्या सागरांत विलीन होणे व तसे झाल्यानंतर केलेलीच भक्ति त्यांना आवडते. मग तुम्ही फुले, फळे, पाने काहीही मला अर्पण केले तरी ते मला आवडेल असे ते म्हणतात. ही भक्तिसुद्धा आत्मसाक्षात्कारानंतरच होत असते. अशा भक्तीला मोल नसते. श्रीराम वनवासात गेले असताना त्यांनी शबरीची उष्टी बोरंसुद्धा आवडीने खाल्ली कारण त्यामागे शबरीची अनन्य भक्ती होती. दुसऱ्या अर्थाने हेहि लक्षात घ्या की तुम्ही जेव्हा दुसऱ्याला काही देता तेव्हा त्यामधून तुमचे प्रेम किती व्यक्त होते याला महत्त्व आहे. श्रीकृष्णसुद्धा हस्तिनापूरला जायचे तेव्हा दुर्योधनाच्या महालात न राहता विदुराच्या घरी राहायचे; तो नोकराणीचा मुलगा होता पण आत्मसाक्षात्कारी होता, साधेसुधे जेवण घ्यायचा. म्हणून तुमची मूल्यधारणा प्रेम, भक्ति यावरच अवलंबून असली पाहिजे; तुमचे संबंध आत्मसाक्षात्कारी व प्रेमी लोकांबरोबरच असावे व दिखाऊ श्रीमंत लोकांबरोबर नसावे. तुम्ही सहजयोग्यांनी लोकांचे प्रेम समजून घ्या. त्याची अनुभूति मिळवा. हे व्हायलाही तुमच्याजवळ साक्षीभाव असला पाहिजे. नाही तर श्रीमंती, वैभव, गाड्या-बंगले इ. तुमचे लक्ष वेधून घेतील; साक्षीभाव ठेवला की व्हायब्रेशन्समधून तुम्हाला सर्व समजेल.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

●●●

# नवरात्री पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण कबेला २७ सप्टेंबर ९८**

आईला आपली अनेक मुले फार सुंदर बनल्याचे पाहण्याचा व त्यांच्यासमवेत राहण्याचा किती आनंद होत असेल याची तुम्हाला कल्पना नाही. मुलांना परमचैतन्याशी एकरुप झालेले व मुलाबाळांसह आनंदी, समाधानी असल्याचे पाहणे हे तिचे फार मोठे भाग्य आहे. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की आता सहजयोग्यांची संख्या खूप वाढली असली तर एकूण जगाच्या लोकसंख्येच्या तुलनेत ती फार कमी आहे. सत्य फक्त तुमहालाच समजले आहे. इतर ज्ञान चिरंजीव नसते आणि ते कृत्रिम असल्यामुळे विरळ होऊन नाहीसे होते. कुण्डलिनीच्या जागरणामुळेच तुम्ही सत्य ज्ञान समजण्याच्या स्थितीला आला आहात. पण ज्या लोकांना अजून हे ज्ञान मिळालेले नाही त्यांचा विचार करा. आता आपण म्हणतो की आपल्याला मिळालेले ज्ञान प्रेममय आहे. पण तुम्ही हेही नीट लक्षात घ्यायला हवे की हे प्रेमाचे ज्ञान तुमच्या आत्म्याकडून प्रकाशित होत आहे. तुम्हाला ते मुद्दाम दाखवायची किंवा काही वाचायची किंवा सिनेमा पहायची जरूर नाही. ते आपोआप प्रकाशित होत असते. म्हणून ते शुद्ध प्रेम आहे आणि तेच ज्ञान आहे. हे कसे समजून घ्यायचे पहा. तुम्हाला स्वतःबद्दल जे ज्ञान आहे ते तुम्हाला हाताच्या बोटांवर साक्षात् असे जाणवते, तसेच दुसऱ्याबद्दलचेही ज्ञान तुम्हाला मिळते. हे फार सूक्ष्म पण तितकेच प्रभावी आहे; तुमच्याशिवाय इतरांना ते उपलब्ध नाही. अर्थात हे ज्ञान एक प्रकारचे गुपित आहे; इतरांबद्दल तुमहाला समजते याची त्यांना कल्पना नसते. म्हणजेच हे ज्ञान व प्रेम एकच आहे. ज्ञान व प्रेम एकत्रितपणे समजणे अवघड आहे. कारण आपली ज्ञानाची व्याख्या वेगळी आहे. सामान्यतः प्रेमाला आपण अज्ञानाने आसक्ति समजतो. आपले नातेवाईक, मुले-बाळे किंवा काही बाह्य वस्तूंबरोबर आपण आसक्त असतो व त्यामुळे आपल्याला त्यांच्याबद्दलचे ज्ञान होत नाही. ज्ञान झाल्यानंतर सर्व आसक्ती संपून जाते आणि तुम्ही विश्व-मानव बनता; सागरातल्या बिंदूसारखे होऊन जाता. कुटुंबाबद्दल आसक्ती असल्यामुळे कुटुंबात काही आपत्ति आली की आपण लगेच अस्वस्थ होतो; मुलांचा काही गंभीर प्रश्न पडला की आभाळ कोसळल्यासारखे होते. तीच आसक्ति शेजारपाजाऱ्यांबद्दल समाजाबद्दल तसेच देशाबद्दलही आपण ठेवतो. हेसुद्धा ज्ञान नाही. आत्मसाक्षात्कारानंतर आपल्या राष्ट्राबद्दलची आपली जाणीव स्वच्छ होते. कुठे काय चुकत आहे ते बरोबर लक्षात येते आणि मग प्रेमशक्ती वापरून सुधारणा कशी करायची हे लक्षात येते. म्हणजे प्रेम ही ज्ञानाची शक्ती आहे.

ज्ञान मिळूनही घरी बसून ध्यान करत राहण्यात अर्थ नाही; बाहेर पडून लोकांत, समाजात मिसळले पाहिजे आणि त्यांना ते ज्ञान दिले पाहिजे. नाहीतर तुमच्या ज्ञानामध्ये प्रेम उतरणार नाही. म्हणून आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे हे इतरांना सांगावेसे वाटते. कधी कधी त्यामध्ये आपण आपला अहंकार तर दर्शवीत नाही ना अशी शंका मनात येईल. हरकत नाही; दुसऱ्या कुठल्या तऱ्हेने ते तुम्ही सांगू शकता. अहंकार हा सत्यज्ञान न झाल्यामुळे होतो; आपल्याला खूप माहिती आहे, आपण खूप वाचले आहे अशी समजून झाल्यामुळे हा अहंकार येतो. जगभरातील परिस्थिती पाहिली तरी बाह्यातले ज्ञान होऊनही काही फायदा होत नसल्याचे लक्षात येते. उदा. लढाई, संहार चालू आहे. इतर प्रकार चालू आहेत. म्हणजे त्यांना नीट ज्ञान झाले नाही किंवा समजले नाही. उदा.– काल मी इथे आले तेव्हा पाऊस पडत होता पण मी इथे येऊन बसल्याबरोबर पाऊस थांबला आणि सर्व कार्यक्रम संपेपर्यंत पाऊस पडला नाही. पण कार्यक्रम संपल्यावर तुम्ही टाळ्या वाजवू लागलात आणि पाऊस सुरू झाला. म्हणजे निसर्गसुद्धा तुम्ही मंडळी कोण आहात हे जाणतो. तुम्ही पण निसर्ग समजून घेतला पाहिजे. तुमच्या अध्यात्मिक स्थितीनुसार निसर्ग कार्य करत असतो. आश्चर्य म्हणजे मला नेहमी वाटायचे की असे अध्यात्मिक स्तर नसावेत; मला वाटायचे की आत्मसाक्षात्कार झाल्यावर सगळे एकाच स्तरावर येतात. पण ते तसे होत नाही हे नंतर माझ्या लक्षात आले. कारण माझ्या लक्षात आले की आत्मसाक्षात्कारानंतर पुढची उन्नती गाठण्यासाठी लोकांमध्ये बऱ्याच अडचणी व अडथळे असतात; अनेक प्रलोभने त्यांना उन्नत होण्यामध्ये मागे खेचत होते. म्हणून वेगवेगळ्या चक्रांवर व नाड्यांवर कार्य करणे जरूरीचे होते. त्याशिवाय सहजयोगी परिपूर्ण होऊन या ज्ञानाचा अधिकारी होऊ शकत नाही.

परिपूर्ण होण्यासाठी दोन उपाय आहेत. एक म्हणजे तुम्ही कसलीही प्रतिक्रिया करू नका. प्रतिक्रिया करणे हा मानवाचा उपजत स्वभाव आहे. पण देव-मानव बनण्यासाठी प्रतिक्रिया न करणे नेहमीच चांगले. त्यातूनच तुमची प्रगति हमखास होईल. तुम्ही प्रतिक्रीया करता तेव्हा आत्म्यापासून दूर जाता व इतर प्रणालींच्या प्रभावाखाली येता. उदा. हे कारपेट पाहून, त्याचे रंग, डिझाईन पाहून मी प्रतिक्रिया व्यक्त करू लागले तर काय फायदा? उलट तसे न केले तर त्या कारपेटला व्हायब्रेशन्स आहेत का नाही हे मला समजेल. ही व्हायब्रेशन्स म्हणजेच प्रेम, म्हणजे संपर्कप्रणाली अशी आहे की तुम्हाला प्रकाश मिळाला की सर्व काही स्पष्ट दिसू लागते; म्हणजे तो प्रकाश तुम्हाला संपूर्ण व सखोल ज्ञान देतो. त्याचप्रमाणे तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर तुमच्यातील चैतन्य प्रवाही होते आणि प्रकाशात पाहिल्यासारखे चांगले काय व वाईट काय हे तुमच्या लक्षात येते. पण कधी कधी यावेळीही मानवी मर्यादा आड येतात. उदा. तुम्ही एखाद्या घरी गेलात तर ते घर, त्यातल्या वस्तू,

त्याची रचना इ. गोष्टींमध्ये तुम्ही वाहवून जाता आणि त्या घराला व्हायब्रेशन्स आहेत का नाहीत इकडे तुमचे लक्ष जात नाही. उदा. नुकतेच काही जणांनी मला एक ठिकाणी जमीन स्वस्तांत मिळेल असे सांगितले. मी विचार करू लागले की इतकी स्वस्त जमीन कशी आणि लगेच मला व्हायब्रेशन्स जाणवल्या. मी त्यांना तेथील व्हायब्रेशन्स बघायला सांगितले तर त्यांनी जाऊन पाहिल्यावर भयंकर गरम व्हायब्रेशन्स त्यांना कळली. मग त्यांना कळले की त्या ठिकाणी बरेच वाईट प्रकार अनेक वर्षांपासून चालले होते आणि ती जागा आपल्यासाठी योग्य नाही. आपली रहायची जागा अगदी शुद्ध हवी; एखाद्या झोपडीतही तुम्हाला जितके सुख मिळेल तितके दुसऱ्या मोठ्या महालातही मिळणार नाही. म्हणून आपण जे जे काही करतो त्याच्याबद्दलची माहिती व्हायब्रेशन्समधून मिळवली पाहिजे. यामध्येही तुमची कधी कधी फसगत होण्याची शक्यता असते. उदा. मला कुणी महिलेने सांगितले की कोणा एका पुरुषाची व्हायब्रेशन्स तिने पाहिली आणि त्याच्याशी लग्न करावे असे तिला वाटले. पण मी जेव्हा त्या माणसाला पाहिले तेव्हा त्याच्यातील भुते मला नजरेस आली! म्हणजे व्हायब्रेशन्समधून शुद्ध ज्ञान मिळाले नाही. म्हणजे हा संबंध कसा आहे हे लक्षात घ्या. व्हायब्रेशन्स म्हणजे प्रेम पण त्याचबरोबर तुम्हाला शुद्ध ज्ञान (Pure Knowledge) हवे. शुद्ध ज्ञान हे एनर्जीसारखे आहे आणि त्याचे तुम्हाला समजणारे अस्तित्व हे प्रेमासारखे आहे. माणसांना सामान्यपणे प्रेम ही भावना समजत नाही. कुणाच्या तरी प्रेमात पडणे हीच प्रेमाची त्यांची समज असते; असे प्रेम टिकेलच असे नाही, जसे प्रेमविवाह करायचा आणि थोड्याच दिवसात त्याचा निरास व्हायचा; म्हणजेच त्या ठिकाणी शुद्ध ज्ञानाचा अभाव असतो. वेगळ्या तऱ्हेने सांगायचे तर सूर्य आणि सूर्यप्रकाश एकमेकाहून भिन्न नाही, किंवा चंद्र आणि चंद्रप्रकाश एकमेकांहून भिन्न नाहीत, हे लक्षात न आल्यामुळे आपला गोंधळ होतो. त्यामुळेच व्हायब्रेशन्समधूनही आपली फसगत होण्याची शक्यता असते. कधी कधी व्हायब्रेशन्स नसतानाही स्वतःचे समर्थन करण्यासाठी ती आहेत असे कुणी म्हणतात. त्यामुळेच आधी जे चांगले आहे असे म्हटले जाते त्याचा नंतर उलटा अनुभव येतो. हे कशामुळे होते हेहि तुम्ही, आत्मसाक्षात्कार मिळाला असला तरी, समजून घेतले पाहिजे. शुद्ध ज्ञानाच्या व्हायब्रेशन्समध्ये तुम्हाला त्या व्यक्तीची वा वस्तूची अटॅचमेंट नसते. असे असेल तरच शुद्ध व्हायब्रेशन्स मिळतील. हे अज्ञानामुळे होते. त्यात तुमचे काही चुकते असे नाही. म्हणून आपले ज्ञान शुद्धच असले पाहिजे. घरात दिवा असूनही त्याचा प्रकाश न मिळण्यासारखी ही गोष्ट आहे. आपले हृदय स्वच्छ नसले तर आपण ज्या गोष्टी समजत नाहीत त्याही बरोबर आहेत असे धरून चालतो. मनुष्यस्वभावातील हा एक सर्वसामान्य गुण आहे.

मी तुम्हाला सांगितले होतेच की काही लोक देशाच्या विभाजनाच्या मागे लागलेले असतात. ज्या थोड्या लोकांना त्यातून स्वतःचा स्वार्थ साधायचा असतो ते इतरांना त्याच्यासाठी भडकावतात; आणि स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांना चुकीचे मार्गदर्शन करतात. हे प्रकार धर्मांच्या, अस्मितेच्या, समृद्धीच्या अशा अनेक नावाखाली चाललेले असतात. पण अशा विभाजनामुळे कुणाचाच फायदा झालेला नाही उलट समस्या वाढल्याच आहेत असे इतिहास सांगतो. चार-चौघांच्या अहंकारातून हे घडून येते, त्यातच त्यांचाही कधी कधी सर्वनाश झाल्याचे आपण पाहतो. हाच 'माझे'पणा (identification) छोट्या-छोट्या गोष्टींतही दिसतो; कुठलीही गोष्ट मिळवण्याच्या मागेच सहजयोगीही लागतात. जोपर्यंत हा 'माझे'पणा असतो तोपर्यंत ज्ञान मिळणार नाही. शुद्ध ज्ञानाचा प्रकाशही शुद्ध असतो; म्हणजेच त्यातून शुद्ध व्हायब्रेशन्स येतात. दुसऱ्या एका दृष्टीने सांगायचे तर आपण जेव्हा एखादी गोष्ट करण्याचा विचार करतो तेव्हा मनाने आपले आपल्यालाच विचारावे. "हे मला का पाहिजे? त्याने इतरांचा काय फायदा होणार आहे?" असा इतरांच्या दृष्टीमधून विचार केलात तर तुम्ही जे काही करायचे मनात आणले असेल त्याची सत्य कल्पना तुम्हाला येईल. म्हणून तुम्ही स्वतःला नेहमी साक्षीरूप अवस्थेत ठेवा, "मी हे का करत आहे, माझा उद्देश काय आहे." असे स्वतःला विचारत रहा. कारण कधी आपण मानसिक प्रक्रियेमधून किंवा कण्डिशनिंगमुळे एखादी गोष्ट ठरवत असतो. असे केले म्हणजे तुमची व्हायब्रेशन्स तुम्हाला तुमच्या हाताच्या बोटांवर सर्व काही सांगतील. वर सांगितल्याप्रमाणे व्हायब्रेशन्समधून फसगत किंवा गैरसमजुत होणार नाही. आपण आता एक मोठे कुटुंब झालो आहोत. तुम्ही खुप ज्ञान मिळवले आहे म्हणून तुम्ही आता सूज्ञ बनले पाहिजे. सूज्ञता नसेल तर आपण जे काही करतो ते आपल्यालाच नीट समजणार नाही.

आता ही सूज्ञता कशी मिळवायची? श्रीगणेश सूज्ञतेची देवता आहेत व तुमच्यामध्ये ती शक्ती जागृत आहे. पण मी पाहते की काही लोक श्रीगणेशामध्ये स्वतःला पूर्णपणे विसरून जातात, गुलामगिरीत असल्यासारखे करतात आणि तारतम्य विसरून स्वतःला फार महान योगी समजू लागतात. असे झाले नाही तरच श्रीगणेश तुम्हाला सूज्ञता देतात. आपण काय काय शहाणपणाच्या गोष्टी केल्या ते मोजून पहा. सूज्ञतेमधेही तारतम्य येतेच. मग लोक काय म्हणतात वगैरे गोष्टींचा तुमच्यावर परिणाम होत नाही. उलट त्यांचे काय चुकते, देशाचे काय चुकते हे तुमच्या लक्षात येईल. मानवामध्ये या शहाणपणाला फार महत्त्व आहे. जनावरांना इतके शहाणपणे नसते. अनुभव घेत घेत आपल्या लक्षात बऱ्याच गोष्टी येतात व आपल्या चुका कळतात. आणि मग आपणच आपली सुधारणा करायला शिकतो. सूज्ञता हा बाहेरून दिसणारा गुण नव्हे; पण व्हायब्रेशन्समधून व्यक्ती कमालीची सूज्ञ असल्याचे समजते; तो बोलेल किंवा बोलून दाखवणार नाही आणि बोलेल ते सुद्धा खूप गहनतेतून बोलेल. काही लोक मुलांमध्ये मग्न असतात, इतके मग्न की आपण या सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीचेच अंश आहोत हेहि विसरून जातात. परवा मला एक महिला भेटली, तिचा मुलगा आजारी होता, तिने हॉस्पिटलमध्ये नेऊन त्याच्यावर उपचार करून घेतले व तो बरा झाला. मग तिने मला फोन करून ते कळवले; मी तिला म्हटले की मला आधी का नाही कळवलेस? म्हणजे इथे सूज्ञता

कमी पडली. इथे कबेलामध्ये एक घटना घडली. एक मुलगा पडून त्याचा हात मोडला. त्याची आई त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेली. तिथे डॉक्टरांनी ऑपरेशन करून कृत्रिम हात बसवावा लागेल असे सांगितले. ऑपरेशन दुसऱ्या दिवशी करण्याचे ठरले. त्याचे वडील जरा शहाणे असल्यामुळे ते मुलाला घेऊन आदल्या रात्रीच माझ्याकडे आले; रात्रीचे तीन वाजले असूनही मी त्याच्यावर उपचार केले. दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलमध्ये नेल्यावर आणि डॉक्टरांनी पुन्हा तपासल्यावर ऑपरेशनची जरूर नसल्याचे सांगितले. आता यातील फरक लक्षात घ्या; आई सहजयोगी असूनही काळजीत पडली आणि हॉस्पिटलमध्ये गेली.सहजयोगातही जे चमत्कार घडलेले तुम्ही पाहता त्यामागील सूज्ञता लक्षात घ्या. माझे चित्त तुमच्याकडे आहेच आहे पण तुम्ही ते गृहीत धरू नये; त्यासाठी प्रार्थना करायला हवी. एके दिवशी मला सहज आठवण झाली की न्यूयॉर्कला फोन करून बघू या. फोन लागल्यावर मी एकदम त्या लीडरला विचारले, "मुलगा आता कसा आहे?" हे ऐकून तो आश्चर्यचकित झाला; तो मुलगा पाण्यात पडला होता आणि वर काढेपर्यंत खूप वेळ गेल्यामुळे त्याच्या सबंध शरीरात, मेंदूतही खूप पाणी जमले होते. डॉक्टरांचे उपचार चालू होतेच पण मला हे कुणीही सांगितले नसतानाही कळले; तो मुलगा ठीक होईल असे मी सांगितले आणि खरोखरच तो वाचला आणि पूर्ण बरा झाला. आता मला हे कसे समजले म्हणाल तर हेच पूर्ण शुद्ध ज्ञान. माझे लक्ष सगळीकडे असते. साऱ्या विश्वभर असते आणि म्हणून मला सर्व समजते; कुठेही कसलीही गंभीर घटना झाली की मला लगेच समजते आणि त्या प्रसंगातील लोकांना माझी मदत मिळते. मी यासाठी, माझ्या चित्तासाठी काही खास असे करत नाही पण हे चित्त सूज्ञतेमुळे कार्य करते. या सूज्ञतेमधूनच सहजयोगात कुठे काय चालले आहे हे तुम्हाला समजू शकेल. कारण ही सूज्ञता लहान मुलासारखी निरागस असते.

सहजयोगात अनेकांचे आजार बरे झाले आहेत. त्यासाठी मला वेगळे काहीच करावे लागत नाही. लोकांना वाटते की मी चक्रे ठीक केली असतील वगैरे. पण मी तसे काही न करता सूज्ञतेमुळे सर्व काही या परमचैतन्यावर सोपवते व तेच कार्य करते. तुम्ही सर्व काही परमचैतन्यावर सोपवता का हा इथे मुख्य मुद्दा आहे. हे जर जमत नसेल तर अजूनही तुम्हाला पूर्ण व सत्य ज्ञान झालेले नाही असे समजा. त्या स्थितीला आलेले काही लोक आहेत पण आत्मसाक्षात्कार मिळालेले सर्व लोक त्या स्थितीला पोचले असतील असे मला खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. अनुभवामधून तसेच लोकांना भेटून हे शिकता येण्यासारखे आहे. पूर्ण सूज्ञता येणे हे पूर्णपणे सर्व काही परमचैतन्यावर सोपवल्यावरच मिळते, एरवी ते जरा अवघड आहे. हे परमचैतन्य सर्व जाणते. सर्व त्याला समजते, सर्वकाही घडवून आणत असते; आणि मुख्य म्हणजे ते प्रेम करते. अशी ही महान शक्ती आहे. त्यामध्ये आपल्याला वाटतो तसा योगायोग नसतो तर ते परमचैतन्याचे कार्यच असते. मी तुम्हाला कालची पावसाची घटना सांगितली त्यामध्येही निसर्गाची सूज्ञता असते; मी कार्यक्रमाला आली आहे म्हणून पाऊस बरोबर थांबला. फुलेसुद्धा मला ओळखतात. कारण ती पूर्णतः नैसर्गिक असतात. आपण माणसे अनैसर्गिक असतो, बऱ्याच कृत्रिम गोष्टी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. आपण अशा अनेक गोष्टी स्वीकारलेल्या असल्यामुळे शुद्ध ज्ञानाला वंचित होतो; शुद्ध ज्ञान नसले की लहान-सहान गोष्टींनी आपण अस्वस्थ होतो, घाबरून जातो. सहजयोगी अस्वस्थ झालेला पाहून मला आश्चर्यच वाटते. सहजयोग्यापुढे प्रश्न आला आणि त्याच्याकडे साक्षीभावातून तो पाहू शकला नाही तर तो सहजयोगी नव्हे. पण हे प्रॅक्टिस करून येत नाही. उदा.– शिवभक्ती करताना त्यांची १०८ नावे म्हटली पाहिजेत असे सांगतात. त्याची जरूर नाही. नावे घेऊन ती देवता प्रसन्न होईल ही चुकीची समजूत आहे. म्हणून सहजयोग्यांना आपण परमचैतन्याचेच अंश आहोत हे शहाणपण आधी आले पाहिजे. त्याच्याकडूनच सर्वकाही पार पाडले जाईल; ते सर्व काही सुंदर तऱ्हेने घडवून आणते. आता काही सहजयोग्यांनाही अडचणींना तोंड द्यावे लागते ही मी मान्य करते. पण तुम्ही परमचैतन्याचेच अंश असल्यामुळे तेच सर्व करते, तुम्ही काहीच करत नाही हे माहीत असल्यामुळे तुम्ही त्यातूनही पार पडता. आजारपण, आर्थिक प्रश्न, कौटुंबिक प्रश्न हे सर्व चालणारच. पुष्कळ सहजयोगी पत्राने मला त्यांचे प्रश्न कळवतात पण मला एवढेच विचारावेसे वाटते की, 'तुमचा परमचैतन्यावर विश्वास आहे का?' मग त्याला काय करायचे कसे करायचे हे सर्व समजते. तुम्ही सर्व काही परमचैतन्यावरच सोपवणे यातच शहाणपण आहे. अनुभवातूनच हे येईल. उदा. एक जर्मन महिला कार चालवत असताना गाडीचे ब्रेक एकाएकी बिघडले. प्रसंग फार कठीण होता; पण तिने स्टीअरिंग-व्हीलवर डोके ठेवले आणि सर्व परमचैतन्यावर सोपवले आणि थोड्याच वेळात तिची कार रस्त्याच्या कडेला येऊन थांबली. परमचैतन्याचे कार्य असे चालते आणि ते समजून वागणे यातच शहाणपण आहे. सहजयोग्यांना असे पुष्कळ अनुभव आले आहेत. सहजयोग्यांना दीर्घायुष्यही मिळते; पण दीर्घ आयुष्य म्हणजे तुम्ही कसे होणार, काय करायचे, पैसा कसा येणार इ. काळज्याचे करत बसायचे असे नाही, तसे केलेत तर परमचैतन्य तुमच्याजवळ राहणार नाही, तुझे चालू दे असे म्हणून ते गप्प बसेल. काय होणार असेल ते होणारच असे म्हणण्यापेक्षा परमचैतन्यावर सोपवले की त्यातून ते तुमच्या हिताचा मार्ग काढेलच. "देवावर सोपवले" म्हणतो त्याचा अर्थ परमचैतन्यावरच सोपवले. जगातील, चराचरातील अणुरेणूही या परमचैतन्याच्या सत्तेखाली व नियंत्रणात असतात. हे इतके व्यापक आहे की ते लोकांच्या लक्षात येत नाही. एरवी आपण वकील, डॉक्टर, इंजिनिअर इ. मंडळींवर कार्य सोपवतो पण त्यांच्या हातूनही चुका घडू शकतात पण परमचैतन्याचे कार्यच अलौकिक आहे.

माझ्या आयुष्यातही अशा घटना घडल्या आहेत. आम्ही पुण्यामध्ये घर बांधत होतो. मोठ्या स्लॅबचे काम करायचे होते आणि त्याला तीनशे पोती सिमेंट लागणार होते. काम मोठे असल्यामुळे रात्रभर काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी संपवायची त्यांनी तयारी केली होती. पण संध्याकाळी पाच वाजता मी सहज म्हणून काम

बघायला आले तर काम पूर्णपणे संपवून मजूर परत निघाले होते. बरोबरच्या लोकांचा विश्वासच बसेना; त्यांच्या समाधानासाठी हनुमानाने ते काम केले असे मी म्हणाले. खरे तर सर्व देव-देवता या परमचैतन्याचेच अविभाज्य भाग आहेत.

आता आपण मातेची पूजा करत आहोत. मातेजी पूजा ही फार मोठी गोष्ट आहे; सर्व देव-देवता तिचीच लेकरे आहेत, तिच्याच अधिपत्याखाली व तिच्याच विचाराधीन आहेत. श्रीगणेशांनी पृथ्वीप्रदक्षिणा जिंकण्यासाठी आपल्या आईभोवतीच एक फेरी मारल्याची गोष्ट तुम्हाला ठाऊक आहेच. तेच मी तुम्हाला वरचेवर सांगत आहे की परचैतन्यावरच सर्व काही सोपवण्यात शहाणपण आहे. आता मला कॉम्प्यूटर कॅलक्युलेटर वगैरे काही समजत नाही पण मला जर तुम्ही एखादे अवघड गणित घालून विचारले तर माझ्या तोंडून ताबडतोब आकडा निघतो आणि तो बरोबर असतो. ते कसे होते मला माहीत नाही पण ते बरोबरच असणार हे मला ठाऊक असते. आता तुम्हीही तसे बना असे मी म्हणणार नाही पण तुम्ही सुज्ञता वापरा हा माझ्या सांगण्याचा हेतू आहे. त्याचा प्रत्येक वेळी उपयोग करत जा. माझे तुम्हाला एवढेच सांगणे आहे की तुमची आई जशी सर्व जगावर प्रेम करते, सर्व मानवजातीची काळजी घेते, ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळालेला नाही त्यांचीही काळजी घेते तसे तुम्हीसुद्धा जास्तीत जास्त लोकांना सहजयोगात आणायचा प्रयत्न करा. पण ते करतांना नवीन लोकांना तुमचे हे चक्र खराब आहे तुमच्यामध्ये भूत आहे वगैरे भाषा अजिबात वापरू नका. मीसुद्धा तसे कधी बोलत नाही. कारण तुम्हीही एकेकाळी त्यांच्याबरोबर होता व आता तुम्हाला ज्ञान मिळाले आहे हे लक्षात ठेवण्याचा समजूतदारपणा ठेवा; तुमच्या ज्ञानाचा उपयोग त्याला सुधारण्यासाठी करायचा असतो. त्याला हिणवण्यासाठी नाही; त्याची चक्रे सुधारतानाही त्याला त्याच्याबद्दल काही न सांगता व्हायब्रेशन्स वापरून ती ठीक करा. सहजयोगाच्या बऱ्याच कार्यक्रमांमधे आपण अगदी रूढीबद्दल मोठा आव आणून कहाण्या सांगत करण्याचा प्रयत्न करतो आणि लोक कंटाळून जातात व कार्य थांबते. लोकांबरोबर हा व्यवहार करताना तुम्ही तुमचे ज्ञान वाटले पाहिजे; ते स्वतःशीच ठेऊन उपयोग नाही. पण हे करतांना महत्त्वाकांक्षा बाळगू नये. मोठेपणा मिळवण्याची भावना ठेऊ नये तर फक्त आपल्याजवळ असलेले ज्ञान दुसऱ्यांना देऊन त्यांना मदत करण्यासाठी करावे. असे केल्यास सहजयोग लवकर पसरेल आणि लोक प्रभावित होतील. कधी कधी ऐकणारा विद्वान असतो आणि आपल्याला खूप काही माहीत आहे असे दाखवतो, अशावेळी नुसते हसा. कारण तुमचे ज्ञान हे तुमचे जीवनच आहे. ग्रंथ वाचून किंवा डिग्री मिळवून मिळालेले पढित ज्ञान नाही. इतर सर्व ज्ञान डोक्यामधे (मेंदू) असते पण शुद्ध ज्ञान हृदयात असते आणि डोक्यावर हृदयाचेच नियंत्रण असते आणि हे नियंत्रण असे चालते की आपण पूर्णपणे परमचैतन्याच्या आधीन होऊन कार्य करतो. तुमचे हृदय स्वच्छ असले की तुमचे व्यक्तीमत्त्वही स्वच्छ व शुद्ध बनते. मग तुम्ही मनाकडून काही कार्य करत नाही. यासाठी तुमचे हृदय अगदी स्वच्छ तसेच विशाल असले पाहिजे. कुणाबद्दल तरी फार अटॅच होणे, कुणामधे अडकून पडणे हा हृदय स्वच्छ नसल्याचा प्रकार आहे. म्हणून हृदय जास्त जास्त उघडा.

देवीचे वास्तव्य मध्य-हृदयात आहे. म्हणजे ती पूर्णपणे संतुलनात आहे. ती तुम्हाला सर्व काही देते. तीच आपले ज्ञान म्हणून स्मृति, निद्रा, भ्रांति इ. अनेक स्वरूपात प्रस्थापित आहे. हे सर्व श्लोक तुम्ही म्हणता, ती आपल्याला भ्रांतिमध्ये टाकते कारण आपण परिपक्व झालेले नसतो आणि आपल्याला आपण शिकावे म्हणून मायामोहात गुंतवते. त्या मायेत आपण फसणार नाही याबद्दल आपण खूप सतर्क राहिले पाहिजे. म्हणजे आपल्याला आपला मूर्खपणा कळावा म्हणून ती हा एक प्रकारचा खेळ खेळवते. मानवाची स्वाभाविक वृत्ति सरळ सांगितलेली गोष्ट समजून घेण्याची नसते. त्यामुळे अशा भ्रांतिमध्ये अडकल्याचे कळल्याशिवाय माणसाला शहाणपण येत नाही.

परमचैतन्याने आपल्यासाठी इतके सारे करुन ठेवले आहे हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. मग देवीने दिलेल्या सर्व शक्ति मिळवण्यासाठी आपण काय करायला हवे? आपण करायचे असे काही नसून आपली भक्ति (शरणागति) गहन कशी होईल किडे लक्ष द्यायचे; आणि तुम्ही आता त्याच मार्गावर आलेले असल्यामुळे तुम्हाला ते अवघड नाही.

आज कबेल्यातील शेवटची पूजा आहे आणि म्हणून मला तुम्हाला हेच सांगायचे आहे की तुम्ही परमचैतन्यावरच पूर्ण भरवसा ठेवत चला. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. काही लोकांना नेहमी दुसऱ्यावर दोष टाकण्याची संवय असते; अमक्यामुळे माझी चक्रे खराब झाली म्हणायची संवय असते. खरे तर तुम्ही तुमच्या स्वतः मुळेच ती खराब करुन घेता. या कल्पनांना अर्थ नाही. स्वतःला नीट पहा, तपास करा तरच तुम्हाला परिपूर्ण होता येईल. हे फार महत्त्वाचे आहे. लोकांना असेही वाटते की आता काहीतरी महान घटना घडण्याचा काळ आला आहे. सन २००० वगैरेबद्दल ते बोलत असतात. पण त्या साऱ्या मानवी कल्पना आहेत. पण मी इतरांनी केलेले भाकीत सांगत होते आणि ते म्हणजे कदाचित तुमच्या समजूतदारपणामुळे, तुमच्या ज्ञानामुळे, तुमच्या सुज्ञतेमुळे असे काहीतरी महान कार्य होईल की जगामध्ये सर्व गोष्टी सुरळीत होऊ लागतील. कारण ही Last Judgement ची वेळ आहे; आता तुमच्यावर खूपच मोठी जबाबदारी आहे आणि मला खात्री आहे की तुम्ही भविष्यकाळासाठी काहीतरी महान साध्य करण्याचा निश्चय कराल तर तुम्हाला यश येईलच.

परमेश्वराचे सर्वांना अनंत आशीर्वाद

●●●

# आदिशक्ती पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश), कबेला : ६ जून ९३**

तुम्ही सर्वजण आज माझी आदिशक्ती रुपात प्रथमच पूजा करणार आहात. नेहमी तुम्ही माझी पूजा इतर कोणत्या ना कोणत्या स्वरुपात करता अथवा माझ्यातील शक्तींच्या एखाद्या रुपाची पूजा करता. आता तुम्हाला "आदिशक्ती" ही काय आहे हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे "आदिशक्ति" ही श्री सदाशिवांची शुद्ध इच्छा आहे. परंतु परमेश्वराची शुद्ध इच्छा काय आहे? जर तुम्ही तुमच्या इच्छांकडे पाहिले तर असे दिसते की त्या सर्व इच्छा, ईश्वरी प्रेमातून, सर्वांकरिता वाटणाऱ्या प्रेमातून नव्हे तर भौतिक प्रेमातून अथवा सत्तेच्या प्रेमातून उगम पावलेल्या असतात. तुमच्या ह्या इच्छांमध्ये प्रेम असते पण हे प्रेम ऐहिक स्वरुपाचे असते. त्यासाठी तुम्ही तुमच्या आयुष्याचा बराचसा वेळ खर्ची घालता. एवढे करुनही तुम्हाला समाधान मिळत नाही कारण त्या इच्छा शुद्ध प्रेमातून आलेल्या नसतात, तर त्या तुम्हाला तात्पुरत्या मोहातून आलेल्या असतात आणि म्हणून शेवटी कंटाळून तुम्ही त्या इच्छा सोडून देता व दुसऱ्या इच्छांच्या मागे लागता. हे असेच सारखे चालू राहते कारण त्या शुद्ध इच्छा नसतात.

आदिशक्ती ही परमेश्वराच्या शुद्ध प्रेमाची प्रत्यक्ष मूर्ती आहे. परमेश्वर त्याच्या प्रेमात काय करु इच्छितो? तर मानव निर्मिती. असा मानव जो खूपच आज्ञाधारक असेल, पूजनीय/उदात्त असेल जसा कोणी एक देवदूतच. परमेश्वराची "ॲडाम आणि इव्ह" यांची निर्मिती ह्याच एका प्रेमळ इच्छेतून झाली होती. देवदूतांना स्वातंत्र्य नसते, त्यांना तसेच निर्माण केलेले असते. ते नेहमी बद्ध असतात व ते तसे का असतात हे त्यांना माहित नसते. पशू/जनावरेही कित्येक गोष्टी करतात पण त्यांना ते हे का करतात हे माहित नसते, ते त्या गोष्टी नुसतेच करत राहतात. कारण निसर्गनियमांनी बद्ध असतात. ते सर्व परमेश्वरी शक्तिशी बांधील असतात. श्री शिवांना "पशुपती" असेही दुसरे नाव आहे कारण सर्व पशूंवर त्यांची सत्ता आहे. सर्व पशुंनाही इच्छा असतात, त्या चांगल्या का वाईट ह्याचा ते विचार करत नाहीत अथवा त्याबद्दल पस्तावतही नाहीत कारण त्यांना अहंकाराचा लवलेशही नसतो. कर्माचे कर्तव्य नसल्याने अहंकाराला स्थान नसते ते निसर्गनियमांशी बांधील असतात.

ह्यावेळी आदिशक्तींचे अवतरण होते जी परमेश्वरी प्रेमाची प्रत्यक्ष मूर्ती आहे. तेव्हा पित्याचा (श्री शिवांचा) तुम्ही विचार केलात तर तुम्हाला त्यांच्याजवळ काय शिल्लक राहिले आहे असा प्रश्न पडेल, कारण त्याने आदिशक्ती ह्या एकाच अवतरणासाठी आपले सर्वच्या सर्व प्रेम खर्ची घातले आहे. तो फक्त पहात आहे व कसलाच विचार करत नाही. तो आपली इच्छा व प्रेम ह्याचा खेळ पहात आहे. आपली इच्छा व प्रेम कशाप्रकारे कार्यरत होत आहे हेच तो पहात आहे, तो जेव्हा तिच्या (आदिशक्तीच्या) लीला पहात असतो, त्यावेळी तो फार सावध असतो. त्यांना ठाऊक आहे की आपण जे व्यक्तिमत्त्व बनवले आहे ते प्रेम व दयाळूपणाने ओतप्रोत आहे व हे गुण असे आहेत की जे उच्च दर्जाचे असल्याने त्यांना कोणी त्यांच्या प्रेमाच्या अथवा दयाळूपणाच्या विरोधात आलेले, किंवा त्याचा दर्जा कमी लेखण्याचा प्रयत्न केलेला चालत नाहीत. ह्यासाठी ते फारच जागरुक व डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवतात.

आता ह्या प्रेमाच्या इच्छित व्यक्तित्वाला अहंकार दिला, आणि त्या अहंकाराला त्याला वाटेल तसे वागायला दिले. त्यामुळे ते व्यक्तित्व खूपच स्वावलंबी/स्वतंत्र व्यक्तिमत्त्व बनून त्याला काय आवडेल ते, ते करायला मुक्त झाले. आपण आपल्या ऐहिक जीवनात विचारच करु शकत नाही की पती-पत्नि हे त्यांना हवे ते करु शकतात कारण त्यांच्यात समन्वय/एकरुपता नसते. तसेच त्यांच्या विचारात साम्य नसते व त्यांच्यात एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाणही नसते, पण हे चंद्र आणि चंद्रप्रकाश, सूर्य आणि सूर्यप्रकाश ह्यासारखेच आहे. ही एकरुपता अशी आहे की जो कोणी एक (दोघांपैकी) काही करेल तर ते त्याचा आनंद घेतात. अशा ह्या सुंदर-विसंवादाच्या क्षणी आदिशक्तीने त्यांचा (श्री शिवांचा) उद्देशच बदलण्याचे ठरवले. आदिशक्ती तिच्या "संकल्प विकल्प करोति" ह्या गुणाबद्दल सर्वांना चांगलीच माहित आहे. जर तुम्ही एखादी गोष्ट खूप ठरवून करायचे ठरवलेत तर ती त्याचे निराळेच करुन ठेवते. जसे आजची ११ वाजता होणार पूजा. ज्यावेळी "ॲडाम व इव्ह" निर्मिती केली त्या वेळी तिने विचार केला की हे इतर प्राणीमात्रांप्रमाणेच किंवा देवदुताप्रमाणे असून काय उपयोग? त्यांना ते काय करताहेत, कशासाठी करत आहेत हे कळले पाहिजे. त्यांना ज्ञान मिळविण्यासाठी स्वातंत्र्य असले पाहिजे. इतर जनावरांप्रमाणे फक्त निसर्ग नियमांशी त्याची बांधीलकी असणे व एखाद्या यंत्रासारखे असणे बरे नव्हे. आदिशक्तीने आपल्या स्वतंत्र अधिकारात जो सर्वांना मान्य होता, अशा अधिकारात "ॲडम व इव्ह" यांना सर्पिणीच्या रुपात येऊन ज्ञानाचे फळ चाखण्यास/खाण्याचा सल्ला दिला. तुम्ही हे नॉन-सहज योग्याला सांगू शकत नाही, कारण त्यांना हे ऐकून आश्चर्याचा धक्काच बसेल. स्त्रिया बऱ्याचशा गोष्टी लवकर अंगीकारतात/स्विकारतात, म्हणून सर्पिणीने ही गोष्ट प्रथम स्त्रीला सांगितली, पुरुषाला नाही. पुरुष भूताला स्विकारेल, एखादी मुर्खपणाची गोष्टही स्विकारेल पण स्त्री तशी नाही. पुरुष प्रत्येक गोष्टीची चर्चा करेल त्यावर वाद घालत बसेल म्हणून ती स्त्रीकडे (इव्हकडे) आली व तिने तिला सांगितले. हे "होली घोस्ट" खरोखरीचे स्त्रीरुप आणि म्हणून ते स्त्रीयांच्या जवळचे वाटते. हे "होली घोस्ट" सर्पिणीच्या रुपाने आले व त्याने "इव्हला" ज्ञानाचे फळ खाण्यास सांगितले. आता आपल्या पतीला हे पटवून सांगण्याची जबाबदारी स्त्रीची होती. ही जबाबदारी त्या पार पाडू शकतात. कारण त्यांना ते कसे करायचे हे चांगले माहित असते. काही वेळा स्त्रीया चुकीच्या गोष्टीबद्दल पटवून देतात. काही वेळा खूपच अनिष्टसुद्धा पटवून देतात, जसे "मॅकबेथला" त्यांच्या बायकोने चुकीच्या मार्गाबद्दल पटवून दिले, हे तुम्हाला माहीतच आहे. बऱ्याच ठिकाणी आपण स्त्रीयांनी त्यांच्या पतीला चुकीचे मार्गदर्शन केलेले पाहिले आहे. जर पुरुषाला योग्य पत्नी मिळाली तर त्याला अयोग्य सल्ला, योग्य सल्ला अथवा बंधमुक्त करु शकते. ॲडमचा त्यांच्या पत्नीवर विश्वास होता. आणि

म्हणून त्याने तिच्यावर विश्वास ठेवला व परमेश्वराच्या स्त्री रुपातील होली घोस्टच्या सांगण्याप्रमाणे ते ज्ञानाचे फळ त्या दोघांनी खाल्ले. ज्यांना खिस्तांबद्दल, महंमदसाहेबांबद्दल तसेच नानकसाहेबांबद्दल थोडी माहिती असेल त्याच्या हे लक्षात येणार नाही. त्यांना हे समजणारसुद्धा नाही. त्यांनी जर हे लोकांना सांगितले तर लोक म्हणतील, वा! वा! आम्ही तर असे कोठे ऐकले नाही, व त्यांचे म्हणणे ते समजून घेणार नाहीत.

त्याकाळी अवधान कशा प्रकारचे आहे, स्विकार करण्याचा मार्ग कसा आहे हे पहात व धर्माबद्दल व उत्थानाबद्दल बोलत. परंतु भारतात फार पूर्वीपासून कुंडलिनी बद्दल बोलत, की कुंडलिनी ही आदिशक्ती आहे व ती आपल्यात प्रतिबिंबीत झाली आहे. तुम्हाला आताच वाचून दाखविले की मी त्या सर्वांच्यात आहे. आता लक्षात घ्या आदिशक्ती ही प्रेमाची शक्ती आहे. ती शुद्ध प्रेम आणि दयेचीही शक्ती आहे. तिच्या हृदयात दुसरं काहीही नाही तर फक्त शुद्ध प्रेम आहे. ते शुद्ध प्रेम खूप बलवान/शक्तिशाली आहे व हे तिने धरणीमातेला दिले आहे. हे प्रेम तिला दिले असल्यामुळेच आपण कसेही वागलो, आपण कितीही पापं केली तरी धरणीमाता आपल्या सर्वांसाठी कितीतरी चांगल्या सुरेख गोष्टी तिच्या प्रेमातून आपल्याला बहाल करते. आकाशातील चांदण्यात सौंदर्यावान अशी आकाशगंगा हे तिच्या शुद्ध प्रेमाचेच प्रकटीकरण आहे. हे सर्व तुम्ही शास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर– शास्त्राला प्रेम नसते. लोक योगाबद्दल बोलतात पण त्यात प्रेम भावना नसते. ते प्रेम व करुणे/दयेबद्दल काही बोलत नाहीत.

ज्याचे ठाई प्रेम-दया/करुणा नाही अशा मानवाजवळ दैवी शक्ती असूच शकत नाही. या दैवी प्रेमात सर्व काही सामावलेले आहे. ह्या जगातील निर्माण झालेली प्रत्येक गोष्ट, जगच्या जग हे सर्व दैवी आईच्या प्रेमातूनच झालेले आहे. आदिशक्तीचे प्रेम हे इतके सूक्ष्म/चटकन लक्षात न येण्याजोगे असल्याने एखादे वेळेस ते तुम्हाला समजणारही नाही. मला माहित आहे की तुम्ही माझ्यावर खूप प्रेम करता एवढेच नव्हे तर तुमचे माझ्यावर प्रचंड प्रेम आहे. मला ज्या वेळी तुमच्याकडून व्हायब्रेशन्स येतात त्यावेळी समुद्रातून काठावर येणाऱ्या लहान लाटप्रमाणे असतात येवढेच नव्हे तर त्या लाटांप्रमाणे काठावरुन परत जाताना काठावर लहान लहान चमकणारे थेंबही दिसतात. ह्यासारखेच माझ्या हृदयांतही मला तुमच्या प्रेमाचा पडसाद जाणवतो पण त्या अनुभवाचे वर्णन मी करु शकत नाही पण हे सर्व होत असताना माझ्या डोळ्यांत अश्रु उभे राहतात. कारण ही करुणा आहे. ही कोरडी नसून ओली आहे. (Sandra Karuna)

वडीलांची करुणा ही कोरडी असते. ते सांगतात हे कर, न करशील तर गोळी घालीन. पण हेच आई असे सांगेल की त्याला काही दुःख होणार नाही. तिची अनुकंपाही आर्द्र (प्रेमाने ओथंबलेली) असते त्यामुळे ती कोणाला सुधारणा करण्याबद्दल जरी सांगायचे असले तरी प्रेमाने/प्रेमाच्या ओलाव्याने सांगेल. वडिलांसारख्या कोरड्या (Dry) भाषेत नव्हे, कारण तिचे हृदय दैवी प्रेमाने विस्तारीत झालेले असते. एवढेच नव्हे तर शरीराचा प्रत्येक भाग (अंग-प्रत्यंग) हेसुद्धा दैवी प्रेमानेच घडविलेले असते. व्हायब्रेशन्स् हे दुसरे तिसरे काहीही नसून दैवी प्रेमाचाच आविष्कार आहे.

मी पूर्वी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे ह्या (आदिशक्तींच्या) शक्तीचे अवतरण होणार. ती वेळ आता आली आहे, परंतु ती वेळ निश्चित नाही कारण ती वेळ सहज आहे. नक्की वेळ कोणत्या बाबतीत सांगता येते तर ही आगगाडी केव्हा सुटेल व केव्हा कोठे पोहोचेल, तसेच एखादे यंत्र एखादी वस्तू किती वेळात निर्माण करु शकेल. परंतु जागृत/जिवंत गोष्टी ह्या उत्स्फूर्त असतात. त्या सहज असतात त्यामुळे त्यांच्याबद्दल वेळ सांगता येत नाही. तसेच स्वातंत्र्याच्या पद्धतीचे आहे. तुम्हाला जास्तीत जास्त स्वातंत्र्य आहे. म्हणून कोणी हे केव्हा घडेल हे सांगू शकणार नाही, की कोणत्या वेळी लोक हे सहज न समजू शकणारे दैवी प्रेमाचे ज्ञान मिळविण्यासाठी भेटतील. ज्ञान हे सुद्धा खूप कोरडे/भावनाशून्य असू शकते. भारतात असे काही भयंकर लोक होते जे खूप वाचन करत, मंत्र पठण करत, जपजाप्य करत. त्यामुळे ते इतके कोरडे/ भावनाशून्य होत व नुसते हाडाचे सापळेच होत. त्यांनी जर कोणाकडे पाहिले तर त्यांच्या नजरेच्या शक्तीने ते समोरच्याची राख/भस्म करुन टाकत. मला म्हणायचे की तुम्ही एवढी तपश्चर्या केलीत या पृथ्वीवर जन्म घेतलात तो काय दुसऱ्याचे भस्म करण्यासाठीच? पण त्यांना त्याच गोष्टींमुळे स्वतःचे मोठेपण वाटत असे. त्यांच्या हृदयात परोपकारी बुद्धिची कल्पनाच नव्हती. या परमेश्वरी प्रेमाचे पहिले कार्य म्हणजे कल्याणकारी बुद्धि तुमच्या हृदयात बाणवणे. कल्याण हा शब्द एक गैरसमज असणारा शब्द आहे. कल्याण म्हणजे जे तुमच्या आत्म्याला चांगले आहे ते. तुम्हाला माहितच आहे की आत्मा हे परमेश्वराचेचे प्रतिबिंब आहे व ते तुमच्यात जेव्हा त्याचे सौंदर्य झळाळून येते त्यावेळी तुम्ही देणारे/दाते होता व तुम्ही कोणाकडून काही घेणारे रहात नाही. आता उत्थान केव्हा होणार हे आधीच ठरलेले आहे. मी म्हटल्याप्रमाणे तुम्हाला स्वातंत्र्य आहे. लोक मार्थोफरुप्रमाणे सर्व गोष्टी करीत आहेत. तुम्ही जर पाहिले तर ह्यावेळेआधी काही लोक आपली शक्ति दाखविण्यासाठी काहींनी भारतावर आक्रमण केले. तेथली भूमी बळकावली, काही चीनमध्ये गेले, काही आफ्रिकेत गेले. अमेरिकेत तर अमेरिकेतच जाऊन ती भूमी बळकावून बसले.

ती वेळ अशी होती की सर्व जण आपले स्वातंत्र सत्ता मिळविण्यासाठी वापरत होते. ती वेळ आदिशक्तीने अवतरण घेण्याची नव्हती. त्यावेळी लोक सत्तालोलूप होते. ते सत्ता आणि प्रदेश मिळविण्याच्याच मागे होते. त्या काळी लोकांना साम्राज्यवादाच्या तावडीतून सुटून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झगडावे लागत होते. हळुहळु त्यात बदल होत गेला. आश्चर्य म्हणजे हा बदल मी स्वतः बघितला आहे. हा बदल कसा कार्यान्वित झाला? तर मी स्वतःच भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. हे फार महत्त्वाचे आहे. साम्राज्यवाद्यांपासून स्वातंत्र्य मिळविण्याची चळवळ प्रथम भारतात सुरु होऊन ती इतर देशात पसरली. लोक स्वातंत्र्याबद्दल विचार करु लागले. त्यांच्या हे लक्षात आले की वसाहतवादाचा काही उपयोग नाही तर आपली पहिलीच स्थिती योग्य होती. हे जे सर्व घडले ते माझ्या स्वतःच्या आयुष्यकाळात घडले. स्वातंत्र्य चळवळीस ज्यांनी सुरुवात केली त्यांना प्राण गमवावे लागले. ह्या चळवळीत खूप लोकांना हौतात्म्य प्राप्त झाले. भारतातील भगतसिंगाप्रमाणेच इतर देशातही क्रांतीवीर आहेत. सर्व क्रांतीकारकांना वाईट वागणूक देऊन ठार करण्यात आले. प्रश्न स्वातंत्र्याचा नव्हता परंतु त्यासाठी बलिदानाचा होता त्यांना आता असे वाटते की आपण जे काय केले तो मूर्खपणा होता, कारण हे खरे स्वातंत्र्य नव्हे. त्याचा त्यांना पश्चात्ताप होऊन त्यांची डावी विशुद्धी बिघडली. आपण काही चुकीचे केले आहे असे वाटून ते स्वतःला दोषी समजू लागले.

अशी परिस्थिती असतानाच जाती संस्था, गुलामी वांशीक उच्च-निचता, ह्यांही सारख्या समस्या होत्या. ह्या सर्व मुर्खपणाच्या गोष्टी त्यांनी आपल्या स्वतंत्रतेतून निर्माण केल्या होत्या, पण हे सर्व अवास्तव व असत्य आहे. आता जर मला एखादी गोष्ट पटवायची असेल तर मी तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगत राहिले की हा गालीचा नाही! हा गालीचा नाही!! हा गालीचा नाही!!! दुसरे काही तरी आहे तर तुमचा बुद्धीभ्रंश होऊन, संमोहन केल्यासारखे तुम्हास ते पटेल, अशाच प्रकारे पूर्वीच्या लोकांकडून झाले असल्यामुळे सर्वांनी जाती-जातीला उच्च-नीचता, वांशिकवाद, गुलामी, स्त्रियांना वाईट वागणूक देणे ह्या गोष्टी समाजात रुढ झाल्या. त्यांना काय चांगले काय वाईट हे निवडण्याचा अधिकार दिल्यामुळे हे सर्व निर्माण झाले. त्यांच्या दृष्टीने हे सर्व बरोबरच होते म्हणून त्यांनी ते केले. अशा परिस्थितीत दैवी करुणा व प्रेम हे वाया गेले असते कारण समाजाची बौद्धिक व मानसिक तयारी नव्हती. तुम्ही हे सर्व आंधळेपणाने व अज्ञानाने करत आहात हे तुमच्यासाठी अजिबात योग्य नाही हे तुम्ही त्यांना सांगू शकला नसतात. ह्याने तुम्हाला मोठेपण मिळणार नाही. हा अधमपणा/नीचपणा आहे. अनेक संत झाले, त्यांनी कुलिनता, क्षमाशिलता, एकी व एकात्मता ह्यावर भर दिला, तसेच अनेक दुष्ट होऊन गेले व त्यांनीही तेच सांगितले परंतु समाजाने त्यांचे मानले नाही. मला वाटते की नंतर हळू हळू संतांच्या शिकवणीचा परिणाम समाजावर दिसू लागला.

त्यांनी निर्माण केलेल्या तथाकथित धर्माबरोबरच अनेक समस्या निर्माण झाल्या. धर्माची घसरण होऊन त्यांची निरनिराळी डबकी निर्माण झाली, एकीकडे मुस्लिम, एकीकडे ख्रिश्चन, एकीकडे हिंदू वगैरे वगैरे. ह्या डबक्यांना जोडून सर्वांची एकत्रित जीवनसरिता बनविण्याची आवश्यकता होती. एक मानव दुसऱ्या मानवापेक्षा उच्च दर्जाचा आहे असे मानणे हे अज्ञान असून मूर्खपणाचे आहे. तुम्ही फारतर असे म्हणू शकता की तो एका पातळीवर आहे, दुसरा त्याहीपेक्षा उच्च पातळीवर आहेत परंतु सामान्यपणे तुम्ही कोणाला तो वाईट आहे असे म्हणणे बरोबर नाही. तसेच एखाद्या समजाचा धिक्कार करु शकत नाही. एखाद्या समाजातील एका व्यक्तिबद्दल तुम्ही मत प्रदर्शित करु शकता. अज्ञान इतके गाढ होते कि ते सामुहीक अज्ञान बनले. ते सर्व एकत्रित होऊन म्हणू लागले की आमचा हा धर्म सर्वोत्तम आहे व आम्ही जे काही आहोत ते सर्व ह्यामुळेच. दुसरे लोक म्हणू लागले की हे लोक तर एकदम खालच्या पातळीचे आहेत व आम्हीच सर्वोत्तम आहे. अशाप्रकारे धर्माच्या व देवाच्या नावाखाली या मूर्खपणाच्या गोष्टी सुरु झाल्या. आता आदिशक्ती सर्व शक्तिनीशी योग्यायोग्य काय याची शिकवण देण्यासाठी आली आहे. पहिल्याप्रथम तीच्या असे लक्षात आले की याची शिकवण देण्यासाठी आली आहे. पहिल्या प्रथम तिच्या असे लक्षात आले की प्रत्येकाला कुटुंब म्हणजे काय हे समजले पाहिजे. लहान मूल कुटुंबात वाढत असते. जर त्यांच्याकडे आई अगर वडिलांचे योग्य प्रकारे लक्ष नसेल तर ते बिघडते. तसेच जर आईवडिलांनी खूप लाड केले तरीही ते बिघडू शकते. म्हणून लहान मुलांकडे दुर्लक्ष अथवा जास्त लाड केल्याने ते बिघडले तर त्याला खरे प्रेम काय आहे हे समजत नाही.

तुमचे तुमच्या मुलाकडे सतत लक्ष असले तर ते अतिलाड नसून मुलाच्या भल्यासाठीच असते, आणि तुही नेहमीच हित पाहता, म्हणून मला वाटते की कौटुंबिक जीवन असणे हे आवश्यक आहे हे सिद्ध होते. आजच्या काळात सुद्धा धर्माच्या नावाखाली साध्वी, सन्यासी, धर्मगुरु व अनेक बाबा निर्माण झाले आहेत, त्यामुळे लोक आपले संसार, मुले-बायका यांना सोडून सन्यासी होत आहेत, कारणे हे सन्यासी लोक रुक्ष असल्याने ते लोकांना चुकीचा मार्ग दाखवित आहेत. माझ्या असे पहिल्यांदा लक्षात आले कि मनुष्याला प्रेम मिळाले नाही तर त्याला प्रेम काय आहे हे कळणार नाही आणि जर हे प्रेम सामुहिक असले तर ते जास्त परिणामकारक होते. भारतात कुटुंबातील लोकांचे एकमेकांवर प्रेम असते. मला असे म्हणायचे आहे कि आपल्याला त्यांच्याशी असलेल्या नात्यासंबंधी काहीही माहिती नसताना सुद्धा आपण त्यांना भाऊ बहिण किंवा वडील या नात्याने प्रेम करतो, कारण भारतात एकत्र कुटुंबव्यवस्था आहे.

एकत्र कुटुंब व्यवस्था म्हणजे सामुहिक व्यवस्था. त्या व्यवस्थेत कोण भाऊ (सख्खा) आहे, कोण सावत्र भाऊ आहे, कोण चुलत भाऊ आहे वगैरे काहीही भेदभाव नसतो व ते नातेसंबंध आहेत या भावनेने एकत्र रहात असतात. पण ही एकत्र कुटुंब व्यवस्थाही आर्थिक किंवा इतर कारणांमुळे मोडकळीस आली. आता ज्या वेळी लोकांना कौटुंबिक प्रेमाचे महत्त्व कळायला पाहिजे अशी कठीण वेळ आली असतानाच प्रत्येक देशात जास्त करुन पाश्चिमात्य देशात कुटुंब व्यवस्था मोडकळीस आली कारण तेथील स्त्री-पुरुषास कौटुंबिक सुख हे काय आहे हे माहितच नाही. त्यांचा कुटुंब व्यवस्थेवर विश्वास नसल्याने बिचारी मुले अस्थिर व हिकमती (लबाड) होतात. त्याचा पायाच अस्थिर असतो त्याचे ठीक तऱ्हेने पालन व सांभाळ होत नाही आणि ह्यामुळेच एक बेजबाबदार व हिंसक तसेच पछाडलेली पिढी निर्माण होते. ही पिढी एक प्रकारचे युद्ध पिसासूच असतात. त्यांना सारखे लढावेसे वाटते. काही वेळा तर मुले झाडाशीसुद्धा युद्ध/भांडताना आढळतात. त्यांना मी विचारले तुम्ही का भांडता तर ते म्हणतात भांडण्यातच फार मजा आहे. त्यांना ते का भांडतात ह्याचे कारण माहित नसते, कशातही प्रेम नसते, सर्व गोष्टीत तिरस्कार असतो, तुम्हाला माहीत आहे, मला का आवडत नाही. ते त्यांच्या वैफल्यातून समोरील कोणतीही गोष्ट नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. तेव्हापासून एक नविन प्रवाह सुरु झाला, युद्ध झाली. आपल्याकडे मुल्य/तत्त्व असून सुद्धा समाज व आपली मुले बाळे मारली गेली. त्यामुळे लोकांमध्ये बळी तो कान पिळी हे तत्त्व जास्त पटू लागले, आणि म्हणून जो कोणी दुसऱ्यावर हुकुमत गाजवेल तोच श्रेष्ठ. त्या मुळे साम्राज्यवादी सरकारे संपली व वैयक्तिक दृष्ट्या हुकुमत गाजवीणे चालू झाले. ह्या पद्धतीमुळे अहंकार वाढू लागला. मुलांना सुद्धा असे शिक्षण द्यायला सुरुवात केली की मुले सुद्धा फार उद्धट व कृत्रीम वागू लागली. हे चुक आहे हे सांगितल्यावर सुद्धा त्या मुलांवर का नियंत्रण ठेवता आले नाही हे समजणे कठीण आहे.

लोक जर ध्यान करत नसतील तर ती संसारिक गोष्ट म्हणावी लागेल. तुम्ही जर ध्यान करत नसाल तर माझ्याशी तुमचा काहीही संबंध नाही, तुमचं माझं काहीही नातं नाही आणि माझ्यावर तुमचा अधिकारही नाही, आणि हे असं का झालं आणि हे तसं का झालं असे प्रश्न विचारण्याचे कारणही नाही. मी तुम्हाला नेहमी ध्यान करा असे सांगत असते तरी तुम्ही ध्यान केले नाही तर मला तुमच्याशी कर्तव्य नाही. तुमचा जर माझ्याशी संबंध नसेल (Connection) तर तुम्ही इतर लोकांसारखेच असाल. जरी तुम्ही सहजयोगी असाल, तुम्हाला तुमच्या लिडरकडून फार मोठे सहजयोगी असल्याची पदवी मिळाली असेल तरीही तुम्ही जर सकाळी अथवा संध्याकाळी ध्यानधारणा करत नसाल

तर तुम्ही माताजींच्या कृपा छत्राखाली असणार नाही, कारण हा संबंध फक्त ध्यान आणि ध्यानातूनच निर्माण होतो. मला असे बरेच जण माहीत आहेत की जे ध्यानधारणा करीत नाहीत व त्यामुळे त्यांना व त्यांच्या मुलाबाळांना व कुटुंबाला त्रास होतो मग ते माझ्याकडे येऊन काही काही सांगतात पण मला ते लोक ध्यानधारणा करीत नसल्याचे स्पष्ट दिसते, आणि म्हणून त्याचा व माझा संबंध नाही म्हणून त्यांना मला काहि प्रश्न विचारावयाचा अधिकारही नाही. अर्थात सुरूवातीला ध्यान लागायला वेळ लागतो पण एकदा का ते समजले की माझ्या सहवासाचा आनंद घेता येतो. माझ्याशी तुम्ही एकरुप होता तसेच माझ्याशी तुमचा संपर्क राहतो आणि मग मला पत्र वगैरे लिहिण्याची गरज तुम्हाला गरज पडत नाही. फक्त ध्यान करण्याची आवश्यकता आहे. तुमची आध्यात्मिक प्रगती ध्यानामुळेच होते. तुम्ही उच्च स्थितीला पोहोचता. हे जेव्हा होते तेव्हा तुम्ही सहजयोगात परिपक्व होता. त्यावेळी तुम्ही माझ्याशी पूर्णपणे एकरुप झाल्यामुळे ध्यान करणे सोडावेसे वाटत नाही. याचा अर्थ ३/४ तास ध्यान करणे असे नव्हे. तर तुम्ही किती उत्कटतेने माझ्यात एकरुप असता (ध्यानामध्ये) त्यावर ते अवलंबून आहे. तुम्ही किती वेळ ध्यान केले याला महत्त्व नाही. जर तुम्ही असे ध्यान करत असाल तर तुम्ही व तुमच्या मुलांची जबाबदारी माझ्यावर आहे. तसेच तुमचे उत्थान, तुमचे संरक्षण व तुमचे निगेटिव्हीटीपासून रक्षण करण्यास मी जबाबदार आहे. तुम्ही जर ध्यान केले नाही तर एखाद्या वडलांप्रमाणे मी काही तुम्हाला शिक्षा करणार नाही. बळजबरी करणार नाही, पण ध्यान न करण्यामुळे तुमचे माझे आंतरिक नाते न राहण्याने तुम्ही तुमचे कल्याण साधू शकणार नाही. मी तुम्हाला रोज ध्यान करा असे सांगत असते पण लोकांना त्याचे महत्त्व समजत नाही, व लोक मला आम्ही ध्यान करत नाही असे सांगतात "का"? तर ते असे सांगतात की आम्ह आत्मसाक्षात्कारि आहोत आम्हाला ध्यानाची काय गरज? हे साधन परिपूर्ण आहे पण जर त्याचे मेनशी कनेक्शन नसेल तर ते चालणार नाही (असून काय उपयोग) ध्यानामध्ये तुम्हाला परमेश्वरी प्रेमाचा आणि परमेश्वरी प्रेमाच्या वर्षावाचा अनुभव येतो. ध्यान करणाऱ्या माणसाच्या बाबतीत सर्व चित्र पालटते तो आतून खूपच तृप्त असतो, त्याचे आयुष्य सगळ्यांपेक्षा वेगळे असते, त्याची वृत्ती ही फारच निराळी असते.

तुमच्या म्हणण्याप्रमाणे उत्थानाच्या ह्या पहिल्या दिवशी तुम्ही माझी आज पूजा करीत आहात. आता तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. तो तुमच्या खूपच उपयोगाचा आहे. तो तुम्हाला आशिर्वाद आहे. तरी तुम्हाला तो जतन कसा करायचा व कसा वाढवावयाचा, व त्यांत आनंद कसा घ्यायचा हे तुम्हाला माहित हवे. ह्या त्या गोष्टींमुळे तुम्ही संतुष्ट राहता कामा नये तर तुम्ही दैवी शक्तिशी एकरुप व्हावयास हवे. तुम्हाला एकरुपता फक्त ध्यान केले तरच शक्य आहे. ध्यान करणे ही सोपी गोष्ट आहे. काही लोक म्हणतात आम्हाला वेळ मिळत नाही. एकतर आम्ही सारा वेळ कशाचा तरी विचार करीत असतो किंवा घड्याळाकडे बघून कामे करीत असतो सुरुवातीला तुम्हाला काही अडचणी येतील, मी नाही म्हणत नाही. हळुहळु तुम्ही ठीक व्हाल, त्यावर प्रभुत्व मिळवाल व ते तुम्हाला इतके चांगले समजेल की इतर काही हिणकस गोष्ट तुम्हाला आवडणार नाही. तुम्ही तन, मन व धनाचा विचार न करता श्रद्धेने ध्यान करायला पाहिजे. ध्यान न करण्यासाठी रात्री मी उशिरा आल्यामळे मी ध्यान केले नाही, किंवा सकाळी लौकर कामाला जायचे आहे म्हणून मी ध्यान केले नाही. या सबबी कोणासही ऐकवायची गरज नाही कारण ध्यान करणे हे तुम्ही व तुम्ही स्वतः या मधील गोष्ट आहे. ध्यानामुळे तुमचाच फायदा आहे दुसऱ्या कोणाच नाही. तुम्हाला हे सर्व मिळावे म्हणूनच हे सर्व घडले आहे.

आपण काय मिळवले आहे हे प्रत्येकला माहित हवे. तुमही आतून तसेच इतर संबंधात ठराविक उंची गाठायला हवी तुम्ही हे जमत नाही असे म्हणू नये. तर तुम्ही कोणीही असा परंतु तुम्ही उत्तम सहजयोगी होऊन ध्यानाचे बाबतीत नम्र असावयास हवे. मी तुमच्याशी बोलत असताना देखील ह्या ध्यानाच्या अवस्थेतच बोलते (सहस्त्रारात चित्त ठेऊन) कारण ते फार आनंददायी असते. तुमही फक्त आनंदाच्या सागरात उडी घ्या. प्रथम हे जरा अवघड आहे. पण हळु हळु तुमच्या हे लक्षात येईल की तुमही हा संबंध प्रस्थापित केला आहे. ह्याच प्रमाणे आणखी एक गोष्ट आहे ती म्हणजे मी काही लोक आपल्यातच हरवून गेलेले पाहिले आहेत आणि हे अगदी साधारणपणे घडत असते. ते लोक स्वतः एकटेच व्यक्तिशः ध्यान करतात, खूप ध्यान करतात खरे आहे बरोबर आहे की ते वैयक्तिक ध्यान करतात. ते बसतात ध्यान करतात, पूजा करतात, परंतु सामुहिकतेत येऊन ध्यान करत नाहीत. तरी प्रत्येकांनी हा ही एक मुद्दा लक्षात ठेवला पाहिजे की तुम्ही सामूहिक ध्यान अवस्थेत असले पाहिजे, कारण तुम्हा सर्वांच्या सामूहिकतेत माझे अस्तित्व आहे. तुम्ही ज्या वेळी सामूहिक ध्यान करता तेव्हा तुम्ही माझ्या अगदी जवळ असता, जसे तुमचा काही कार्यक्रम असो अथवा इतर काही, म्हणून जरी तुमचा काही कार्यक्रम असो अथवा काही इतर असले तरी थोडा वेळ का होईना पण तुम्ही सामूहिक ध्यान केलेच पाहिजे. प्रत्येक कार्यक्रमाला (सामूहिक) ध्यानाला प्राधान्य/अग्रहक्क दिलाच पाहिजे. कार्यक्रमाला गाणी/भजन म्हणा इतर सर्व गोष्टी ठरल्याप्रमाणे कार्यक्रम करा आणि नंतर ध्यान करा. मी एखादी गोष्ट एवढ्या आग्रहाने सांगते आहे तर त्यात काही सत्य आहे हे तुम्ही जाणले पाहिजे. तसचे त्यांत काहीतरी आधारभुत सत्य असणार हेही लक्षात घ्यावयास हवे. हे जरी तुम्हाला ऐहिक वाटत असले तरी ते फार महत्त्वाचे आहे.

आता आपण आदिशक्तिची पूजा करणार आहोत. पण मला आदिशक्तिच्या पूजेबद्दल काही माहित नाही कारण आदिशक्तीची प्रार्थना वगैरे पूर्वीचे काही नाही, कारण पूर्वी भवतीची पूजा व प्रार्थने पर्यंत होते पण त्यापुढे ते गेले नाहीत. तरी तुम्ही कशाप्रकारे पूजा करणार हे मला माहित नाही. तेव्हा आपण काही प्रयत्न करून बघू! पण मला वाटते ध्यान केल्याने बरेच काही मिळविता येते, म्हणून खरोखर आपण ध्यान करावे हेच बरे. आपण सर्व जण पाच मिनिट ध्यान करू.

तुम्ही सर्वजणं आता डोळे मिटून बसा (श्री माताजी पूजेला आलेल्या सर्वांची कुंडलिनी जागृत करतात) एकादश रुद्र जागृत होतात आणि जे काही निगेटिव्ह आहे त्याचा विनाश करतात. आता अज्ञान ही सर्वात मोठी निगेटिव्हिटी आहे. मला खात्री आहे की सर्व लोकांची अज्ञानाची निगेटिव्हिटीचा एकादश रुद्र नाश करतील.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद

●●●

## • सहज-समाचार •

### सहज-संगीताचे परदेशातील कार्यक्रम

श्री. अरूण आपटे यांनी संगीताच्या माध्यमातून सहजयोगाचा प्रचार करण्याचे कार्य सुरू केल्यानंतर परदेशांमधून त्याचा खुप प्रभाव पडू लागला आहे. गेल्या सप्टेंबर-ऑक्टोबर ९८ मध्ये झालेले त्यांचे कार्यक्रम असे–

**कबेला :** श्रीगणेश पूजेच्या वेळी श्री. अरूण आपटे यांना गाण्यासाठी श्री माताजींनी स्वत: आधी काही ठरलेले नसतांना पाचारण केले. त्याप्रसंगी जयजयवंती राग व अबीर-गुलाल हे भजन त्यांनी सादर केले. श्रोत्यांना फार आनंद झालाच पण श्री. माताजीही प्रसन्न झाल्या व भारतीय संगीताबद्दल त्यांनी अर्धा तास भाषण केले.

**पॅरिस (फ्रान्स) :** सप्टेंबर मध्ये पॅरिसमध्ये श्री. अरूण आपटे यांना संगीत व सहजयोगाच्या कार्यक्रमासाठी तेथील सहजयोग्यांनी आग्रहाने बोलावले. हा कार्यक्रम तीन दिवस सलगपणे आयोजित केला होता.

पहिल्या दिवशी पब्लिक Concert असा प्रोग्राम ठेवला होता. फक्त पब्लिकसाठीच हा कार्यक्रम होता व अगदी मोजके सहजयोगी कार्यकर्ते सोडल्यास इतर सहजयोगी हजर नव्हते. तेथील समाजात कॅथॉलिक लोकांचा भरणा असल्यामुळे या कार्यक्रमात प्रत्यक्षपणे सहजयोगाबद्दल काहीच बोलायचे नाही असे ठरले होते. म्हणून संगीत व त्यामधून माणसाला अनुभवास येणारी निर्विचारता व त्याद्वारे मिळणारा आनंद यासंबंधी श्री. अरूण आपटे यांनी ३ प्रात्यक्षिकांसह सविस्तर (२ तास) माहिती दिली. कार्यक्रमानंतर श्रोते इतके भारावून गेले की पंधरा मिनीटे सर्वजण शांत व नि:शब्द स्थितीत होते.

दुसऱ्या दिवशी सहजयोग्यांसाठी तेथील सेंटरवर कार्यक्रम झाला. त्यावेळी सहजयोग व संगीत यांचा घनिष्ठ संबंध संगीतामधून कुण्डलिनी जागरण व निर्विचारता, स्वर व चक्रे, राग व चक्रशुद्धि इ. सहज-संगीताच्या सर्व संकल्पना व सिद्धांत प्रात्यक्षिकांसह सर्व सहजयोग्यांना समजातून देण्यात आली. सर्व सहजयोग्यांना याची प्रत्यक्ष अनुभूति मिळाली व सर्वजण इतके भारावून गेले की लवकरच सर्व फ्रान्सभर सहज-संगीताचे पब्लिक कार्यक्रम सहज-योगाच्या प्रचारासाठी करण्याची योजना करण्याचे ठरवले गेले.

तिसऱ्या दिवशी सहजयोग्यांसाठी याच विषयावर एक कार्यशाळा घेण्यात आली. त्यावेळी सहजयोग्यांनी फार उत्सुकता दाखवून अनेक प्रश्न विचारले व भारतीय संगीताचा सहजयोगासाठी उपयोग करण्याच्या हेतूमधून ते संगीत शिकण्याची जबरदस्त इच्छा दर्शविली.

**व्हिएन्ना :** फ्रान्सनंतर व्हिएन्नामध्ये ऑक्टोबर ९८ मध्ये सहज-संगीताचा तीन दिवसांचा कार्यक्रम झाला.

पहिला कार्यक्रम फक्त खास जगप्रसिद्ध कलाकारांसाठी होता, त्यामध्ये सहजी व अ-सहजी असे दोन्ही कलाकार (३५ ते ४०) होते. कार्यक्रमातही सहजयोगाची प्रत्यक्ष माहिती न सांगता संगीताचा माणसाच्या मानसिक स्थितीवर, निर्विचार अवस्था व संतुलनमधून कसा परिणाम होतो याची प्रात्यक्षिकांसह माहिती दिली व त्यामधून चक्रे ही Energy centres म्हणून कसे कार्य करतात हे सांगण्यात आले. श्रोत्यामध्ये भारतीय संगीताचा द्वेष्टा असा एक पाश्चात्त्य कलाकारही होता पण त्याने कार्यक्रमानंतर भारतीय संगीताबद्दल प्रभावित झाल्याचे कबूल केले. काही सहज-भजने ऐकल्यावर पाश्चात्त्य संगीताचाही सहजयोगासाठी उपयोग होऊ शकेल काय असा विचार कलाकार मंडळींच्या मनात आला. तसा प्रयत्नही करण्यात आला आहे व त्याची एक कॅसेट तयार झाली आहे.

दुसरा कार्यक्रम फक्त भारतीय सहजयोग्यांसाठी ठेवण्यात आला. त्यावेळेस संगीत आणि सहजयोग या विषयासंबंधी श्री. अरूण आपटे यांनी सविस्तर विवेचन केले; त्यामधे संगीतामधून स्वाधिष्ठान चक्र सुधारल्यावर निर्विचारता जास्त प्रमाणात व लवकर मिळते याचा प्रात्यक्षिकांबरोबर श्रोत्यांना अनुभव दिला गेला.

तिसरा कार्यक्रम पब्लिकसाठी होता व फक्त संगीतसभा (concert) असाच उद्देश होता. इथेही कॅथॉलिक पंथीय लोकांचा भरणा असल्यामुळे प्रत्यक्षपणे सहजयोग न सांगण्याची सूचना संयोजकांनी केली होती. तरीही संगीताचे फायदे .......-जागरण म्हणून प्रात्यक्षिकांमधून सांगितले गेले व कार्यक्रमाच्या अखेरीस मागे लावलेला पडदा दूर करण्यात येऊन सहजयोगाचे प्रवर्तक म्हणून श्री माताजींचा फोटो दाखवण्यात आला. एकंदरीत श्रोते प्रभावित झाले.

चौथा कार्यक्रम आंतरदेशीय सहजयोग्यांसाठी झाला व संगीत आणि सहजयोग ही संकल्पना सविस्तरपणे प्रात्यक्षिकांसह समजावून देण्यात आली. सर्व सहजयोग्यांना प्रत्यक्ष अनुभुति आल्यामुळे ह्या विषयाबद्दल सर्वजण प्रभावित झाले व भारतीय संगीत शिकण्याची उत्सुकता त्यांनी दाखवली.

**साल्झबर्ग :** यानंतर प्रसिद्ध पाश्चात्त्य संगीत कलाकार मोझार्ट यांच्या मोझार्ट या ठिकाणी ठेवण्यात आल्या त्या कार्यक्रमाला सहजयोगात अजून न आलेले बरेच भारतीय लोकही हजर होते. यावेळी स्थानिक भाषा म्हणून इंग्रजीबरोबर जर्मनमधूनही सहजयोग व त्यासाठी पूरक असणारे भारतीय संगीत याची माहिती दिली गेली. सर्व श्रोते भारावून गेलेच पण आणखी असेच कार्यक्रम ठरवण्यासाठी योजना त्यांनी आखण्याचे ठरवले. त्याचप्रमाणे इंटरनॅशनल म्यूझिक ॲकॅडमी स्थापन करून त्याद्वारे भारतीय संगीताचा अभ्यास व त्याद्वारे सहजयोगाचा प्रचार करण्याचा विचार तेथील सहजयोग्यांच्या मनात आला.

# ऋतंभरा प्रज्ञा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण लॉसहेंजिल सेमिनार, २३ जुलै ८३**

जगाच्या निरनिराळ्या भागातून तुम्ही सर्वजण ह्या ठिकाणी आलेले बघून मला अतिशय आनंद होत आहे. तेव्हा प्रेमाने हृदय इतके भरून येते की शब्द त्याची तीव्रता व्यक्त करण्यास अपुरे पडतात. तुमच्या हृदयात याची तीव्रता समजावयास पाहिजे. ह्या अशा सुंदर नैसर्गिक वातावरणात आपण एकत्र भेटलो आहोत. यात मला वाटतं अशी परमेश्वराची व्यवस्था आहे की यावेळी काही तरी वेगळं मोठं घडावयाचं आहे. ह्या वेळी आपण काहीतरी फार मोठं मिळवलं पाहिजे, आता वेळ थोडा आहे. तेव्हा मी तुम्हाला ध्यानाबद्दल काही गोष्टी सांगते व त्यानंतर मला वाटतं आणखी दोन भाषणे होतील.

"मेडिटेशन" हा एक सर्वसाधारण शब्द आहे. ध्यानामध्ये ज्या तीन पायऱ्या आहेत त्या शब्दातून स्पष्ट होत नाहीत. परंतु संस्कृत भाषेत तुम्ही ध्यानात कसे जायचं ह्यासंबंधी स्पष्टपणे सांगितले आहे.

प्रथम ध्यान म्हटलं आहे, दुसरी धारणा सांगितली आहे व तिसरी समाधी. सुदैवाने सहजयोग असा आहे की तुम्हाला या सर्व गोष्टी एकत्र एका बंडलमध्ये मिळतात. तुम्ही सर्व वगळून समाधीत जाता आणि हेच त्यातील सौंदर्य आहे. प्रथम ध्यान घ्या. प्रथमतः तुम्ही जेव्हा साधक असता तेव्हा तुम्ही ज्याची पूजा करता त्यावर तुमचे चित्त ठेवता, त्याला ध्यान म्हणतात. आणि धारणा म्हणजे तुम्ही केलेले सतत प्रयत्न. तुमचे चित्त सर्वप्रथम त्यावरच कॅंद्रित करणे. परंतु हे लोक जागृत नाहीत. त्यांच्याकरिता हे केवळ नाटक ठरतं, ते केवळ फक्त अभिनय करत असतात. परंतु जागृत व्यक्तीसाठी ते सत्य आहे.

तेव्हा प्रथम तुम्हाला ध्यान केलं पाहिजे. कुणी मूर्तीचे ध्यान करतात तर कुणी अमूर्तीचे करतात. परंतु तुम्ही इतके नशिबवान आहात की अमूर्तसुद्धा तुमच्यासमोर प्रत्यक्षात मूर्त स्वरूपात आले आहे. तुम्ही मूर्ताकडून अमूर्ताकडे किंवा अमूर्तामधूनन मूर्तता हे सर्वच येथे आहे. एका बंडलमध्ये, तेव्हा तुम्ही काही देवतेवर एकाग्रता करता किंवा त्यासंबंधी विचार करता किंवा काही ठिकाणी निराकार की जो अमूर्त स्वरूपात करतात किंवा सर्वस्वी निराकारावर चित्त एकाग्र करतात. जोपर्यंत तुम्ही जागृत नाहीत तोपर्यंत सर्व बुद्धिचा खेळ आहे. परंतु एकदा का तुम्ही जागृत झालात की तुम्ही ज्याचे ध्यान करणार आहात त्याचा फक्त विचार करता.

पण जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीवर ध्यान करता तेव्हा तुमचं चित्त विचलीत होत असतं. ते जागृतीनंतरही शक्य आहे. ते एका बंडलमध्ये आहे. तेव्हा जरी तुम्ही ध्यान करता तरी तुमचे चित्त घटके घटकेला विचलीत होत असतं. तुम्ही किती एकाग्रचित्त होऊ शकता त्याच्यावर ते अवलंबून असतं. तेव्हा मी काही असे सहजयोगी पाहिलेत की काही स्वयंपाक करतात तर काही ध्यान करतात तेव्हा ध्यान करणारा म्हणतो की काहीतरी जळण्याचा मला वास येतो आहे.

तेव्हा अशा ठिकाणी धारणा नसते. धार याचा अर्थ प्रवाह. प्रवाह थांबल्यास त्याठिकाणी धारणा नाही, ध्यान आहे पण धारणा नाही, ह्यातील दुसरा भाग फार महत्त्वाचा आहे. तुम्हाला तुमचं चित्त सतत तुमच्या देवतेवर ठेवावयास पाहिजे. तेव्हा तुम्ही एक स्थिति मिळविता ज्याला धारणा म्हणतात, ज्यात तुमचं चित्त त्या देवतेशी एक होतं आणि जेव्हा हे परिपक्व होतं तेव्हा तुम्हाला समाधी अवस्था प्राप्त होते.

आता ज्या लोकांना असं वाटतं की जागृती शिवाय ते हे कसं करू शकतात तर ते पूर्णतया चूक आहे. परंतु जागृतिनंतर जेव्हा तुमची धारणा प्रस्थापित होते तेव्हा तुम्हाला अशा अवस्थेत जावे लागते की ज्यामध्ये तुमची समाधी लागेल. आता ही अवस्था काय आहे? जेव्हा तुम्ही या अवस्थेत असता तेव्हा तुम्ही जे काही करता, तुम्ही ज्या देवतेला पूजता ते दैवत तुम्ही तुमच्या कामात बघता. तुम्ही असं म्हणू शकता की जे काही तुम्ही बघता तुम्हाला तुमचं दैवतच ते करत आहे असं दिसतं, तुम्ही जे काही ऐकता, तुम्हाला तुमचे दैवतच ते सत्य सांगत आहे असं वाटतं. जे काही तुम्ही वाचता त्यात तुम्हाला दिसेल की तुमच्या दैवतेनेच तुम्हाला सांगितलं. तेव्हा तुम्ही तुमच्या डोळ्यांनी, नाकांनी आणि इतर सर्व अवयवांनी जे काही कराल ते सर्व काही तुम्ही ज्या दैवताची पूजा करता त्याच दैवताचं दर्शन तुम्हाला आपोआपच घडतं. तुम्हाला आता, मला एकाग्रता करावयाची आहे असा विचार करावयास नको, आता मला हा विचार नको, मला आता हा विचार करायला पाहिजे इ. सर्व काही आपोआपच घडतं, तुम्ही एखादं पुस्तक वाचाल आणि तुम्हाला त्यात सहजयोगासाठी काय चांगलं ते सापडेल. जर परमेश्वराविरूद्ध लिखाण केलेले पुस्तक असेल तर ते तुम्ही टाकून द्याल. जर तुम्हाला काही अडचणी आल्या असतील तर असं समजा की त्या तुम्हाला काही धडा शिकविण्याकरिता घडलेल्या आहेत. (मला काही अनुभव शिकविण्याकरिता) हे सर्व त्या दैवताच्या अनुभूतीची प्रचिती आहे. आता उदाहरणार्थ एखाद्या स्त्रीला गर्भपतन होत आहे असे वाटते. तेव्हा एक व्यक्ति की जी समाधी अवस्थेला गेलेली नाही किंवा सवयींचा गुलाम आहे ती म्हणेल "मी माताजी साठी एवढं केलं मी इतक्या लांब गेलो. आणि असं असूनसुद्धा ही अडचण मला आली." पण दुसरा म्हणेल की, "ठीक आहे मला प्रयत्न करून बघू दे, मी जाऊन माताजींच्या फोटोसमोर सांगेन किंवा टेलिफोन करेन." आणि त्याला असे आश्चर्य दिसेल की ते सर्व काही झालेले आहे आणि एकदम योग्य असंच.

तुम्ही जर जागृत असलात तरच ह्या गोष्टी शक्य आहेत. अन्यथा नाही. तेव्हा ही जी अवस्था तुमच्यात जागृत झाली आहे. ती एक नवीन स्थिती आहे. संस्कृतमध्ये तिला सुंदर नाव आहे. फार कठिण नाव आहे. "ऋतंभरा प्रज्ञा" ऋतंभरा हे निसर्गाचं नाव आहे,

आणि एखाद्याला तो निसर्ग प्रकाशित झालेला जाणवतो. मी तुम्हाला एक उदाहरण देते. ज्यावेळी मूल जन्माला येत असतं त्यावेळी त्याच्या आईला आपोआप दुध येते. निसर्ग मुलांच्या जन्माकरिता आपोआप कार्यान्वित होत असतो.

त्याचप्रमाणे फक्त सहजयोग्याच्या ठिकाणी ही ऋतंभरा प्रज्ञा जेव्हा कार्यरत होते तेव्हा काम करू चटकन घडतं हे बघितलं तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. आता वेळ थोडा आहे. पण मी तुम्हाला एक उदाहरण देते, मी ब्रायटनला आले आणि जॉन्सन म्हणाला, "माताजी ब्रायटनमध्ये गुरुपूजा करू या." मी म्हटलं, "ठीक आहे करा. परंतु जागा शोधून काढा." तेव्हा तो युनिव्हर्सिटीत गेला, म्हणाला की, युनिव्हर्सिटीचे लोक मदत करतील परंतु जागा लहान आहे आणि मी म्हणाले "परंतु त्यांना विचारुन तर बघा. मग तो म्हणाला "नाही ती जागा गुरुपूजेच्या दिवशी रिकामी नाही." मग मी म्हणाले की, "तुम्ही काय करू शकता?" तो म्हणाला की, "माताजी आता काय करायचं?" मी म्हणाले, "दुसरे कुठे तरी आत्ताच्या आत्ता प्रयत्न करा. फोनवर कोणाला तरी विचारा." नंतर त्यांनी जाऊन त्यांना फोन केला, आणि त्यांनी सांगितलं की आमच्याकडे जागा आहे, फारच चांगली जागा आहे, आणि तुम्ही ताबडतोब या, जेवायलाच या. तो लगेच तेथे गेला. त्याने तेथे उत्कृष्ठ जेवण केलं, ते सर्वजण खूप खुष होते. ते सर्वांनाच जागा देणार होते. ते फारच चांगले लोक होते. आणि ह्या सर्व गोष्टी इतक्या चांगल्या रितीने कशा घडल्या याचे त्याला आश्चर्य वाटले.

तेव्हा ऋतंभरा प्रज्ञा ही तुमच्या मदतीसाठी कार्यान्वित होत असते. तुम्ही सर्व मला सांगता की माताजी हे आश्चर्य घडले ते घडलं आणि आम्हाला समजलं नाही की ते कसं घडलं. मी एक तुम्हाला उदाहरण देते. काल आम्ही काहीतरी सिमेंटचे काम करीत होतो. तेव्हा इटालियन मुलगा म्हणाला की आपल्याला दोन पिशव्या सिमेंट लागेल. मी म्हणाले, "तू काम चालू ठेव ते संपणार नाही." मी जाण्याच्या अगोदरसुद्धा ते काम चालू होतं आणि सिमेंट संपलं नव्हतं. आता बघा एवढी सिमेंटसारखी गोष्ट.

तेव्हा ही एक विशेष गोष्ट आहे की निसर्ग तुमच्याशी एकरुप झाला व तुम्ही निसर्गाशी एकरुप झालात तेव्हा या दैवी शक्तिचे प्रेम, संरक्षण आणि तुमच्या प्रति चित्त ह्या काही घटना घडतात. जी काही परिस्थिती निर्माण होते त्यातून प्रदर्शित होतं, आणि ह्याला अंत नाही, ते फक्त घडत असत. पण लोकांना ते कसं घडलं ते समजत नाही. पण तीच समाधीची स्थिती आहे. परंतु असे काही लोक असतील की मी जर त्यांना विचारलं की "तुम्ही हे कराल का?" तर ते म्हणतील, "माताजी आता दुकानं बंद झाली असतील." ते काही बरोबर नाही, ते होणार नाही अशा तऱ्हेने ते सांगत राहतील आणि काही असेही लोक आहेत की ते म्हणतील "नाही मला बघू द्या, जर माताजी म्हणत आहेत तर ते होईलच."

मी आता अगदी साधे उदाहरण देते, फारच बाह्यातले आहे. पण ते सत्य आहे. श्री श्रीवास्तव हे काही विशिष्ट प्रकरे चहा घेतात. फारच इंग्लिश. आणि त्यांना दुसरा चहा आवडत नाही. तेव्हा ते मला म्हणाले, "अरे बापरे आपला चहा संपला आणि उद्या सकाळी काय करायचे?" तेव्हा मी म्हणाले, "ठीक आहे. चला आपण चहाच्या दुकानात जाऊ." तेव्हा ते म्हणाले, "आता रात्रीचे आठ वाजले आहेत. ते सर्व आपल्याला हसतील व आता रात्री आठ वाजता कुठलेही टी सेंटरचे दुकान उघडे नसेल." मी म्हणाले, "बघू तर जाऊन त्यात अडचण काय आहे? मी म्हणते चला जाऊ या." परंतु ते म्हणाले, "काय विचित्र गोष्टी तुम्ही सांगत आहात." मी म्हणाले, "ठीक आहे, विचित्र किंवा काहीही असो चला तर खरे." परंतु ते ऐकेनात तेव्हा मी ड्रायव्हरला सांगितले, चला आपण तिकडे गाडीने जाऊ या. आम्ही तेथे गेलो. आणि सर्व दिवे लागलेले होते. आम्ही म्हणालो हे सर्व दिवे कसे लागलेले आहेत? तेव्हा आम्ही आत गेलो आणि ते सर्वजण तेथे उभे होते. "आम्ही सर्वजण आपल्यासाठी केव्हाची वाट पहात आहोत आणि तुम्ही सर्वात शेवटी आलात." पहा कल्पना करा. तेव्हा मी माझ्या पतींना विचारले, ते म्हणाले, "मी विसरलो आपल्याला आज येथे स्वागत समारंभ होता. आणि ते म्हणाले "तुम्ही सर्वात शेवटी आलात" आणि म्हणाले, "काही हरकत नाही. तुम्ही तुमचे प्रेझेन्ट घ्या." तेव्हा त्यांनी प्रत्येकी दोन चहाचे डबे प्रेझेंट दिले.

माझा म्हणण्याचा अर्थ असा की अशी हजारो उदाहरणे देता येतील. आजच कुणीतरी पलंग सरकविण्याचा प्रयत्न करीत होते. तिघेजण प्रयत्न करीत होते. मी म्हणाले, "ठीक आहे मी सरकवते", मी फक्त माझी नाभी तेथे लावली, मी काही ढकलले नाही. ते असंच पुढे सरकलं. हे केवळ ऋतंभरा प्रज्ञामुळे. परंतु हा काही चमत्कार नाही. हे ईश्वराचे तुमच्यावरील प्रेम प्रदर्शित करणे, तुम्हाला, तुम्ही कोणी खास निवडलेले आहात, हे दाखविण्यासाठी आहे. परंतु ही परिस्थिती तुम्ही मान्य केली पाहिजे.

पण तुम्ही जर सर्वसाधारण लोकांसारखे वागला आणि "अरे देवा, दुकाने बंद असतील, हो माणूस किती विचित्र आहे, मला वाटत नाही की ते काम होईल" असेच म्हणत बसलात तर ते कधीच होणार नाही. पण तुम्हाला हे समजलं पाहिजे की निराकार व साकार मी तुम्हाला जन्म दिलेला आहे, तुम्ही निवडलेले साधू संत आहात तेव्हा ही प्रज्ञा प्रदर्शित होत असते. प्रत्येक क्षणाला प्रदर्शित होत असते. तुम्ही तयारीत रहा, आनंदी रहा आणि तिचं स्वागत करा. आणि विश्वास ठेवा की तुम्ही तिथं आहात, त्याची पातळी वेगळी आहे.

आता वेळ आलेली आहे की सहजयोग्याने आपली पातळी बदलली पाहिजे. आपण बदललं पाहिजे. आपण आपली उन्नती केली पाहिजे, पातळी उंचावली पाहिजे. परंतु सहजयोग असं काही मिश्रण आहे की एकाच प्लेटवर आपल्याकडे अत्यंत खराब अशा भूतापासून अगदी वरच्या दर्जाचे लोक आहेत. आता काही जण गेले आहेत. फार अहंकारी आहेत. ते सारखे गडगडत असतात. आपल्याला समजत नाही की ही प्लेट उंचावयाची कशी? जर तुम्ही ती प्लेट उंचावली तर ते गडगडत खाली येतील.

तेव्हा तुम्ही घाबरलेले आहात तुम्हाला त्यांना धरुन ठेवलं पाहिजे. आणि काही असे आहेत की ते चौरस आहेत व दुसऱ्याच्या समस्या भुताप्रमाणे आपल्या डोक्यावर घेतात. जर तुम्ही त्यांची उन्नती करण्याचा प्रयत्न कराल तर ते खाली घसरत येतील किंवा सर्व भूते पडतील परमेश्वराला माहित? पण तिसऱ्या प्रकारचे लोक आहेत की जे मनोऱ्यासारखे आहेत, जे अगदी चांगल्या रीतीने स्थीर झालेले आहेत. तुम्ही ज्या उंचीवर त्यांना न्याला तेथेच ते टिकून

राहतील.

तेव्हा जे लोक अजून काठावर आहेत हे मला नक्कीच त्रासदायक आहेत. कारण माझ्या प्रेमामुळे मी त्यांना बाहेर फेकू शकत नाही. त्यांना मदत करावयास पाहिजे. त्यांना उन्नती करावयासाठी त्यांना त्यातून बाहेर यावयास पाहिजे. प्रत्येकानी बघितलं पाहिजे की जे काठावर आहेत त्यांना नीटपणे आत आणलं पाहिजे. म्हणजे ते सहजयोगातून बाहेर जाणार नाहीत. जिव्हाळा ठीक आहे. पण आपली सहजयोगाची पातळी खाली करून चालणार नाही. कधीच नाही.

जे लोक सहजयोगात चांगले प्रस्थापित झाले आहेत त्यांची पातळी उंचावयास पाहिजे. तेव्हा प्रत्येकाने किमान पातळीपर्यंत येण्याचे व स्थिर करण्याचे प्रयत्न करावे. नाहीतर मला सांगण्यास खेद वाटतो की ते चाळणीतून गळले जातील.

धन्यवाद.

संदर्भ : निर्मला योग
जाने-फेब्रु ८४

●●●

## श्री माताजींचा उपदेश (दि. २७ मे १९७६ रोजी मुंबई येथे केलेल्या भाषणाच्या आधारे)

सहजयोगात आपण निर्विचारतेत कसे जातो हे मी आपणांस सांगितलेलेच आहे. तादात्म्याशी एकरूप झाल्यानंतर आपण देवपणाचे जवळ पोहोचतो. देवाशी एकरूपता प्राप्त झाल्यानंतर मनुष्याच्या आवडीनिवडी बदलतात. अशी अवस्था प्राप्त झाल्यानंतर आपणांस दुसऱ्याच्या कुंडलीनी जागृतीबद्दल समजते. दुसऱ्याच्या कुंडलीनीच्या अवस्थेविषयी उत्सुकता वाढते व त्याचबरोबर आपण आपल्या स्वत:मधील चक्रांबाबत सतत सावध असतो. आकाशात बारकाईने निरीक्षण केलेत तर तुम्हास असंख्य कुंडलिनी त्यात दिसतील. एकदा कुंडलिनी जागृती झाली की मग तुम्हास कुंडलीनीबद्दल काहीही हवे असले, तुम्हास काहीही बघावेसे वाटले, तुमची काहीही इच्छा असली तरी त्या सर्व फलद्रुप होतात. तुमची कुंडलीनीबाबतही इच्छा तीव्र होऊन इतर सर्व इच्छा-आकांक्षा कमी होतात. ज्याप्रमाणे बालपणातुन तारुण्यात पदार्पण केल्यानंतर मनुष्यप्राण्याचे बालपणातील सवयी, इच्छा-आकांक्षा नष्ट होतात व तो तारुण्यातील इच्छा-आकांक्षा पूर्ण करू पाहतो; तद्वतच एकदा कुंडलीनी जागृत झाल्यावर तुमच्यात परिवर्तन घडून येते. तुमच्या पूर्वीच्या सवयी, इच्छा इ. हळूहळू नष्ट होतात व तुम्ही कुंडलिनीबद्दल विचार करून लागता. दुसऱ्यास आनंद लहरी (सौंदर्य लहरी) देण्याची तुम्हाला इच्छा होते. तुमच्यांत एक नवेच चैतन्य प्राप्त होते. त्याने तुम्ही भाराऊन जाता.

काही लोक विचारतात की, ''आम्हांस कुंडलिनी जागृतीची अनुभूती मिळाल्यानंतर आम्ही पुढे काय करावयाचे?'' त्यावर श्रीमाताजी म्हणतात, ''तुम्हांस मिळाल्यावर ते तुम्ही दुसऱ्यास द्यावयाचे आहे नाहीतर मिळाल्याचा काहीच उपयोग नाही. परंतु हे करीत असताना एक छोटासा मुद्दा लक्षात ठेवावयास हवा. तुम्ही ही अलौकीक शक्ती जेव्हा दुसऱ्यास देता तेव्हा तुम्ही सर्वार्थाने (काया-मनाने) स्वच्छ, निर्मळ असावयास हवे. त्यात कुठल्याही प्रकारचा विकार नको. सहजयोगात येण्यापूर्वी तुम्हांस काही आजार-विकार झाल्यास तुम्ही तो बरा कसा होईल याची काळजी करीत होता; परंतु आता सहजयोगात आल्यावर तुम्ही सहजपणे म्हणाल, ''त्यात काय काळजी करायची?'' तुम्ही शारीरिक व्याधी सहजगत्या त्या व्याधीग्रस्त भागावर तुमचा हात ठेवून व त्यात लहरी सोडून बऱ्या करू शकता; परंतु हे साध्य होण्याकरिता प्रत्येक सहजयोग्याने स्वच्छता करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी त्याने दिवसातून किमान पाच मिनीटे तरी मिठाच्या पाण्यात पाय बुडविण्याची क्रिया केलीच पाहिजे. शक्यतोवर झोपण्यापूर्वी. श्री माताजी म्हणतात, ''मी स्वत: मीठाच्या पाण्याची क्रिया करते. वास्तविक मला हे करण्याची काहीच गरज नाही.'' ही सवय असणे अत्यंत चांगले आहे. याने तुमचे निम्यापेक्षा अधिक प्रश्न सुटतील.

आपल्यातच अनेक वाईट सवयी असतात. त्यालाच आपण नकारात्मक शक्ती अथवा व्याधी म्हणतो. त्यांचा परिणाम फार तीव्रतेने होत असतो. तो तुम्ही टाळला पाहिजे. अन्यथा तुम्ही दैत्य व्हाल. तुम्हाला देव बनावयाचे असेल तरच मी तुमची गुरु होणार!

अमावास्या व पौर्णिमेचे रात्री तुमच्या डाव्या-उजव्या नाड्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणून या विशिष्ट 'रात्री' तुम्ही लवकर झोपी गेलेली बरे. जेवणांतर लवकर फोटोपुढे नतमस्तक होऊन ध्यान करून व चित्त सहस्त्रारांत ठेवून झोपी जावे. झोपण्यापूर्वी बंधनं घेतल्यास बाधा होत नाहीत. अमावस्येचे रात्री तुम्ही श्री शिवाचे चक्रावर ध्यान करावे; तर पौर्णिमेचे रात्री श्री रामाचे चक्रावर ध्यान करावे. त्यांना शरण जावे म्हणजे तुमचे संरक्षण होईल. सप्तमी व नवमीचे रात्री माझे तुम्हा सर्वांना विशेष आशिर्वाद असतात. त्यादिवशी माझी विशेष प्रार्थना केल्यास व ध्यान केल्यास तुम्हाला कशावेच भय नाही.

जेव्हा जेव्हा तुम्ही घरातून बाहेर पडता तेव्हा नियमितपणे बंधने घेत जॉ नेहमी बंधनात रहा.

ज्या मनुष्याची आज्ञा व विशुद्धी धरलेली आहे अशांशी वादविवाद घालू नका (बोलू नका). ज्याचे सहस्त्रार धरलेले आहे, अशांशी तर अजिबात बोलू नका. त्यांचेशी संबंध ठेवू नका. त्याला त्याचे सहस्त्रार ठीक करायला सांगा.

ज्याचे हृदय चक्र धरले आहे अशा व्यक्तीला मदत करा. त्याच्या हृदय चक्रावर बंधने घाला. त्याला त्याचा हात हृदय चक्रावर ठेवावयास सांगा व श्री माताजींचे फोटोपुढे बसवा. नेहमी मुले-बायकांशी प्रेमाने वागा. त्यांची प्रतारणा करून नका. वास्तविक कोणाशीच असे वागू नये. मुलांना मारु नका. कधी चीडचीड करू नका.

श्री माताजी म्हणतात, ''मी तुम्हा सर्वांना या सगळ्या गोष्टी मुद्दाम सांगितल्या, जेणे करून तुम्ही सर्वांनी स्वत:चे शरीरास, मनास, सर्व चक्रांस स्वच्छ ठेवाल. मी सर्व स्तरांवर तुमच्या जवळच आहे. जेव्हा केव्हा तुम्हाला माझी आठवण येईल, तेव्हा तेव्हा मी माझ्या सर्व शक्तींनिशी तुमचे पाठीशी असेन! हे माझे वचन आहे. नेहमी वरवर बघा. वरवर बघा, वरवर जाण्याचा प्रयत्न करा, खाली नव्हे!

